सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. ०३ सप्टेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १५२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जरांगेंचा मोठा विजय... हैदराबाद गॅझेट लागू होणार; सर्व मागण्या झाल्या मान्य!

राज्य सरकार कडून जीआर काढण्याची प्रक्रिया सुरू

मुंबई: मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी गेली पाच दिवस मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसलेल्या जरांगे पाटलांनी अखेर लढाई जिंकली असल्याची घोषणा केली आहे. राज्य सरकारने मनोज जरांगेंच्या मागण्या मान्य केल्या आहेत. सरकारने हैदराबाद संस्थान लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता हजारो मराठा आंदोलकांना त्याचा फायदा होणार आहे. हैदराबाद आणि सातारा संस्थांनच्या गॅझेटची, तसेच सगेसोयरे आदेशाची तत्काळ अंमलबजावणी करावी अशा प्रमुख मागण्या जरांगेकडून करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता राज्य सरकारने जरांगे यांच्या मागण्यांची दखल घेत काही मोठे निर्णय घेतले आहेत.

हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. जरांगे यांच्या अनेक मागण्यांमध्ये ही एक प्रमुख मागणी होती. त्यानुसार आजच या निर्णयाबाबत जीआर काढला जाणार आहे. तसेच राज्य सरकारने सातारा संस्थानचे गॅझेटही लागू करण्यात येईल, असे देखील आश्वासन दिले आहे. मात्र त्यासाठी काही काळ सरकारने मागितला आहे. हे गॅझेट लागू करण्याची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील तसेच शिवेंद्रराजे भोसले यांनी जबाबदारी घेतली



आहे. त्यानुसार आता लवकरच सातारा गॅझेटही लागू होणार असून त्याचा फायदा पश्चिम महाराष्ट्रातील शेकडो मराठा समाजाला फायदा होणार आहे.

आंदोलकांवरील मागे घेतले जाणार

तसेच आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान ज्या आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत ते मागे घेतले जाणार आहे. त्यासाठी राज्य सरकार न्यायालयात जाऊन तसा अर्ज करणार आहे. त्यामुळे मराठा आंदोलकांवरील गुन्हेदेखील मागे घेण्याचे राज्य सरकराने मान्य केले आहे. तसेच मराठा आंदोलनादरम्यान आत्महत्या केलेल्या तसेच या आंदोलनादरम्यान मृत्युमुखी पडलेल्या मराठा आंदोलकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि कुटुंबातील व्यक्तीला सरकारी नोकरी देण्याबाबतही राज्य सरकारने मान्य केले आहे. याबाबत लवकरच कार्यवाही सुरु करण्यात येईल असे राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांना लेखी लिहून देण्यात आले आहे.

मराठा आणि कुणबी एकच, सगेसोयरे या दोन ऋठ चे काय झाले?

शिष्टमंडळाने मराठा आणि कुणबी एकच व सगेसोयरे आदेशाची तत्काळ अंमलबजावणी या दोन मागण्या वगळता इतर सर्व मागण्याबाबत तातडीने जीआर काढण्याची तयारी राज्य सरकारने दर्शवली आहे. मराठा आणि कुणबी जीआर काढण्यासाठी दोन महिन्याची वेळ द्यावी, अशी मागणी उपसमितीने केली आहे. त्यानंतर सगेसोयरेबाबत राज्य सरकारकडे एकूण आठ लाख हरकती आल्या आहेत. या सर्व हरकती छाननीसाठी वेळ लागणार आहे. त्यामुळे त्याची पडताळणी सुरु आहे. त्यासाठी ही राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने वेळ वाढवून मागितली आहे. जरांगे यांनीदेखील सरकारला या मागणीसाठी दोन महिन्यांची वेळ दिली आहे. त्यामुळे आता दोन महिन्यांत सरकार मराठा-कुणबी या मागणीवर निर्णय घेणार आहे.

जीआर आणा.. रात्री ९ पर्यंत मुंबई खाली करतो

सरकारने जरांगे पाटील यांच्या सगळ्या मागण्या मान्य करत जीआर काढणार असल्याचे जाहीर केले. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी तुम्ही जीआर घेऊन या, तुमच्या टकुऱ्यावर गुलाल टाकतो अन् नऊ वाजेपर्यंत मुंबई खाली करतो, असा शब्द मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व सरकारच्या शिष्टमंडळाला दिला आहे. त्यानुसार आता जरांगे यांनी शिष्टमंडळाचा मसुदा मान्य केला असून, त्याबाबत जीआर काढण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

## जयपूर कोट्यात मोठे सर्च ऑपरेशन १८ ठिकाणावर इन्कम टॅक्स विभागाच्या धाडी, काळया पैशांची हेराफेरी उघड होण्याची शक्यता

प्रतिनिधी:आयकर विभागाने जयपूर व कोटा शहरात १८ धाडी टाकल्या आहेत. रिअल इस्टेट व पान मसाला उद्योगांशी संबंधित कंपन्यांवर आयकर विभाग विभागाने मोठ्या प्रमाणात सर्च ऑपरेशन केले आहे. सकाळी ७ वाजता च्या सुमारास ही कारवाई झाली आहे. माहितीनुसार, हाय फ्लाय रिअल इस्टेट ग्रुप कंपनीच्या ठिकाणावर आयकर विभागाने धाडी टाकल्या असून सिग्नेचर पान मसाला व गोकुल कृपा ग्रुपच्या बीआरबी डेव्हलपर यांच्याही ठिकाणावर आयकर विभागाने धाडी टाकल्या आहेत.आयकर न भरता पैशाच्या हेराफेरीचा तसेच कर चुकवल्याचा आरोपही या कंपन्यांवर आयकर विभागाने कारवाई केली आहे. आरोपातील माहितीनुसार, संबंधित कंपन्यांनी रिअल इस्टेटचे व्यवहार पैशातून



केले हो ते ज्याची नोंद कुठेही ठेवण्यात आली नव्हती. तसेच या पैशातून मालमत्तेची खरेदी विक्री केली गेली असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच काळया पैशातून हे व्यवहार झाले असल्याचेही विभागाने म्हटले असून याच काळया पैशातून अनेक मालमत्तेचे खरेदी वि क्री व्यवहार झाले असल्याचे म्हटले जात आहे.

एकाच ठिकाणी अनेक मालमत्ता खरेदी करून जागांच्या मागणीत कृत्रिम वाढ करुन नवी किंमत निश्चित करून मोठा नफा कमावण्याची शक्कल या कंपन्यांनी लढवली असल्याचेही आरोप या कंपन्यांवर आहेत. आयकर विभागाचे १५० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही धाड टाकली असून यावर आयकर विभाग अधिक तपशीलवार तपास करत आहे. संध्याकाळपर्यंत आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

तूर्तास आयकर विभागातील अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, करचोरी, मोठ्या प्रमाणात रोख व्यवहार, अघोषित उत्पन्न आणि बनावट कागदपत्रांचा वापर अशा तक्रारींनंतर ही कारवाई सुरू करण्यात आली होती .सूत्रांनीदिलेल्या माहितीनुसार, या छाप्यांमुळे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, बेनामी मालमत्ता आणि लपविलेल्या मालमत्ता जप्त होऊ शकतात असा तपासकर्त्यांना संशय आहे.

आयकर विभागाने अद्याप कोणतेही अधिकृत विधान जारी केलेले नाही. छापे पूर्ण झाल्यानंतर जप्ती आणि वसुलीची माहिती उघड होण्याची शक्यता आहे.दरम्यान, या छाप्यांमुळे जयपूर आणि कोटामधील व्यावसायिक वर्तुळात, विशेषतः लक्ष्यित कंपन्यांशी संबं धित असलेल्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांनी दिले होते. यापूर्वी १४ जुलैला विविध सवलतींचा दावा करून काही व्यक्तींना त्यांच्या रिटर्नमध्ये बनावट कपाती मिळविण्यास मदत करणाऱ्या संस्थांविरुद्ध करचुकवेगिरीच्या चौकशीचा एक भाग म्हणून प्राप्तिकर विभागाने विविध शहरांमध्ये छापे टाकले होते.नोंदणीकृत किंवा नोंदणी नसलेल्या राजकीय पक्षांना राजकीय देणग्या देण्याच्या बदल्यात, वैद्यकीय विमा, शिक्षण शुल्क आणि विशिष्ट श्रेणीतील कर्जे देण्याच्या बदल्यात व्यक्तींनी केलेल्या खोट्या कपाती या छाप्यांचा भाग म्हणून या प्रकरणात तपास केला गेला आयकर विभागाने केला होता.

## शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक!

नवी दिल्ली : शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी)उत्तीर्ण करणे आता शिक्षकांसाठी बंधनकारक आहे, असा मोठा निर्णय सोमवारी शिक्षकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिला. टीईटी परीक्षा उत्तीर्ण असेल तरच शिक्षकांना सेवेत कायम ठेवता येईल किंवा त्यांना पदोन्नती मिळेल. निवृत्तीला फक्त पाच वर्षे शिल्लक राहिलेल्या शिक्षकांनाच टीईटीमधून सूट दिली जाईल. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, ज्यांची निवृत्ती पाच वर्षांवर आली आहे ते कोणत्याही टीईटीशिवाय त्यांचा सेवाकाळ पूर्ण करू शकतील. मात्र पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा बाकी असलेल्यांना टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जर ते टीईटी उत्तीर्ण झाले नाही तर त्यांना नोकरी सोडावी लागेल किंवा स्वेच्छानिवृत्ती घेऊन टर्मिनल बेनिफिट्स घ्यावे



लागतील असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने २०१०मध्ये पहिली ते आठवीपर्यंत शिकवण्यासाठी किमान योग्यता निश्चित केली होती. त्यानंतरच टीईटीला शिक्षक भरतीसाठी बंधनकारक केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता टीईटीची अट बंधनकारक केली जाणार आहे. महाराष्ट्र, तामिळनाडुसह वेगवेगळ्या राज्यातून टीईटी संदर्भात याचिका दाखल झाल्या होत्या. या याचिकांमध्ये टीईटी उत्तीर्ण नसेल तरी शिक्षक म्हणून कायम रहावे का आणि पदोन्नती मिळावी का असे प्रश्न उपस्थित केले होते. सर्वोच्च न्यायालयाने यावर सुनावणी करताना टीईटी बंधनकारक केली आहे.

## बडतर्फ पोलिस अधिकारी सुनील नागरगोजे यांची आत्महत्या

बीड: परभणीतील अधीक्षकांना शिवीगाळ प्रकरणी बडतर्फ केलेले पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना अंबाजोगाईत घडली आहे. बडतर्फीनंतर नागरगोजे हे नैराश्यात गेले होते. या नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. परभणीतील शिस्तभंग प्रकरणात एप्रिल २०२५ मध्ये त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. यासंदर्भात त्यांची चौकशी देखील सुरू होती. बदलीनंतर बीड येथे त्यांना नियंत्रण कक्षात ठेवले गेले होते. दरम्यान, अंबाजोगाई येथे नवीन घराचे बांधकाम सुरू असल्याने, नागरगोजे हे भाड्याच्या घरात एकटेच राहत होते. त्यादरम्यान रविवार रात्री आठ वाजण्याच्या सुमारास त्यांनी अंबाजोगाई येथील निवासस्थानी आत्महत्या करून जीवन संपवले. सध्या त्यांची मुले पुण्यात शिक्षण घेत



आहेत. त्यांच्या पत्नीही सध्या पुण्यात मुलांजवळ असल्याचे सांगितले जात आहे. सुनील नागरगोजे यांचे मूळ गाव परळी तालुक्यातील नागदरा आहे. मात्र, ते अनेक वर्षांपासून कुटुंबियांसह अंबाजोगाई येथे वास्तव्यास होते. पोलीस खात्यात काम करताना त्यांनी परभणी, लातूर आणि बीड या ठिकाणी सेवा बजावली होती. लातूर येथे त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचा पदभार सांभाळला होता.

परभणीत पोलीस अधीक्षकांना शिवीगाळ केल्याचा आरोप

परभणी येथे कार्यरत असताना एका पोलीस अधीक्षकांना शिवीगाळ केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच, बीड येथे बदली झाल्यानंतर त्यांनी पुन्हा एका कर्मचाऱ्याला शिवीगाळ करत धमकी दिली होती. त्यामुळे त्यांना बीड येथे नियंत्रण कक्षातच सीमित ठेवण्यात आले होते. दरम्यान, त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. सुनील नागरगोजे यांनी आत्महत्या नेमकी का केली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सुनील नागरगोजे यांचा मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी (शवविच्छेदनासाठी) अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात पाठवला आहे.या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

## सुदान हादरलं! भूस्खलनात १००० हून अधिक जणांचा मृत्यू, दारफूरमधील अख्खं गाव पुसलं नकाशावरून

खार्टुम : अफगाणिस्तानातील भूकंपाच्या भीषण धक्क्यातून जग अजून सावरतही नाही, तोच आता सुदानमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. सुदानच्या पश्चिमेकडील दारफूर प्रांतात सोमवारी भूस्खलनाची मोठी दुर्घटना झाली. या भूस्खलनात सुमारे १००० जणांचा मृत्यू झाल्याचे स्थानिक प्रशासनाने सांगितले. ही दुर्घटना तारासीन गावात घडली असून हे गाव मध्य दारफूरच्या माराह पर्वतरांगांमध्ये वसलेले आहे. काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पर्वतरांगांमध्ये मोठ्या प्रमाणात ढासळणं झालं आणि गाव अक्षरशः जमीनदोस्त झाले. तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या काळातील ही घटना सुदानमधील सर्वात मोठ्या नैसर्गिक आपत्तींपैकी एक मानली जात आहे. बचावकार्य अत्यंत कठीण परिस्थितीत सुरू असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



गावचं गाव पुसलं, तब्बल १००० लोकांचा मृत्यू

सुदानमधील दारफूर प्रांतात घडलेल्या भूस्खलनाने एक गाव अक्षरशः नकाशावरून पुसलं गेलं आहे. तारासीन गावात राहणारे जवळजवळ सर्व लोक मृत्युमुखी पडल्याचे प्राथमिक अहवालांमध्ये समोर आले आहे. फक्त एकच व्यक्ती जिवंत राहिल्याची माहिती स्थानिक संस्थांनी दिली आहे. सुदान लिबरेशन मूव्हमेंट-आर्मीने दिलेल्या माहितीनुसार, या भूस्खलनात अंदाजे एक हजार लोकांचा बळी गेला आहे. गावातील प्रत्येक घर जमीनदोस्त झालं असून संपूर्ण भाग उद्ध्वस्त झाला आहे. या आपत्तीनंतर संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय मदत संस्थांना तातडीने मदतीसाठी आवाहन करण्यात आले आहे. ढिगाऱ्याखाली गाडलेल्या मृतदेहांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू आहे, मात्र परिस्थिती अतिशय गंभीर आणि भीषण असल्याने कामाला विलंब होत आहे. स्थानिक माध्यमांनी एक व्हिडिओ शेअर केला असून त्यामध्ये पर्वतरांगांमधील संपूर्ण भाग सपाट झाल्याचे भीषण दृश्य दिसत आहे. तज्ज्ञांच्या मते, हा भूस्खलन सुदानमधील सर्वात मोठ्या नैसर्गिक आपत्तींमध्ये गणला जात आहे.

एप्रिल २०२३ पासून राजधानी खार्तूमसह अनेक भागांमध्ये सैन्य आणि निमलष्करी रॅपिड सपोर्ट फोर्सेस (ठडऋ) यांच्यात रक्तरंजित संघर्ष सुरू आहे. गेल्या दीड वर्षाच्या या युद्धात हजारो लोकांचा बळी गेला असून लाखो लोकांना घरदार सोडून पलायन करावे लागले आहे. या संघर्षामुळे विशेषतः माराह पर्वतरांग आणि दारफूर प्रदेश संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय मदत संस्थांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. येथे मदत पोहोचवणे, अन्नसामग्री, वैद्यकीय सेवा किंवा आश्रयाची व्यवस्था करणे अशक्यप्राय झाले आहे. अशा वेळी दारफूरमध्ये आलेल्या भीषण भूस्खलनाने या युद्धपीडित प्रदेशावर संकटांची भर टाकली आहे. एका बाजूला मानवनिर्मित युद्ध तर दुसऱ्या बाजूला नैसर्गिक आपत्ती, अशा दुहेरी संकटांनी सुदानमधील परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे.

सुदानमधील गृहयुद्ध आणि नैसर्गिक आपत्तीच्या छायेत असलेल्या हजारो विस्थापित कुटुंबांनी आता माराह पर्वतरांगांमध्ये आसरा घेतला आहे. दारफूर आणि कोर्डोफान भागात सक्रिय असलेले अनेक बंडखोर गट याठिकाणी कार्यरत आहेत. त्यामध्ये सुदान लिबरेशन मूव्हमेंट-आर्मी (डङच--) हा प्रमुख गट असून त्यांनी सध्या सुरू असलेल्या संघर्षात कोणत्याही बाजूशी आपली नाळ जोडलेली नाही. माराह पर्वतरांगा अल-फशरच्या नैऋत्येला पसरलेली १६० किमी लांबीची ज्वालामुखी पर्वतरांग असून हा परिसर राजधानी खार्तूमपासून जवळपास ९०० किमी अंतरावर आहे. युद्ध आणि सततच्या हल्ल्यांमुळे घरदार गमावलेल्या हजारो कुटुंबांनी या दुर्गम पर्वतीय भागात आसरा घेतला आहे. मात्र, या प्रदेशात मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याने विस्थापितांच्या जगण्याची लढाई आणखी कठीण होत आहे.

## जरांगेना पोलिसांनी हाथ लावल्यास मुस्लिम समाज रस्त्यावर उतरेल जलील यांचा मुंबई पोलिसांना इशारा!

मुंबई: मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मनोज जरांगे पाटील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्यासोबत लाखोंचा मराठा जनसमुदाय मुंबईत गेल्या चार दिवसांपासून ठाण मांडून बसला आहे. ज्यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था आणि मुंबईकरांचे जनजीवनदेखील विस्कळीत झाले आहे. त्यामुळे हे आंदोलन लवकरात लवकर संपावे याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे. याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने जरांगेना मुंबईचे रस्ते तात्काळ मोकळे करून देण्याचे आदेश दिले, तसेच नियमांची पायमल्ली केल्याबद्दल आज मनोज जरांगे आणि त्यांच्या कोअर समितीला दुपारी ३ वाजेपर्यंत आझाद मैदान खाली करण्याची नोटिस मुंबई पोलिसांनी जारी केली होती. ज्यावर मेलो तरी मैदान सोडणार नाही असा पवित्रा जरांगे यांनी घेतल्यामुळे, आंदोलन चिघळण्याची स्थिती निर्माण झाली आहे. अशातच एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील मराठा आंदोलनाच्या समर्थनार्थ मैदानात उतरल्याचे दिसून येत आहे.

आज आंदोलनाच्या पाचव्या दिवशी इम्तियाज जलील यांनी मनोज जरांगे पाटलांची आझाद मैदानावर जाऊन भेट घेतली. जलील यांनी, जरांगे यांना पोलिसांनी हाथ लावल्यास अथवा पोलिसांनी बळजबरी केल्यास मुस्लिम समाज छातीचा कोट करून सर्वात पुढे असेल, असे आश्वासन देत, त्यांना खंबीर पाठिंबा दिला आहे.

मुंबई पोलिस क्शन मोडवर

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. आज दुपारी तीन वाजेपर्यंत रस्ते मोकळे करण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार मुंबई पोलिस क्शन मोडवर असून मुंबई शहरासह नवी मुंबईला छावणीचे स्वरूप आलं आहे. जब्बल ६० हजाराहून अधिक पोलीस रस्त्यावर राज्य सरकारने उतरवले आहे. दरम्यान मुंबई आणि नवी मुंबईतील



चौकाचौकातील आंदोलकांची वाहने आणि आंदोलकांना उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हटवण्यात आले आहे.

जरांगे यांना एमआयएमकडून पाठिंबा!

दरम्यान एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मनोज जरांगे पाटलांची भेट आझाद मैदावर जावून भेट घेतली. त्यांनी यावेळी अगदी पहिल्या दिवसापासून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनास एमआयएमचे अध्यक्ष बॅरिस्टर असेदुद्दिन ओवेसी यांनी पाठिंबा दिला आहे. तसेच त्यांच्या आंदोलनाचा मुद्दा देखील लोकसभेत उचलला आहे. जरांगे पाटील यांची आरक्षणाची मागणी रास्त असून ती सरकारने पूर्ण करायला हवी. ती पूर्ण न करता आता सरकार हे आंदोलन दडपण्याच्या प्रयत्न करत आहे. या आंदोलनाकडे सरकार अजिबात गांभीर्याने बघत नाही. या आंदोलनावर लवकरात लवकर तोडगा काढावा अशी आमची मागणी आहे. मी स्वत: जरांगे पाटील यांचा मोठा फॅन आहे. मी त्यांच्यासोबत कायम आहे व राहणार असेही जलील म्हणाले.

जलील यांनी पुढे म्हंटले की, जरांगे यांच्या या आंदोलनास चखच् चा आणि मुस्लिम समाजाचा पूर्ण पाठिंबा आहे. त्यामुळे मी राज्य सरकार आणि मुंबई पोलीसांना हा इशारा देवू इच्छतो की, जरांगे यांच्यावर बळजबरी करू नका. सरकार अथवा पोलिसांनी बळजबरी केल्यास, हे आंदोलन संपवण्याचा प्रयत्न केल्यास याचे परिणाम भोगावे लागतील. या दडपशाहीच्याविरोधात जितक्या ताकदीने मराठा समाज रस्त्यावर उतरेल, तितक्याच ताकदीने मुस्लिम समाजही त्यांच्या खांद्याला खांदा लावून उतरलेला असेल'. फक्त चारच दिवसात सरकार नोटीशी देऊन सांगते की आता घरी जा. त्यांना शांततेच्या मार्गाने आंदोलन करू द्या. ही लोकशाही आहे, हुकूमशाही नाही, असेही त्यांनी सरकारला ठणकावले आहे.

मराठा आरक्षणासाठी मुस्लिम समाजाकडून मदत?

ओबीसी प्रवर्गातून १० टक्के आरक्षण मिळवण्याच्या मागणीवर हे आंदोलन होत आहे. यासाठी जरांगे समर्थक लाखोंच्या संख्येने मुंबईत दाखल झाले आहेत. पण या गर्दीने मुंबई शहराला वेठीस धरले आहे. इतकेच नव्हे तर आंदोलकांमधील काही हुल्लडबाजांना चेव फुटला आहे. आंदोलन हाताबाहेर आणि नियमाबाहेर जात असल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने तसेच न्यायालयाने कठोर भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र या दरम्यान ईम्तियाज जलील यांचा मराठा आंदोलकांना पाठिंबा हा एका वेगळ्याच राजकीय षडयंत्राचा भाग असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासोबतच जरांगे यांच्या मागे आणखीन कोणकोणत्या छुप्या राजकीय नेत्यांचा पाठिंबा आहे, याच्या तर्कवितर्काला देखील सुरुवात झाली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### देशपांडे कुटूंबियांचा समुद्रमंथनाचा देखावा

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** 'लक्ष्मी नगर येथील ए. सी. देशपांडे कुटुंबीयांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणेशोत्सवानिमित्त आकर्षक देखाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा देखावा विशेष ठरत असून त्यामध्ये 'समुद्रमंथन' हा पुराणातील अद्भुत प्रसंग चित्ररूपात साकारण्यात आला आहे. देव-दानवांच्या प्रतिकृतींसह साकारलेला हा देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

गेल्या २५ वर्षांपासून देशपांडे कुटुंब धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक विषयांवर देखावे साकारत असून प्रत्येक देखाव्याची मांडणी सुबक आणि आकर्षक असते. त्यामुळे भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती नेहमीच पाहायला मिळते. या वर्षीचा समुद्रमंथन देखावा गणेशोत्सवाच्या उत्साहात अधिक रंग भरत असून भाविकांना अद्वितीय अनुभव देत आहे.

### मराठा आंदोलनात तब्येत बिघडलेल्या कार्यकर्त्याला बोंदरगावच्या रुग्णवाहिकेची मदत

**सोनपेठ,दि.०२(प्रतिनिधी) :** सोनपेठ तालुक्यातील बोंदरगाव येथील रुग्णवाहिका मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी होण्यासाठी गेली होती. काल आंदोलनादरम्यान धाराशिव जिल्ह्यातील एका आंदोलकाची अचानक तब्येत बिघडली. मनपा भवन परिसरातील चौकात त्या आंदोलकाला चक्कर येऊन तो कोसळला. यावेळी जवळच उभी असलेली बोंदरगावची रुग्णवाहिका (क्र. एमएच २२ एएन ४६७७) तात्काळ मदतीला धावून आली. चक्कर आलेल्या कार्यकर्त्यास त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि उपचार सुरू करण्यात आले. या वेळी स्वराज्य रुग्णवाहिकेचे संचालक दीपक ज्ञानोबा सपकाळ, तसेच पवन भोसले, पप्पू बचाटे, दिगंबर कदम, पोलीस कर्मचारी आणि इतर कार्यकर्त्यांनी मदत केली.

### घरोघरी मोठ्या हर्षोल्हासात जेष्ठा गौरीचे विधीवत पूजन आणि विसर्जन

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भाद्रपद शुध्द सप्तमीस ज्येष्ठा गौरीचे रविवारी (दि.०१) घरोघरी मोठ्या हर्षोल्हासात आगमन झाले. तर सोमवारी ज्येष्ठा आणि कनिष्ठा गौरीचे घरोघरी विधीवत, मोठ्या थाटामाटात पूजन करण्यात आले.

शहरी व ग्रामीण भागात महालक्ष्मीच्या सणास अनन्यसाधारण महत्व आहे. विशेषतः घरोघरी सामुहीकपणे हा सण साजरा होत आला आहे. त्या निमित्ताने व्यवसाय, नोकरी, शिक्षण वगैरे निमित्त बाहेरगावी असणारे कुटूंबिय आपल्या मूळ गावी, मोठ्या घरी हा सण साजरा करण्याकरीता नित्यनेमाने येत आले आहेत. याहीवर्षी पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर वगैरे महानगरात स्थितरावलेले हजारो कुटूंबिय मूलाबाळांसह या सणानिमित्त मूळ गावी परतले आहेत.

घरोघरी या महालक्ष्मीच्या सणानिमित्ताने भक्कम अशी पूर्व तयारी गेल्या दोन-चार दिवसांपासून सुरु होती. विशेषतः कोथळ्या, पडदे वगैरे सुरक्षित ठेवलेल्या या वस्तू बाहेर काढण्यात आल्या. रविवारी गौरीच्या आगमनाच्या मुहूर्ताच्या पार्श्वभूमीवर सुरक्षितपणे ठेवलेले ज्येष्ठा आणि कनिष्ठा या दोन गौरीचे मुखवटे, मुलांचे मुखवटे बाहेर काढल्या गेले. गौरीच्या आवाहनाचा रात्री ७ वाजून ५२ मिनीटापर्यंतचा शुभमुहूर्ता साधून कुटूंबियांनी गौरीला आसनस्थ केले. सोमवारी मोठ्या हर्षोल्हासात ज्येष्ठा गौरीचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ गौरीच्या पुजनाचा मुहूर्त साधण्याकरीता कुटूंबियांची मोठी तारांबळ उडाली.

दरम्यान, महालक्ष्मी सणाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणच्या बाजारपेठांमध्ये खरेदी करीता नागरीकांची मोठी गर्दी उसळली. विशेषतः पुजेचे साहित्य, सजावटीचे साहित्य खरेदीकरीता नागरीकांची मोठी झुंबड उडाली. मध्यवस्तीतील गांधी पार्क, गुजरी बाजार, क्रांती चौक, वसमत रस्त्यावरील विद्यापीठ प्रवेशद्वारे तर जिंतूर रस्त्यावरील गणपती चौक वगैरे भागात खरेदीकरीता नागरीकांची मोठी गर्दी उसळली.

### निवळी खुर्द येथील निराधार महिलेस उदरनिर्वाहासाठी शेळी व करडू भेट

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अॅन्ड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे गौरी गणपती सणाच्या निमित्ताने जिंतूर तालुक्यातील निवळी खुर्द येथील निराधार विधवा महिला सिंधुताई कांदे यांना उदरनिर्वाहासाठी शेळी व करडू तसेच जीवनावश्यक किराणा साहित्य भेट देण्यात आले.

सिंधुताई कांदे या निवळी खुर्द (ता. जिंतूर) येथील रहिवासी असून त्यांच्या पतीचे काही महिन्यांपूर्वी किडनीच्या आजाराने दुर्दैवी निधन झाले. वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी वैधव्य आलेल्या सिंधुताई यांना सासर-माहेरचा आधार नसल्याने त्या सध्या शेतमजुरी करून उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांना नऊ वर्षांची एक मुलगी असून, अद्याप त्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यांच्या या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीची माहिती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुंगळाचे शिक्षक प्रकाश डूबे यांनी घेऊन एचएआरसी संस्थेकडे मदतीसाठी आवाहन केले.

या सामाजिक उपक्रमासाठी जिल्हा उद्योजक पुरस्कारप्राप्त साईबाबा इंडस्ट्रीजचे संतोष वट्टमवार यांनी पुरस्काराची रक्कम आणि वैयक्तिक देणगी मिळून एकूण १५,००० रुपये दिले. या निधीतून सिंधुताई यांना शेळी आणि करडू देण्यात आले. तसेच आलोक जोशी, संतोष बारबिंदे, दिनकर चौधरी यांच्या मदतीतून एक महिन्यापुरते जीवनावश्यक किराणा साहित्य देऊन त्यांचा उदरनिर्वाह सुलभ करण्यासाठी हातभार लावण्यात आला.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पालम -पुयनी रस्त्यावरील वळण रस्ताच गेला वाहून

## परभणी जिल्हयाचे नुतन जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी केली नुकसानीची पाहणी

**शांतीलाल शर्मा**

**पालम /प्रतिनिधी-** तालुक्यात गेल्या आठवडयात मुसळधार पावसामुळे पालम - पुयनी रस्त्यावरील पर्यायी वळण रस्ता पूर्णपणे वाहून गेला, यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद झाली.याचा फटका स्थानिक नागरिकांसह अनेक गावाच्या रहदारीवर मोठ्या प्रमाणात बसत असून या पार्श्वभूमीवर परभणीचे जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी दि.३१रोजी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.



परभणी जिल्हाधिकारी चव्हाण यांनी या भेटी दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने पर्यायी वळण रस्ता सुरू करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक आहे. त्या सर्व उपाययोजना युध्दपातळीवर राबवण्याचे निर्देशही दिले. प्रशासनाकडून स्थानिक नागरिकांना सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात येणार असून लवकरात लवकर रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी यंत्रणा कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार उषाकिरण शृंगारे,नायब तहसिलदार कटारे,मंडळ अधिकारी साहेबराव चिकटे, आलेवार,महसूल स. शिवप्रसाद वाव्हळे, तलाठी जालने यांच्या सह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

## मजूराला मारहाण करुन मोबाईल व रोकड लुटणारे ताब्यात

**जिंतूर,/प्रतिनिधी-** शहरात दिवशा ढवळ्या धक्कादायक घडलेला दरोडा अखेर उघड की आला काही वेळातचोऱ्या करणारे व दरोडा टाकणारे चोर पकडण्यात पोलिसांना यश बस स्थानकाच्या मागच्या बाजूस शुक्रवारी एका मजुराला चाकूचा धाक दाखवून हो मारहाण करून त्याच्या जवळील मोबाईल व रोख रक्कम हिसकावून घेण्यात आली होती मिळालेल्या माहितीनुसार शे मोबीन शे मोईन राहणार साबुन बेस जिंतूर हे शुक्रवारी दुपारी परभणीला जात असताना जिंतूर बस स्थानकावर आले असता बस स्टॉपच्या मागच्या बाजूस गेले असता एका मोटरसायकल वर आलेल्या दोघांनी त्यांना पकडले एका नेत्याच्या पोटाला चाकू लावला व दुसऱ्याने त्याला जीवे मारण्याची धमकी दिली असता व त्याच्या खिशातील मोबाईल आणि रोख रक्कम हिसकावून घेतले नंतर हे दरोडेखोर त्या ठिकाणाहून पळून गेले त्यानंतर फिर्यादीने तात्काळ जिंतूर पोलीस ठाण्यात गाठून जिंतूर पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी तात्काळ आपल्या कर्मचाऱ्यांना शोधण्याचे आदेश देण्यात आले त्या पथकामध्ये एस आय श्री जेकेवाड साहेब पोलीस शिपाई चव्हाण पोलीस शिपाई सावंत यांनी येलदरी रोडवर संशयित हालचालीवरून दोन अज्ञात आरोपींना ताब्यात घेण्यात आले पोलिसांनी चौकशी करता आरोपी मात्र त्यांना उडवा उडवी चे उत्तर देत होती त्यांच्याकडून सखोल चौकशी करीत असता त्यांच्या जवळील मोबाईल चाकू व चोरीचे साहित्य चोरलेले सामान पोलिसांनी खाकीचा दाख दाखविता पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आरोपी हे आंध्र प्रदेशातले रहिवासी असल्याचे समजते आरोपींना हिंदी व मराठी भाषा येत नव्हती आरोपीला जिंतूर न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी मिळाल्याचे समजते जिंतूर पोलिसांनी गुन्ह्याचा शोध लावल्यामुळे जिंतूरचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे व पोलीस कर्मचाऱ्यांचे नागरिकांनी जोरदार स्वागत होत आहे असे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सरोदे जिंतूर ला आल्यामुळे जिंतूरच्या नागरिकांनी व व्यापारी वर्गातून त्यांचे मनापासून स्वागत करण्यात येत आहे.



### पालम भारतीय जनता पार्टी कडून नवनिर्वाचित नगराध्यक्षाचा सत्कार सपंन्न

**पालम,/प्रतिनिधी-** येथे जेष्ठ नेते जियाभाई पठाण,व युवा नेते इमदादभाई पठाण,यांच्या मातोश्री अनवरी बेगम हिदायतुल्लाखा पठाण यांची पालम नगरपंचायत च्या नगराध्यक्षापदी निवड झाल्या बद्दल सत्कार करताना भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सदस्य लिंबाजीराव टोले,भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य, शिवाजीराव दिवटे, कामाजी पाटील, गायकवाड मामा, चेअरमन आनंदराव कराळे, मुंजाभाऊ रोकडे,जळबाजीराव फुले, भारतराव इचनर,बसवेश्वर लिंगायत, रोकडे उपस्थित राहून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जिंतूरात कुस्ती स्पर्धेत कुस्ती पट्टूंचा मोठा प्रतिसाद



**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुकास्तरिय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुस्तीपट्टूनी मोठया संख्येने स्पर्धेत भाग घेवून आपला सहभाग नोंदवूला तसेच जल्लोषात ही स्पर्धा संपन्न झाली. कै, किशनरावजी चव्हान केंद्रीय माध्य. निवासी शाळा जिंतुर १) अशामति साबळे , ( १)मयुरी बुधवंत, वय गट १७ मधून दोन्ही मुलींनी प्रथम क्रमांक पटकावल्या मूळ शाळेमध्य. कौतुक केले शाळेचे मुख्यद्यापक,वाकळे सर, यशस्वी करण्यासाठी शेख, निसार सर यांनी विशेष मार्गदर्शन केले.



**परभणी- गंगाखेड येथे विसर्जन गणपती विसर्जन मार्ग व गणपती विसर्जन स्थळाची पाहणी करून आवश्यक सूचना निर्गमित केल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे पोलीस निरीक्षक श्रीकांत डोंगरे मुख्याधिकारी जयवंत सोनवणे नायब तहसीलदार अजीम व इतर अधिकारी कर्मचारी दिसत आहेत.**



**परभणी-महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या वर्षा निवासस्थानी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना दिदि साकोरे बोर्डीकर व त्यांचे पती साकोरे साहेब मुलगा व मुलगीयांनी आपल्या कुटुंबासहित गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.**

### नदी काठच्या शेतकऱ्यांवर सणासुदीच्या काळात दुःखाचे डोंगर सण कसे करावे साजरे...?

**पालम,/प्रतिनिधी-** गणराया आणि गौरी पूजन या सणाला सुरुवात झाली आहे हा सण उत्साहाने साजरा करायचा पण शेतकऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळल्यामुळे सण कसे करावे हा प्रश्न बऱ्याच शेतकऱ्यांना पडला आहे.



गौर पूजन ला ग्रामीण भागात वेगवेगळ्या प्रकारचे गौरीच्या समोर विविध धान्याचे राशी ठेवण्याचा एक प्रकार असतो नवीन धान्य या धान्याची राशी ठेवतात असे सांगतात खरंतर निसर्गचक तोडणीला आलेल्या मुग पिकांची पूर्ण मात्रे करून सोडले आहे त्यामुळे त्यावर खर्चही मोठ्या प्रमाणावर केलेला असला तरी काही नदीकाठच्या शेतकऱ्यांना मात्र या पिकांची फक्त पालाच पाहायला मिळाला आहे शेतकऱ्यांचे कोणतेही पिके घरापर्यंत येत नाही तोपर्यंत शेतकरी समाध्यान होत नाही.एवढी मेहनत करून शेवटी निराश होण्यास वेळ शेतकरी आली आहे. बऱ्याच वेळा अवकाळी पावसामुळे सोयाबीन पिके कापणिस आले असता पिक पाण्यात तरंग असल्याचे चित्र सध्यातरी पहावयास मिळत आहे. या पाण्यामुळे शेतातील माती सुद्धा खरडून गेली आहे. आता पुढे कसे करावे हेच प्रश्न पडला आसुन यापुठे सण कसे साजरे करावेत असा प्रश्न नदी काठच्या शेतकरी वर्गाला पडला आहे.

# नवसाला पावणारा सोनपेठ तालुक्यातील चिंतामणी

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** विटा खुर्द येथील गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या चिंतामणी गणपतीची नवसाला पावणारा गणपती अशी परिसरात ओळख आहे. त्यांची महती ही थोर असल्यामुळे जिल्हाभरातून अनेक गणेश भक्त येथे दर्शनासाठी येत असतात व मनोभावाने आपल्या इच्छा देवासमोर मांडून इच्छा पूर्ण होतात पुन्हा नवस फेडण्यासाठी चिंतामणीच्या दर्शनासाठी आवर्जून येतात. त्यामुळे गणेश उत्सवामध्ये येथे नागरिकांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होताना दिसत आहे.

येथील चिंतामणी गणेशाची अनुभूती अनेक भक्तांना येत असून चिंतामणी स्थापनेचा इतिहास खूप वेगळा आहे. तो असा की, गौतम ऋषींच्या गोहत्या नाशासाठी ब्रह्मगिरी पर्वतावर गोदावरी नदींचा उगम झाला आणि दक्षिणगंगा गोदावरी तीरावर अनेक तीर्थक्षेत्रे निर्माण झाली. त्यामध्ये श्रीक्षेत्र नाशिक, पैठण, आपेगाव, राक्षस भुवन, रत्नेश्वर रामपुरी, गंगामसला, पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, वाणी संगम नंतर मुदगल व याच परिसरामध्ये विटा खुर्द येथे नवसाला पावणाऱ्या गणपतीचे प्रसिद्ध चिंतामणी मंदिर गोदाकाठी आहे. पूर्वाभिमुखद्वार असणारे चिरेबंदी बांधकाम केलेले मंदिर असून, आतमध्ये उत्तरेकडे मुख असणारी स्वयंभू चिंतामणीची मूर्ती आहे. मंदिर परिसरामध्ये तीर्थ म्हणून बारव विहीर आहे. बारवाचा काही भाग पडलेला आहे. ब्रह्मपुराणामध्ये ब्रह्म चिंतामणी गणपती, श्री चितामणी गणपती, वाण गोदावरी तीरावर वाणी संगम येधील वाघेश्वर, मुद्दल येथील मुदगलेश्वर, नरसिंह शेळगाव येथील शालिग्राम महाविष्णू, धार येथील श्री लक्ष्मी असे मुङ्गल पंचायतन सोनपेठ परिसरामध्ये पूर्वाधार पणे विद्वानांनी मान्य केले आहे. मंदिराच्या निर्मितीचा इतिहास सांगताना सोनपेठ येथील भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज जोशी यांनी चिंतामणी मंदिराचा पुरातन इतिहास नमूद करताना सांगितले की, स्वराज्याचा विस्तार करताना पेशव्यांनी निजामाचा, राक्षस भवन येथील लढाईत पराभव केला. पेशव्यांना तहामध्ये चौथाई महसूल देण्याचे निजामाने मान्य करून स्वतला स्वराज्याचा भाग करून घेतले. ८० टक्के हिंदू प्रजा असल्यामुळे राज्यकारभार चालवण्यासाठी हिंदू पंतप्रधानपद निजामी राजवटीत निर्माण केल्या गेले.महाराजा प्रसाद यांना पंतप्रधानपद दिले. पुढे त्यांच्या वंशामध्ये अत्यंत कर्तबगार व बुद्धिमान असणाऱ्या महाराजा किशन प्रसाद यांना १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात निजामाचा पंतप्रधान म्हणून कारभार देण्यात आला. त्यांना परतूर जिल्ह्याची जहागिरी होती. यामध्ये सोनपेठ तालुका हा महाराजा किशन प्रसाद यांच्या जहागिरीत होता. या तालुक्यामध्ये विटा खुर्द येथे स्वयंभू श्री चिंतामणी गणपती मंदिराची निर्मिती इसवी सन अठराव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये ३२५ वर्षापूर्वीची असावी असे मत अभ्यासक व्यक्त करतात. मंदिराच्या निर्मितीनंतर पूजा आर्चेसाठी पुणे येथून आलेल्या दीक्षित घराण्याला ग्राम जोशी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. आजही ती परंपरा अव्याहतपणे चालू आहे. श्रीगणेश चतुर्थी, माघ शुद्ध चतुर्थी, गणेशा उत्सव, प्रत्येक संकष्टी चतुर्थी, चतुर्थी उद्यापन, गणेश याग असे धार्मिक कार्यक्रम चिंतामणी मंदिरात सातत्याने सुरू असतात.

चिंतामणी ची महती


पूर्वी मंदिराला किंमत म्हणून इनामी जमीन होती या ठिकाणी प्रत्येक संकष्टी चतुर्थीला सोनपेठ येथून शेकडो महिला पुरुष भावीक पायी वारी करतात. मंदिराच्या पूजा अर्च व अभिषेकानंतर आरती होते. प्रत्येक संकष्टी चतुर्थीला चितामणी प्रतिष्ठानच्या वतीने भाविकांना फलाहार वाटप केल्या जातो. प्रत्येक मंगल कार्याचे शुभारंभी चिंतामणी गणपतीला आमंत्रण पत्रिका, लग्नपत्रिका ठेवणाऱ्या भाविकांची संख्या खूप मोठी आहे. प्रत्येक मंगल कार्यानंतर वधू-वर चिंतामणी गणपतीच्या दर्शनाला येत असतात. अनेक जण संकटामध्ये, दुःखामध्ये मनातील इच्छा पूर्तीसाठी नवसाला पावणारा श्री चिंतामणी गणपतीला नवस करतात. भाविकांच्या मनातील इच्छा पूर्ण होताच पुन्हा नवस फेडण्यासाठी भाविक येथे येत असतात. म्हणून नवसाला पावणारा श्री चिंतामणी गणपती सोनपेठ सह परभणी जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध आहे.

गंगा या मंदिराचे भक्त म्हणून स्वर्गीय आमदार उत्तमराव विटेकर यांनी विकास कार्य सुरू केले होते. तसेच आमदार राजेश विटेकर व त्यांचे बंधू श्रीकांत विटेकर हे या चिंतामणी मंदिराची अविरत सेवा करत आहेत. विद्यमान आमदार राजेश विटेकर मंदिर परिसराचा विकास मोठ्या प्रमाणात व्हावा यासाठी कार्यरत आहेत. महाराष्ट्र शासनाकडून तीर्थक्षेत्र दर्जा प्राप्त करून विकास निधी प्राप्त व्हावा यासाठी प्रयत्न केल्या जात आहेत. विकासाच्या माध्यमातून जुन्या मंदिराचा जिर्णोद्धार, मंदिर परिसरामध्ये ध्यान मंडप, वेद पाठशाळा, वारकरी शिक्षण संस्था, भाविकांच्या निवासासाठी धर्मशाळा, धार्मिक कार्यक्रमासाठी सभामंडप, मंगल कार्यालय अशी समाज उपयोगी उपक्रम राबवण्याची गरज आहे.



**खासदार संदिपान भुमरे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील सातारा देवळाई मधील आलोक नगर येथील त्रिदेवता गणेश मंडळ, सत्कर्म नगर राजा गणेश मंडळ, हिंदू गणेश मंडळ, मृत्युंजय गणेश मंडळ, विघ्नहर्ता गणेश मंडळ, छत्रपती नगर मधील विघ्नहर्ता गणेश मंडळ, मोरया गणेश मंडळ, गंगोत्री गणेश मंडळ, काळभैरव प्रतिष्ठान या गणेश मंडळांना भेट दिली. यावेळी गणरायाला वंदन करून श्री गणरायाची मनोभावे आरती केली तसेच उपस्थित गणेश भक्तांना शुभेच्छा दिल्या.**

# प्रा.सतीश जोगदंड यांना कलारत्न पुरस्कार प्रदान



छत्रपती संभाजीनगर, दि.२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागातील प्रा.सतीश दामोदर जोगदंड यांना कलारत्न पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. वामनदादा कर्डक यांच्या १०३ व्या जयंती निमित्त संत कबीर कलामंच शिऊर तालुका वैजापूर यांच्या वतीने प्रा. जोगदंड यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल कलारत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिऊर येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात विलास पगारे, बाबासाहेब त्रिभुवन, रुपेश पठारे, बाबासाहेब पगारे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. ३५ हून अधिक वाद्ये वाजविण्यात प्रा. जोगदंड हे पारंगत असून त्यांच्या या गौरवाबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, विभागप्रमुख डॉ. राजू सोनवणे, प्रा. राहुल खरे, प्रा. गौरव ढोले, वेदांत लोखंडे यांनी अभिनंदन केले आहे.

## हजरत शेख मुन्तजबोद्दीन जर जरी बक्ष यांचा उर्स महोत्सवमुळे वाहतूक मार्गात बदल

छत्रपती संभाजीनगर, दि.२ – हजरत शेख मुन्तजबोद्दीन जर जरी बक्ष यांचा ७३९ वा उर्स महोत्सव दि. १ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर दरम्यान खुलताबाद येथे होत आहे. या कालावधीत वाहतुकेची कोंडी निर्माण होऊ नये यासाठी खुलताबादला जाणारी व येणारी जड वाहतूक मार्गात बदल करण्यात येत असल्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड यांनी निर्गमित केले आहेत.

**वाहतुक मार्गातील बदल याप्रमाणे–**१. कन्नड – वेरुळ – खुलताबाद – दौलताबाद – छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतूक – कन्नड – वेरुळ – कसाबखेडा फाटा – वरझडी – माळीवाडा – शरणापूर फाटा – मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे या मार्गाने जाईल २. छत्रपती संभाजीनगर – दौलताबाद – खुलताबाद – वेरुळ – कन्नडकडे जाणारी वाहतूक– छत्रपती संभाजीनगर – शरणापूर फाटा – माळीवाडा – वरझडी – कसाबखेडा फाटा – वेरुळ मार्गे कन्नड कडे जाईल. ३. फुलंब्री – सुलतानपुर – खुलताबाद – वेरुळ – कन्नड कडे – जाणारी वाहतूक फुलंब्री – छत्रपती संभाजीनगर – शरणापूर फाटा – माळीवाडा – वरझडी – कसाबखेडा फाटा – वेरुळ मार्गे कन्नडकडे जाईल,असे कळविण्यात आले आहे.

## लोकशाही दिनी २० अर्ज प्राप्त

छत्रपती संभाजीनगर, दि.२ – जिल्हास्तरीय लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडला. यावेळी २० तक्रारी अर्ज प्राप्त झाले. जिल्हा परिषद – २ अर्ज, महसुल विभाग – २, पुरवठा विभाग – १, इतर साधे निवेदन १५ असे एकूण २० अर्ज प्राप्त झाले, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातून देण्यात आली.

## महा मोदक अभियानाचे अनावरण केले

पुणे : स्टार युनियन दाई–इची लाइफ इन्शुरन्स (एसयूडी लाईफ) ने पुण्यात सुरू असलेल्या गणेशोत्सवानिमित्त आपले नवे अभियान एसयूडी लाईफ महा मोदक सुरू केले आहे. या उपक्रमाचा उद्देश राज्यातील सर्वात मोठ्या उत्सवासोबत सांस्कृतिक नाळ मजबूत करून कुटुंबांचे संरक्षण व जीवन समृद्ध करण्याच्या ब्रँडच्या मूलभूत मूल्यांना अधोरेखित करणे तसेच प्रादेशिक स्तरावरील बांधिलकी अधिक दृढ करणे हा आहे. ३० ऑगस्ट २०२५ ते ५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत महा मोदकच्या माध्यमातून समाजाशी अर्थपूर्ण संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमाद्वारे एसयूडी लाईफच्या उपाययोजनांबद्दल जनजागृती केली जाईल, इच्छुक सल्लागारांसाठी करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील तसेच पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्वही अधोरेखित केले जाईल.

## लेगसीने लाँच केला 'बड्डी पॅक'

छत्रपती संभाजीनगर : बकार्डीची भारतात तयार केलेली पहिली प्रीमियम व्हिस्की लेगसी आता बड्डी पॅक लाँच करून प्रीमियम अनुभव अधिक सुलभ बनवत आहे. कंपनीने १८० मिलीचा हा सिंगल–सर्व्ह फॉरमॅट बाजारात आणला आहे, जो सोयीस्कर असूनही गुणवत्तेत तडजोड करत नाही. तुमचा परफेक्ट साथीदार, कधीही कुठेही या टॅगलाइनप्रमाणेच हा बड्डी पॅक आयुष्यातील अनपेक्षित आनंदाच्या क्षणांसाठी जसे की, ऑफिसनंतर मित्रांसोबतच्या गप्पा, विकेंड ट्रॅव्हल अॅडव्हेंचर्स किंवा छोट्या खासगी सेलिब्रेशन्ससाठी खास तयार करण्यात आला आहे. स्कॉटिश आणि परिपक्व भारतीय माल्ट्स तसेच भारतीय धान्यांचे खास मिश्रण वापरून तयार केलेला बड्डी पॅक लेगसीचा स्मूद आणि परफेक्ट बॅलन्स्ड फ्लेवर देतो, जो कुठल्याही प्लॅनमध्ये सहज एन्जॉय करता येतो. प्रवासात असो किंवा फक्त योग्य प्रमाणात पेग हवा असेल अशा प्रसंगांसाठी तो उत्तम आहे, कारण तो असा मित्र आहे जो नेहमी, कुठेही तुमच्यासोबत तयार असतो.

## प्रत्येक घराची एक कहाणी

प्रत्येक घराची एक कहाणी असते – काही जपलेल्या तर काही कधीच न सांगितलेल्या. आपल्या नव्या 'आपका अपना झी' या ओळखीतून झी टीव्ही घेऊन येत आहे 'कहानी हर घर की' हा एक हृदयाला भिडणारा नॉन–फिक्शन फॉर्मेट आहे, जो भारतीय महिलांना त्यांच्या न बोलल्या गेलेल्या सत्य गोष्टी मोकळेपणाने सांगण्यासाठी एक सुरक्षित आणि आधार देणारा मंच उपलब्ध करून देतो.

**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**
फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
जा.क्र कावी/नप/SUH-२०२५-२६/१४९८ दिनांक ०२/०९/२०२५

**ई - निवीदा सुचना (दुसरी वेळ)**

नगर परिषद, हिंगोली अंतर्गत नगर परिषद निधी मधुन हिंगोली शहरातील बेघरांना निवारा देखभाल व व्यवस्थापना करीता अनुभवी सेवाभावी संस्था / अशासकीय संस्था / अंतर्गत नोंदणी कृत सक्षम व अनुभवी संस्था कडुन ई– निवीदा पध्दतीने निवीदा मागविण्यात येत आहेत. सदर निवीदा बाबतचा तपशील अटि व शर्ती महाराष्ट्र शासनाचे https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

मुख्याधिकारी नगर परिषद, हिंगोली

(अरविंद मुंढे)
मुख्याधिकारी
नगर परिषद, हिंगोली

# मरणोत्तरही जग पाहण्यासाठी करा नेत्रदान- डॉ. अर्चना पाटील वरे

छत्रपती संभाजीनगर, दि.२ – बुब्बुळामुळे येणारे अंधत्व दूर करण्यासाठी मरणोत्तर नेत्रदान करुन अंध व्यक्तीस बुब्बुळाचे प्रत्यारोपण करणे हा एकमेव मार्ग होय. अशाप्रकारे नेत्रदान करुन आपण दृष्टिचे दान करुन मरणोत्तर ही हे जग पाहू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करावा,असे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्रविभागाच्या प्रमुख डॉ. अर्चना पाटील वरे यांनी केले.





नेत्रदान पंधरवड्यानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 'नेत्रदान व नेत्राची घ्यावयाची काळजी', याबाबत डॉ. अर्चना पाटील वरे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे अध्यक्षस्थानी होते. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, नेत्रतज्ज्ञ डॉ. शोभा झंवर आदी उपस्थित होते.

डॉ. अर्चना पाटील म्हणाल्या की, आपल्या देशात बुब्बुळामुळे आलेल्या अंधत्वाचे प्रमाण मोठे आहे. ह्यापैकी १टक्के लहान बालके असतात. दर वर्षी ३० हजार लोकांना नेत्रबुब्बुळांची गरज भासते. प्रत्यक्षात केवळ ३ हजार बुब्बुळेच प्राप्त होतात. त्यामुळे नेत्रदान विषयक जनजागृती होणे आवश्यक आहे. नेत्रदान कुणीही करु शकतो. मृत्यूनंतर ६ तासांच्या आत मृतदेहाचे डोळे काढण्याचे काम नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी करतात. त्यामुळे नेत्रदानासाठी आपले नाव नोंदवा. मृत्यूनंतर जवळच्या नेत्रपेढीशी आपल्या नातेवाईकांमार्फत संपर्क साधून नेत्रदान केले जाते,अशी माहिती डॉ. पाटील यांनी दिली.

नेत्रदानाविषयक जनजागृतीपर पथनाट्य यावेळी सादर करण्यात आले. प्रास्ताविक एकनाथ बंगाळे यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आपला मनोगतातून नेत्रदान संकल्प करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# गृहपयोगी संचाचे वाटप पूर्णतःनिःशुल्क– संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि. २ – महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ व मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. यांच्या मार्फत जिल्ह्यातील १५ वितरण केंद्रांवर होत असलेल्या गृहपयोगी संचाच्या वाटपाबाबतच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यात त्यांनी हे वितरण पूर्णतः निःशुल्क असून कुणाकडून पैशांची मागणी केल्यास तात्काळ पोलिसांत तक्रार द्यावी असे आवाहन त्यांनी केले असल्याचे सहाय्यक कामगार आयुक्त ग.भा. बोरसे यांनी कळविले आहे.

बैठकीत वितरण केंद्र प्रतिनिधींना संचाचे वाटप मंडळाच्या नियमानुसार पूर्णतः निःशुल्क करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. केंद्रावर आर्थिक व्यवहार होत असल्यास संबंधित केंद्रावर तातडीने कारवाई करून ते बंद करण्यात येईल, असेही पालकमंत्री यांनी सूचना केल्या.

संच वाटप मंडळाच्या आदेशानुसार भेट पद्धतीने (Appointment System) होणार असून, लाभार्थ्यांनी http://hikit.mahabocw.in/appoinment या संकेतस्थळावर भेट देऊन नियोजित वेळ घेऊन संच मिळवण्यासाठी दिनांक व वितरण केंद्राची निवड करावी लागणार आहे. कामगारांनी ओळखपत्र/आधारकार्ड व नियुक्ती पत्र घेऊन उपस्थित राहिल्यानंतरच संच प्रत्यक्ष दिला जाईल.

कामगारांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणत्याही एजंट, संघटना किंवा त्रयस्थ व्यक्तीकडे न वळता थेट मंडळाच्या प्रणालीतून संच मिळवावा. पैशांची मागणी केल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा नियुक्ती पत्रावरील क्रमांकावर तक्रार दाखल करावी.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'ऑपरेशन सिंदूर विजय' थीमची धूम !

## महाराष्ट्र राज्यात गणेश देखाव्यामध्ये एकमेव,प्रथमच संकल्पना-गणेश उत्सवात यात्रेचे स्वरूप

छत्रपती संभाजीनगर – गणेशोत्सवाचे औचित्य साधत कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळ तर्फे आगळीवेगळी व राष्ट्रभक्तीने परिपूर्ण अशी थीम सादर केली आहे . 'ऑपरेशन सिंदूर विजयीत्सव यात्रा'. हा देखावा भारतीय सैन्याच्या शौर्यगाथेवर आधारित असून, ऑपरेशन सिंदूर विजयच्या माध्यमातून देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. अत्याधुनिक लाईटिंग, ध्वनी–प्रभाव,युद्ध प्रसंगांचे सजीव देखावा युद्धभूमीचा थरार व यात्राचे स्वरूप,यामुळे हा देखावा प्रत्यक्ष कुटुंबासह पाहावा असा आहे.

देशभक्ती आणि श्रद्धा यांचा सुंदर संगम साधणारा हा देखावा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत मंडळाचे आहे.

जाऊ या गणेश जत्रेला ! कुलस्वामिनीला !!



गेली १६ वर्षापासुन सतत नाविन्यपूर्ण,सामाजिक,सांस्कृतिक ,लोकोपयोगी,अनेक पुरस्कार प्राप्त भव्य इको फ्रेंडली देखावा करणारे एकमेव मंडळ असुन मंडळाचे हे सतरावे वर्ष आहे. या वर्षीचा देखावा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

देखाव्याची माहिती– भारत पाकिस्तान चा हा देखावा २५ बाय २५ फूट असा भव्य आहे. या मधे भारत नकाशा १५ फुट मोठा असुन भारत माता ६ फुट दाखवण्यात आली आहे. बाजूस इंडिया–पाकिस्तान बॉर्डी व रन गाडी,युद्ध नौका,पाणबुडी,युद्ध नौका,मिसाईल,मिल्ट्री तैनात असल्याचे दाखवले असुन त्या बॉर्डी पलीकडे पाकिस्तान नकाशा ५ फुट मधे आहे;ज्या मधे सिंदूर ऑपरेशन करून उध्वस्त केलेले नऊ ठिकाण सुबक रीतीने दाखवले आहे. हा एक भारताचा मोठा विजय आहे;त्या मुळे प्रत्येक भक्त,भारताचा जयजयकार करत मिनी ट्रेन मधे हातात तिरंगा घेत भारताच्या भोवती जयघोष करतात,अशी व्यवस्था देखाव्यात केली आहे. आतंकवादी बंकर,तळघर १० फुट रुंद व ६० फुट लांब असुन त्या मधे आतंकवादी लपल्याचे दाखवण्यात आले आहे.या आतंकवाद्याना प्रत्येक भाविकाकडून बंदुक ने गोळी मारता येईल व अंधार कोठडीतील जिवंत आतंकवादी ला गुद्दे,काठी मारता येईल,अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

वापरलेले साहित्य–१५० रिकामी टाकाऊ पोत्याची गोणी,सीमेंट ६ बैग,१० लिटर रंग,१० लाकडी शीट,शेततळ्याची पन्नी ३०फुट,काही भंगार,टाकाऊ साहित्य ,बैलगाडी बैल सजावट सह,पताका १२०० फुट,लाकडी बांबू ८०

यात्रेतील खेळ–२० फूटी राउंड ट्रेन,२० फूट ट्रॅम्पलिंग,कट पुतळी,शूट बंदूक चार ,मुलांसाठी १५ फुट कृत्रीम तलाव व त्या मधे दोन बोटी,रिंग गेम,सजवलेली बैलगाडी. महाराष्ट्रात प्रथमच गणेश उत्सवात यात्रेचे स्वरूप देणारे एकमेव मंडळ . दोन आठवड्यापासून १५ मंडळाचे सदस्य एकत्र येत काम करत होती . सजवण्यात आलेल्या बैल जोडी व बैलगाडी तून लहान थोर याना बसवून चला जाऊ यात्रासाठी सफर ची व्यवस्था!

# गणेशोत्सवच्या पार्श्वभूमीवर बनोटी, तिडका पोलीसांचा रूट मार्च;शांततेचे आवाहन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ सप्टेंबर – गणेशोत्सवच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस तैनात झाले आहे त्यासाठी बनोटी,तिडका शांततेचे आवाहन करत मंगळवार (दि.२) बनोटी,तिडका येथे पोलीसांनी रूट मार्च काढला यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली बनोटी,तिडका येथे बाजार पट्टा, बसस्थानक परिसर आदी भागातून सोयगाव पोलीसांचा रूट मार्च निघाला यावेळी गणेशोत्सव काळात बनोटी, तिडका वासियांनी शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी केले.



बनोटी व तिडका विविध भागातून हा रूट मार्च काढण्यात आला होता.यावेळी पोलीसांनी गणेश भक्तांना शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,राजू बर्डे,गजानन दांडगे,नारायण खोडे,अजय कोळी,संजय सिंगल,कुनाल जाधव,मिर्झा सर,गृहरक्षक दल गजानन गोतमारे,साहेबराव सोनवणे,योगेश बोखारे,विनोद इंगळे,कडूबा बावसकर,ऋषिकेश काळे,राजू पिंजारी,सुनिल सोनवणे,गोकूळ काटकर,अंकुश राठोड,ज्ञानेश्वर राऊत, शांताराम मिसाळ,शाकीर पठाण,शेख शकील शेख,रवींद्र सरोदे,संगिता भालेराव,आरती न्हावी आदीनी रूट मार्च काढला होता.....

गणेशोत्सव साठी सोयगाव पोलीस स्टेशन हद्दीतील गावात कडेकोट बंदोबस्त असून २४ तास पोलीस तैनात करण्यात आले आहे सध्या स्थानिक पोलीस ठाण्याचे २५ कर्मचारी दोन अधिकारी व गृहरक्षक दल याप्रमाने बनोटी व तिडका हद्दीतील गावात बंदोबस्त तैनात करण्यात आला असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी सांगितले.

# सत्याचे पालन करण्यासाठी धैर्य, संयम व स्पष्ट वक्तेपणा आवश्यक – आ.डॉ.प्रणासागरजी महाराज

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.खडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य डॉ.प्रणामसागरजी महाराज यांचा भक्तांबर प्रभावना चातुर्मास उत्साहात सुरै असुन त्यांच्या सानिध्यात पर्युषण पर्वा निमीत्त विविध धार्मिक कार्यकमाचे विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले असुन आज सर्वप्रथम सकाळी भगवान शांतीनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी शैलेद्र सेठी, शांतीधारा कर्ता प्रदिपकुमार अजितकुमार कैलासचंद सुनिल पाटणी परिवार यांच्या वतीने शांतीधारा करण्यात आली. तसेच आज राष्ट्रसंत



तरैणसागरजी महाराज यांच्या ७ व्या समाधी दिवस निमीत्त फोटोला माल्यार्पन करण्याचे सौभाग्य बाहुबली चेतन गंगवाल परिवार यांना मिळाला. तसेच डॉ.प्रणामसागरजी महाराज यांच्या पादपक्षालनाचा मान डॉ. आशिषकुमार अशोककुमार पाटणी यांना मिळाला. तसेच विविध भक्तांकडुन भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी कार्यकमाचे प्रास्ताविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले. यावेळी पंचायत सचिव प्रकाश अजमेरा, किरण पहाडे, महावीर ठोले, यतीन ठोले, ललीत पाटणी, निता ठोले, चंदा कासलीवाल,सतोश सेठी अरून पाटनी जितेंद्र पाटनी चातुर्मास कमिटी अध्यक्ष अनिल कासलीवाल, डॉ.प्रकाश पापडीवाल, अप्पु पाटणी, गुरै परिवाराचे सुनिल सेठी, काजु कासलीवाल, सागर पाटणी, विजय चांदीवाल, निलेश सेठी, समीर ठोले अमोल पाटणी, अशोक अजमेरा, पवन पाटणी, स्नेहल पहाडे, शुभम पांडे, मनि लोहाडे, अंकुर साहुजी, श्रेंणीक कासलीवाल, सुरेखा पाटणी, शैलेश पहाडे, वैभव काला, राजकुमार पांडे, कांताबाई पहाडे, प्रमोद पांडे, रवि सेठी, संजय पहाडे, डी बी पहाडे रमेश पाटणी, मंजु ठोले, बापु कासलीवाल आदीची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# सोमवारी रात्री जोरदार पाऊस; नदी नाले तुडूंब भरली



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २सोमवारी रात्रीपासून जोरदार नदी नाले यांना मोठे पुर आले

फर्दापूर . फर्दापूर परिसरात सोमवारी रात्रभर जोरदार पाऊस आल्याने नदी नाले यांना मोठे पुर आले तसेच धरण भरले आहे सोमवारी रात्रभर जोरदार पाऊस आल्याने भर पावसाळ्यात वाघुर नदी ला हा दुसरा मोठा पुर आला असल्याने शेतकरी यांची रब्बी पेरण्यासाठी पाणी पुरेल यामुळे शेतकरी राजा समाधानी झाला असल्याने तो आता आपल्या पिकांना खत टाकण्यास सुरुवात करेल या मोठ्या पावसाने कापूस, मका,तुर या पिकांना मोठें जीवदान मिळाले आहे

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

**जाहिर प्रकटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २५५/२०२५

१/– विजयसिंग कोमलशिंग सोळंके, वय ५७ वर्ष, धंदा शेती, रा. बरठाण, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/– प्रवीण कोमलसिंग सोळंके, वय ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. वरीलप्रमाणे

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. सचिन सु.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत कोमलसिंग जलमसिंग सोळंके यांचा दि. १४/०१/२०११ मौजे वरठाण, ता. सोयगाव, जि छ. संभाजीनगर. येथे मृत्यू झालेला असुन बेबाबाई कोमलसिंग सोळंके यांचा दि. १०/०६/२०२१ मौजे वरठाण, ता. सोयगाव, जिछ. संभाजीनगर. येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते २ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते २ हे मयत कोमलसिंग जलमसिंग सोळंके व बेबाबाई कोमलसिंग सोळंके यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ३०/८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. १६/१०/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक' सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

**जाहिर प्रकटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २५४/२०२५

१/– रघुनाथ नारायण राउत, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/– भगवान रघुनाथ राउत, वय २६ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३– सविता संदीप कापरे, वय २० वर्ष, धंदा धरकाम, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. ४/– राधिका रुपेश पाटील, वय २५ वर्ष, धंदा घरकाम, रा. कृष्णा पुरी, पाचोरा, जिल्हा जळगाव, ५/– पूजा ईश्वर जाधव, वय २२ वर्ष, धंदा वाकोद, ता. जामनेर, जिल्हा जळगाव.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. सचिन सु.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अनुसयाबाई रघुनाथ राउत यांचा दि. ०१.०९.२०२४ मौजे हेडगवार हॉस्पिटल, संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत अनुसयाबाई रघुनाथ राउत यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध पल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ३०/८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. १६/१०/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

**जाहीर प्रगटण**

मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र.५४५/२०२५

अर्जदार :– १) मुमताजवी निजाम शेख वय ५० वर्षे धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) हिलाल निजाम शेख, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) समीर निजाम शेख, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) अमीर निजाम शेख, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार –निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. एस.वी. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे निजाम बाबुभाई शेख हे मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत निजाम वाबुभाई शेख यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याने मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक २५/०९/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/०८/२०२५ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

## अग्रलेख...

# पुरस्काराचा सन्मान!

प्रत्येक वर्षातील सप्टेंबर महिना हा जगभरातील आणि देशातीलही मुलींच्या जन्माची प्रतिष्ठा आणि महत्त्व अधोरेखित करणारा असतो. तो महिना आता सुरू झाला असतानाच देशाच्या आणि देशातील तमाम महिला-मुलींच्या आत्मविश्वासास नवी उभारी देणारी एक बातमी जगाच्या चर्चेचा मुद्दा झाली ही केवळ महिलांच्याच नव्हे, तर उभ्या भारताच्या अभिमानाची बाब ठरली आहे. म्हणूनच, या बातमीची दखल घेताना या अभिमानाचे समाधान देशास मिळवून देण्यास कारणीभूत ठरलेल्या संस्थेचे अभिनंदन करावयास हवे. काही पुरस्कारांमुळे व्यक्ती किंवा संस्थांचा सन्मान होतो. या संस्थेला मिळालेल्या पुरस्कारामुळे त्या पुरस्काराच्या सन्मान झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राजस्थानाच्या एका लहानशा आणि दुर्गम अशा सुमारे ५० गावांत या संस्थेच्या कामाची बीजे रुजली आणि बघता बघता या संस्थेच्या कार्याने यशाचे उत्तुंग शिखरही गाठले. खरे म्हणजे, अशी कामे ही आपल्या सामाजिक आणि पारंपरिक विचारसरणीच्या पराभवाची प्रामाणिक कबुली असते. गेल्या अनेक दशकांत शिक्षण, प्रगती, सामाजिक समतेच्या संधी आणि लिंगभेदातून जन्माला आलेल्या मानसिकतेमुळे देशातील महिलांच्या प्रगतीचा प्रश्न सातत्याने उपेक्षित राहिला होता. गेल्या जवळपास शंभर वर्षांच्या सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेतून याची खंत डोके वर काढू लागली आणि स्त्री शिक्षणाच्या प्रेरणादायी कामाची वाटचाल सुरू झाली. ही वाटचाल संघर्षमय होती. ब्रिटिश काळात सुरू झालेली जागृती, स्वातंत्र्यानंतरची धोरणे आणि आजच्या काळातील स्त्रियांचा वाढता सहभाग असे या वाटचालीचे टप्पे ठरविता येतील. या प्रत्येक टप्प्यातून सामाजिक बदलाचा प्रवाह उलगडतो. राजस्थानातील शाळाबाह्य मुलींच्या शिक्षणाचा वसा घेऊन गेल्या काही वर्षांत वीस लाखांहून अधिक मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करून घेऊन आज जवळपास तीस हजार गावांतील उपेक्षित, वंचित मुलींना शिक्षणाची कवाडे खुली करणाऱ्या एज्युकेट गर्ल्स नावाच्या बिगरशासकीय संस्थेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचा रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या सन्मानाच्या रूपाने मॅगसेसे पुरस्कार विजेत्यांच्या प्रतिष्ठित यादीत यंदा भारताचा समावेश झाल्याने, या पुरस्कार विजेत्या संस्थेने देशाच्या शैक्षणिक विश्वात इतिहासाचे नवे पान समाविष्ट केले आहे. एज्युकेशन गर्ल्स या नावाने देशात परिचित असलेल्या या संस्थेचे काम आता देशाच्या विविध भागांतील ३० हजारांहून अधिक गावांत विस्तारले आहे आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, अर्ध्यावर शाळा सोडल्यामुळे स्वयंप्रगतीचे मार्ग खुंटलेल्या २० लाख मुलींना या संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. मुलगी शिकली, प्रगती झाली, अशी सरकारी घोषणा अस्तित्वात येण्याआधी महिलांचे कौटुंबिक महत्त्व अधोरेखित करणाऱ्या काही बाबी समाजाने स्वीकारल्या आहेत. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगातें उद्धारी अशा एका म्हणीतून, स्त्रीची महती गेल्या अनेक दशकांपासून घराघरात संस्काररूपाने शिकविली जाते. बेटी बचाओ, बेटी पढाओ नावाच्या सरकारी घोषणांतून स्त्रियांच्या जगण्याचा सन्मान आणि शिक्षणातून मिळणाऱ्या प्रतिष्ठेचा मान स्त्रियांना देण्याचे संस्कारही घडविले गेले, तरीही पठडीबाज समाजरचनेच्या उतरंडीत स्त्रीचे महत्त्व पुरुषांहून कमीच राहिले. काही पारंपरिक समजुतींच्या लक्ष्मणरेषांनी जखडलेल्या त्यांच्या जगण्याला नवी दिशा देण्याचे काम गेल्या शंभर वर्षांत झाले, म्हणून आज एज्युकेशन गर्ल्ससारख्या संस्थांच्या कामाला सन्मान मिळाला आहे. पुढील दशकभरात देशभरातील एक कोटींहून अधिक मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प या पुरस्काराच्या निमित्ताने या संस्थेने जाहीर केला आहे. विविध सरकारी योजना, जुन्या समजुतींच्या प्रवाहातून बाहेर पडून महिलांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याची बदलती मानसिकता आणि महिलांच्या प्रगतीचे सर्वसमावेशक पुरावे समोर येत असतानाही, देशाच्या दुर्गम भागांत अजूनही कोट्यवधी मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचितच आहेत आणि त्यांना या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी कोणीतरी स्वयंसेवी संस्थांच्या संवेदनशीलतेने भारलेल्या कार्याची मदत गरजेची आहे हा याचा स्पष्ट अर्थ आहे.

एकोणिसाव्या शतकात, सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने स्त्री शिक्षणाची पायाभरणी झाली, तरी विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळापर्यंत स्त्री शिक्षणास सामाजिक विरोधाचे आव्हानही होतेच. पंडिता रमाबाईंनी स्त्रियांना शिक्षण सुलभतेने घेता यावे यासाठी वसतिगृहे उभारली, शिक्षणसंस्था उभ्या केल्या. महात्मा गांधींनी स्त्री शिक्षण हा सामाजिक सुधारणांचा आधार असल्याचा विचार समाजात रुजवला आणि उच्चवर्णीय व शहरी भागांत स्त्रियांच्या शिक्षणाची चळवळ सुरू झाली. शिक्षणामुळे प्रगल्भ झालेल्या जाणिवांनिशी, त्या लेखन, अध्यापन, आदी क्षेत्रांत सहभागीही होऊ लागल्या. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे सामाजिक स्थान बहाल केले आणि मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचे धोरणही अवलंबिले गेले. १९४८ मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाने तर १९६४ मध्ये कोठारी आयोगाने स्त्रीशिक्षणावर भर देण्याची गरज अधोरेखित केली, तर १९६८ व १९७६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात, मुलींची पटनोंदणी वाढविण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. परिचारिका, अध्यापन, समाजसेवा, साहित्य, कायदा, वैद्यकीय आणि बँकिंग, विज्ञान, प्रशासन आणि आता तर, संरक्षणासारख्या क्षेत्रांतही मुलींचा सहभाग दिसू लागला आहे. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित झाल्यावर महिलांच्या शिक्षणाच्या चळवळीला नवी दिशा प्राप्त झाली. महिलांसाठी विद्यापीठे स्थापन झाली, अनेक स्वयंसेवी संस्था स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्यरतही झाल्या. नव्या, डिजिटल युगात तर मुलींच्या शिक्षणाच्या संधीही आता विस्तारल्या आहेत, तरीही शहरी आणि ग्रामीण भागांतील शिक्षणाच्या संधींमधील तफावत हा प्रश्न पुरता सुटलेला नाही. अजूनही वेगवेगळ्या सामाजिक समजुतींच्या प्रभावामुळे, मुलांना शिक्षणात प्रोत्साहन देणारी कुटुंबे, मुलींच्या शिक्षणाबाबत उदासीनच आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाने यावर मार्ग शोधला आहे. शाळेच्या पटावरून मुलींची गळती रोखण्यासाठी लैंगिक समावेशक निधी तयार केला जात आहे, तर ग्रामीण व दुर्गम भागांतील मुलींच्या शिक्षणावर विशे लक्ष केंद्रित केले जाणार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही वर्षांत देशातील दर शंभर महिलांपैकी जवळपास नऊ महिला साक्षर, म्हणजे जेमतेम अक्षरओळख असलेल्या होत्या. २०११ मध्ये हे प्रमाण वाढले.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या पदवीधर असलेल्या आणि परदेशात सुस्थित झालेल्या सुफिना हुसैन यांनी २००७ मध्ये भारतातील वंचित मुलांच्या साक्षरतेसाठी काम करण्याचा निर्णय घेतला आणि सरकार व समुदाय यांच्या सहकार्यातून मुलींचे शालेय शिक्षण सुनिश्चित करण्याच्या योजनांसाठी स्वतःस वाहून घेतले. शिक्षणाच्या प्रसारासाठी ग्रामीण भागातील गावागावात स्वतःस समर्पित करणाऱ्या बालिका स्वयंसेवक म्हणून जोडल्या गेल्या आणि हे स्वयंसेवक घरोघरी जाऊन मुलींचे शिक्षण, नावीन्यपूर्ण शिक्षणपद्धती व समुपदेशन आदी मार्गांनी मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देतात. विद्या आणि प्रगती या दोन मार्गांनी मुलींना शिक्षणप्रवाहात जोडणे, शिक्षण हा उपजीविकेचा मार्ग असतो हे पटवून देणारे उपक्रम राबविणे हा एज्युकेट गर्ल्स या संस्थेच्या कामाचा गाभा आहे. लैंगिक रूढी आणि निरक्षरतेमुळे आलेल्या बंधनांपासून मुक्ती मिळवून दिल्याबद्दल या संस्थेला रॅमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला आहे. एका सामुदायिक प्रेरणादायी कर्तव्यभावाचा हा सन्मान समाजातील व्यापक परिवर्तन घडवून आणण्यासाठी साह्यभूत ठरणार आहे. समाज, सरकार आणि संस्था यांनी हातात हात घालून एखाद्या कामास सुरुवात केली, तर असे परिवर्तन अशक्य नाही, ही बाब या संस्थेने आपल्या कामातून सिद्ध केली आहे आणि त्याला मॅगसेसे पुरस्काराने पसंतीची पावती दिली आहे. बेटी बचाओ, बेटी पढाओ हा केवळ संदेश नाही, तर कृतिशीलतेचा विचार आहे, हे या संस्थेने सिद्ध करून दाखविले आहे. म्हणून या सन्मानाचे धनी ठरलेल्या या संस्थेचे अभिनंदन करावयास हवेच!

---

## आंतरराष्ट्रीय

# भारत-जपान संबंधाची नवी दिशा

**प्रा. जयसिंग यादव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जपान दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये नवीन बळकटी आली. या भेटीत दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्याबाबत ऐतिहासिक घोषणाच करण्यात आल्या नाहीत, तर शीर्ष नेत्यांमध्ये अभूतपूर्व जवळीकता दिसून आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी भारत-जपान आर्थिक मंचाला हजेरी लावली, जिथे दोघांनीही आर्थिक सहकार्य आणखी वाढवण्याचे स्वप्न पाहिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात जपानने एक मोठी घोषणा केली. त्यानुसार पुढील दहा वर्षांमध्ये भारतात दहा ट्रिलियन येनची खाजगी गुंतवणूक होईल. ही या भेटीतील सर्वांत महत्त्वाची कामगिरी मानली जात आहे. या भेटीने येत्या दशकासाठी भारत-जपान संबंधांची दिशा निश्चित केली आहे. या रोडमॅपचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे 'पुढील दशकासाठी भारत-जपान संयुक्त दृष्टी'. यानुसार आर्थिक विकासापासून सुरक्षा, तंत्रज्ञान, नवोपक्रम, आरोग्य, शाश्वत विकास, गतिशीलता आणि परस्पर देवाणघेवाण अशा अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य दिले-घेतले जाणार आहे. भारत आणि जपानमध्ये संरक्षण, मानव संसाधन देवाणघेवाण, डिजिटल नवोपक्रम, महत्त्वपूर्ण खनिजे, स्वच्छ ऊर्जा, अंतराळ सहकार्य आणि सांस्कृतिक भागीदारी यासारख्या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे करार करण्यात आले. मोदी आणि इशिबा यांनी महत्त्वाचे करार केले. दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत द्विपक्षीय संबंध नवीन उंचीवर नेण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी मोदी म्हणाले की, भारत आणि जपान या दोन मोठ्या अर्थव्यवस्था आहेत. अशा परिस्थितीत जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी त्यांची भागीदारी महत्त्वाची आहे. दोन्ही देशांनी आर्थिक सुरक्षा सहकार्य उपक्रम सुरू करण्यास आणि शाश्वत इंधन उपक्रम आणि बॅटरी पुरवठा साखळी भागीदारी पुढे नेण्यास सहमती दर्शवली. मोदी आणि इशिबा यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत युक्रेनमध्ये कायमस्वरूपी शांततेचे समर्थन केले आणि पश्चिम आशियातील स्थिरतेबद्दल चिंता व्यक्त केली. गाझामधील मानवतावादी परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करताना, दोन्ही नेत्यांनी तत्काळ युद्धबंदी, सर्व ओलिसांची सुटका आणि मानवतावादी मदत सुनिश्चित करण्यावर भर दिला.

२०१४ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर मोदी यांचा हा आठवा जपान दौरा आहे आणि पंतप्रधान इशिबा यांच्यासोबत त्यांची पहिली वार्षिक शिखर परिषद होती. हा दौरा भारत जपानसोबतच्या संबंधांना देत असलेल्या उच्च प्राधान्यावर प्रकाश टाकतो. दोन्ही देशांचा राजनैतिक संबंधांचा इतिहास मोठा आहे. त्यात व्यापार, गुंतवणूक, स्वच्छ ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानातील अनेक उच्चस्तरीय भेटी आणि भागीदारी समाविष्ट आहेत. भारत आणि जपानमधील द्विपक्षीय व्यापार २२.८ अब्ज डॉलर्स आहे. जपान हा भारतातील थेट परकीय गुंतवणुकीचा पाचवा सर्वांत मोठा स्रोत आहे. दोन्ही देशांमधील व्यापार डिसेंबर २०२४ पर्यंत ४३.२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. दोन्ही देश सेमीकंडक्टर, स्टार्ट अप्स, स्वच्छ ऊर्जा, पुरवठा साखळी लवचीकता, औद्योगिक स्पर्धात्मकता आणि कौशल्य विकास यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यतादेखील शोधत आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, मोदी यांच्या या भेटीमुळे भारत आणि जपानमधील दीर्घकालीन मैत्री मजबूत होईल, सहकार्याचे नवे मार्ग खुले होतील आणि इंडो-पॅसिफिक प्रदेश आणि त्यापलीकडे शांतता, समृद्धी आणि स्थिरतेसाठी दोन्ही देशांच्या सामायिक वचनबद्धतेची पुष्टी होईल. जपान हा भारतातील पाचवा सर्वांत मोठा गुंतवणूकदार आहे. त्याची भारतातील थेट गुंतवणूक ४३.२ अब्ज डॉलर्स आहे. डिजिटल सहकार्य, स्वच्छ ऊर्जा आणि कौशल्य विकास यासारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढत आहे. जपान १९५८ पासून भारताचा सर्वांत मोठा देणगीदार आहे. तो मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेलसारख्या प्रकल्पांना पाठिंबा देत आहे. २०२३ मध्ये या प्रकल्पासाठी तीनशे अब्ज येनची मदत देण्यात आली. पर्यटन आणि पर्यावरणीय उपक्रमदेखील सहकार्याचा एक भाग आहेत. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध आणखी मजबूत होतील. ते इंडो-पॅसिफिक प्रदेशातील शांतता आणि समृद्धीसाठी महत्त्वाचे आहेत. भारत आणि जपानमध्ये २००० पासून जागतिक भागीदारी आहे आणि २०१४ पासून एक विशेष धोरणात्मक भागीदारी आहे. भारताचे ॲक्ट ईस्ट पॉलिसी आणि जपानचे फ्री ॲण्ड ओपन इंडो-पॅसिफिक उपक्रम एकमेकांना पूरक आहेत. दोन्ही देश 'क्वाड', 'इंटरनॅशनल सोलर अलायन्स' आणि 'कोअलिशन फॉर डिझास्टर रेझिलिएंट इन्फ्रास्ट्रक्चर'सारख्या व्यासपीठांवर एकत्र काम करतात. मोदी आणि जपानचे शिगेरू इशिबा यांनी टोकियो इलेक्ट्रॉन फॅक्टरीला भेट देऊन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. जपान आणि भारत यांच्यात सेमीकंडक्टरबाबत करार झाला आहे.

या दोन नेत्यांनी सेंडाई येथील सेमीकंडक्टर क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या टोकियो इलेक्ट्रॉन मियागी लिमिटेड (टेल मियागी)ला भेट दिली. या दरम्यान, मोदी यांना जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत 'टेल'ची भूमिका, त्याची प्रगत उत्पादन क्षमता आणि भारतासोबत सुरू असलेल्या आणि नियोजित सहकार्याबद्दल माहिती देण्यात आली. सेमीकंडक्टर क्षेत्र हे भारत-जपान सहकार्याचे एक प्रमुख क्षेत्र आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने या क्षेत्रात बरीच प्रगती केली आहे. अनेक तरुणही त्यात सामील होत आहेत. भारत आणि जपानने सेमीकंडक्टर पुरवठा साखळीबाबत करार केला आहे. अशा परिस्थितीत परस्पर मदतीने दोन्ही देश आता मजबूत, लवचीक सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी एकत्र काम करतील. मोदी यांनी भारतीय लोको पायलटांशी चर्चा केली. त्यांनी नवीन अल्फा-एक्स ट्रेनची पाहणी केली आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून बुलेट ट्रेन प्रकल्पाची माहिती घेतली. शिगेरू इशिबा यांच्यासोबत मोदी यांनी मियागी प्रीफेक्चरमधील ओहिरा गावात बांधल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टर वेफर फॅब्रिकेशन प्लांटला भेट दिली. हा प्लांट तैवानच्या पीएसएमसी, एसबीआय होल्डिंग्ज आणि जपानी भागीदारांचा संयुक्त उपक्रम असलेल्या जपान सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी (जेएसएमसी) द्वारे बांधला जात आहे. पंतप्रधान मोदींचा हा दौरा भारत-जपान संबंधांच्या भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. सेमीकंडक्टर उद्योगातील सहकार्यामुळे भारताला चिप उत्पादन क्षमता वाढवण्याची संधी मिळेल. 'एआय' आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या क्षेत्रातील जपानसोबतची भागीदारी भारताच्या तांत्रिक प्रगतीला गती देऊ शकते. भारताच्या बुलेट ट्रेन प्रकल्पात जपानचे सहकार्य भारतीय रेल्वे नेटवर्क आधुनिक आणि जलद बनवण्यास मदत करेल. अल्फा-एक्स बुलेट ट्रेन मॉडेलचा आढावा आणि लोको पायलटच्या प्रशिक्षणामुळे रेल्वेक्षेत्रात सुधारणा होईल. यामुळे रेल्वे वाहतूक प्रणालींच्या बांधकाम आणि विकासात जपानकडून तांत्रिक सहकार्याला चालना मिळेल. चांद्रयान-५ मोहिमेवर विशेष लक्ष केंद्रित करून भारत आणि जपानमधील अवकाश तांत्रिक सहकार्य वाढवले जाईल. अवकाश संशोधन आणि संयुक्त प्रकल्पांमध्ये नवीनतम प्रगतीसाठी अवकाश संस्थांचे सहकार्य काम करेल. हे सहकार्य अवकाश प्रवास आणि अन्वेषणात जागतिक स्तरावर भारताला बळकटी देईल. मोदी यांच्या जपान दौऱ्याचा उद्देश स्वच्छ ऊर्जा आणि हरित ऊर्जा क्षेत्रात दोन्ही देशांमधील भागीदारीला चालना देणे हा होता. सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेच्या क्षेत्रात भारत आणि जपानमधील सहकार्य वाढल्यामुळे पर्यावरणीय दुष्परिणाम कमी होतील. या भेटीमुळे भारत आणि जपानमधील सुरक्षा संबंधही मजबूत होतील. दोन्ही देशांनी विशेषतः प्रादेशिक सुरक्षेच्या संदर्भात लष्करी आणि धोरणात्मक सहकार्य वाढवण्यावर भर दिला. परिणामी, संरक्षण उद्योग आणि लष्करी प्रशिक्षण क्षेत्रातही दोन्ही देशांचे सहकार्य असेल.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

---

## वेध

# जीवघेणा कर्करोग अन् उपाय

**चंद्रकांत लोहाणा**

देशामध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण फार चिंताजनक आहे. अतिशय घातक व जीवघेण्या रोगाबाबत समाजामध्ये अजूनही पाहिजे तेवढी जनजागृती नसल्याने कर्करोगाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. कितीही प्रयत्न केले तरी कर्करोगाशी दिलेली झुंज आयुष्यामध्ये बहुतांश अपयशी ठरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा रोग होऊच नये अशी खबरदारी घेऊन जीवन जगण्यामध्येच शहाणपण आहे, हे गृहीत धरून प्रत्येकाने आपली दिनचर्या काटेकोरपणे जपायला हवी. अभिनेत्री प्रिया मराठे हिची कर्करोगाशी झुंज अखेर अपयशी ठरली. ती जवळपास दीड वर्षापासून कर्करोगाशी लढत होती.

संशोधनामुळे वैद्यकीय क्षेत्र अतिशय प्रगत झाले असले तरी तज्ज्ञांना अजूनही कर्करोगावर रामबाण इलाज शोधण्यामध्ये फारसे यश मिळाले नाही. कर्करोग का होतो, याबाबतही तज्ज्ञांमध्ये एकवाक्यता नसली तरी बदललेली जीवनशैली, आहारामध्ये झालेला बदल, शरीरावर होणारा रसायनांचा अति मारा, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन हे कर्करोगाचे घर असल्याचे तज्ज्ञ निष्कर्षाप्रत आले आहेत. त्यामुळे कर्करोग होऊच नये, म्हणून जीवनामध्ये काही पथ्ये पाळली तर समाजामध्ये कर्करोगाचा लढा अतिशय संयमितपणे लढला जाऊ शकतो. पूर्वी कर्करोगाचे रुग्ण समाजामध्ये बोटावर मोजण्याएवढे सापडायचे. हल्ली हा आकडा कित्येक पटीने वाढला आहे. कर्करोग हा शरीराच्या पेशीमधील बदलामुळे होतो. शरीरामध्ये सामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढायला सुरुवात झाली की, कर्करोगाची लागण होऊ शकते. मानवाच्या शरीरातील पेशी एका ठरावीक पद्धतीने वाढतात. त्यानंतर त्या विभाजित होतात आणि नष्ट होतात. कर्करोगामध्ये पेशीमधील डीएनए खराब होतो. त्यामुळे शरीरातील पेशी सामान्यपणे वाढू लागतात आणि नंतर नियंत्रणाबाहेर या पेशी पसरतात. कर्करोगास आनुवंशिक हे जरी एक कारण असले तरी त्यास अन्य कारणेही अतिशय महत्त्वाची आहेत.



बदललेल्या आहारशैलीमुळे कर्करोगाचा धोका संभवतो, असा तज्ज्ञांचा दावा आहे. त्यामध्ये प्रक्रिया केलेले अन्न, साखर व ज्यामध्ये ट्रान्सफॅट अधिक प्रमाणामध्ये आहे, अशा आहाराने पोटाचा कर्करोग होण्याची शक्यता अधिक असते. तसेच तंबाखूचे सेवन, नशेची सवय, रेडीएशन, वायुप्रदूषण व आजकाल घराघरामध्ये सर्रास वापरली जाणारी घरगुती रसायने कर्करोग होण्यास प्रमुख कारण असल्याचे तज्ज्ञांचे ठाम मत आहे. त्यामुळे आजच्या आधुनिक युगामध्ये मानवास जडलेल्या अशा घातक सवयी आम्ही जोपर्यंत सोडत नाही, तोपर्यंत कर्करोगाचा धोका कमी होणे अशक्य आहे.

आम्ही आमच्या परंपरांना टाकाऊ म्हणून झुगारले. आधुनिकतेच्या नावाखाली नको तेवढे आम्ही पाश्चिमात्य देशांचे अंधानुकरण केले. आमचे जे काही आहे ते सर्वकाही वाईट, हे आमच्या समाजामध्ये इंग्रजांनी पद्धतशीरपणे पेरले. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी उलटली तरी आमच्या डोक्यामधून ही मानसिकता काही केल्या जात नाही. स्वतःच्या विकासाकडे लक्ष देताना, त्यासोबत आपण विनाशही ओढवून घेत आहोत, हे आम्हास अजूनही उमगले नाही. भारतामध्ये झालेल्या एका अभ्यासानुसार महिलांमध्ये गर्भाशयाचा कर्करोग होण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. गर्भाशयाचा हा कर्करोग संपूर्ण जगामध्ये झपाट्याने वाढत असून त्याचे निदान झाल्यावर ४५ टक्के महिला फक्त ५ वर्षे आपले जीवन जगू शकल्या. आपल्या देशामध्ये सर्व आजारावर दुर्लक्ष करण्याचे प्रमाण अतिशय जास्त असून, त्यामध्ये महिला सर्वाधिक आहेत. महिलांमध्ये ज्यावेळी गर्भाशयाच्या कर्करोगाचे निदान होते, त्यावेळी बराच उशीर झालेला असतो. त्यानंतर हा उशीरच जीवघेणा ठरतो, याची सुतराम कल्पना महिलांना नसते. ८० टक्के ग्रामीण भागातील महिला आजारांकडे दुर्लक्ष करतात. गर्भाशयाच्या कर्करोगाची सुरुवात स्त्री प्रजनन प्रणालीच्या अंडाशयामध्ये होते. त्यामध्ये सुरुवातीला कोणतीच लक्षणे दिसून येत नाही. त्यामुळे अनेक महिलांना या रोगाची लक्षणे समजतच नाहीत. ओटीपोटीत दुखणे, पोटामध्ये गोळा येणे, वजन कमी होणे, थकवा येणे, पाठदुखी यासारख्या लक्षणांचा त्यामध्ये समावेश होतो. त्यामुळे सजगता हीच कर्करोगाची अचूक औषधी ठरू शकते.

९८८१७१७८५६

---

## इतस्ततः

# माहिती तंत्रज्ञान रोजगारांवरील टांगती तलवार!

**दत्तात्रेय आंबुलकर**

संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील 'टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस' म्हणजेच नावाजलेल्या अशा 'टीसीएस' या आघाडीच्या कंपनीने कर्मचारी कपातीची शक्यता वर्तवली आहे. जागतिक स्तरावर वाढलेली व्यावसायिक अस्थिरता व नजीकच्या काळातील अनिश्चित परिस्थिती लक्षात घेऊन 'टीसीएस' मध्यम व उच्चस्तरीय स्तरांवरील सुमारे १२ हजार कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्याची शक्यता आहे. आजतागयत व्यावसायिकता, व्यवस्थापन आणि कर्मचार्यांप्रति सहानुभूतिपूर्वक भूमिका बाळगणाऱ्या 'टीसीएस'च्या कर्मचारीकपातीच्या निर्णयाचे संभाव्य परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रात सर्व स्तरावर उमटणे स्वाभाविक होते.

यासंदर्भात प्रामुख्याने व सर्वप्रथम उमटलेली 'टीसीएस' व्यवस्थापनाची प्रतिक्रिया वर नमूद केली असून, कर्मचाऱ्यांच्या कपातीसंदर्भात आलेली त्यांची प्रतिक्रिया म्हणजेच प्रस्तावित भूमिका होय! ही भूमिका म्हणजे सद्य:स्थितीत भारतातील संगणक क्षेत्र आणि संबंधित क्षेत्रातील अस्थिरतेचे द्योतकच समजायला हवी. या क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सध्या आपले माहिती तंत्रज्ञान व संबंधित क्षेत्र हे मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे. यामुळे भारतातील संगणकीय सेवा उद्योगात तंत्रज्ञानापासून माहितीची देवाण-घेवाण, आर्थिक व्यवहार या साऱ्यांवरच मोठे परिणाम होत आहेत. याचे परिणाम भारतासह जागतिक स्तरावरही होत आहेत. यामध्ये विविध संसाधनांच्या नेमक्या व मोजक्या वापरासह आर्थिक निर्बंधांवर भर देण्यात येत असून, त्याचा अपरिहार्य परिणाम कर्मचारी आणि त्यांच्या संस्थेवर होत आहे. दरम्यान, संगणक क्षेत्र आणि व्यवसायाला त्यांच्या फायदेशीर अस्तित्वासाठी कार्यालय, कर्मचारी, तंत्रज्ञान व आर्थिक दृष्टिकोन या सर्व बाबींचा साकल्याने विचार करूनच, त्यानुसार ध्येयधोरणाची नव्याने आखणी वा प्रसंगी फेरआखणी करावी लागते. वाढती स्पर्धा हा मुद्दासुद्धा सर्वांसाठी महत्त्वाचाच ठरतो. त्यातच भर पडते ती संगणक सेवा क्षेत्रातील वाढत्या अपेक्षांची! त्यांची पूर्तता करण्यासाठी यापूर्वी न वापरलेल्या उपाययोजनांचा विचार आणि वापर करणे अपरिहार्यच ठरते. यामध्ये कार्यालयीन जागा व कामकाजापासून, कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेपर्यंत सर्वच मुद्यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात येतो.



याचदरम्यान संगणक सेवा क्षेत्रातील अजून एक नामांकित कंपनी असलेल्या 'इन्फोसिस'ने, त्यांच्याकडे कोणतीही कर्मचारी कपात होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. 'इन्फोसिस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सलील प्रकाश यांनी जाहीर केलेल्या निर्णयानुसार कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता व कर्मचाऱ्यांच्या नव्या स्वरूपातील कौशल्यविकासाद्वारे, कंपनीच्या कर्मचारी कपातीसंदर्भातील चर्चेला पूर्णविराम दिला आहे. एवढेच नव्हे, तर एकीकडे कर्मचारी कपातीची शक्यता स्पष्टपणे फेटाळून लावतानाच, 'इन्फोसिस' आगामी वर्षभरात सुमारे २० हजार नव्याने उत्तीर्ण झालेल्या संगणक पदवीधरांना प्रशिक्षणार्थी म्हणूनही घेणार असल्याची केलेली घोषणा हा सध्या मुख्य चर्चेचा विषय झाला आहे.

कंपनीच्या व्यवसाय आणि व्यवस्थापनाची दिशा स्पष्ट करताना सलील प्रकाश यांनी स्पष्ट केलेली बाब म्हणजे, नव्या व्यावसायिक गरजा व व्यवस्थापन पद्धती यांचा व्यवसायानुकूल भर देण्यावर त्यांचा भर राहणार असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक परिणामकारक वापर करून व्यवसाय वाढवणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे. त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्षेत्र सर्वार्थाने नवे असल्याने, त्यातील कौशल्यपूर्ण कर्मचाऱ्यांची सर्वत्र वानवा आहेच. कौशल्यांच्या संदर्भातील नेमकी हीच गरज व त्याच्याशी निगडित आव्हाने लक्षात घेऊन, कंपनीने नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी उमेदवारांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. याचाच एक भाग म्हणून, नव्या कर्मचाऱ्यांची निवड करण्याच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १६ हजार प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

सुरुवातीलाच नमूद केल्यानुसार, सध्या जगाच्या पाठीवर माहिती तंत्रज्ञान उद्योग क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर व्यवसाय, कार्यपद्धती, धोरण, विस्तार, कर्मचाऱ्यांचे प्रश्न यावर मोठ्या प्रमाणावर विमर्श सुरू आहे. त्यानुसार संबंधित कंपनीच्या धोरणात आणि कामकाजाच्या शैलीमध्ये आवश्यक बदल करणे अपरिहार्य ठरत आहे.

संगणक क्षेत्रातील या महत्त्वाच्या बदलांमध्ये प्रामुख्याने पुढील मुद्यांचा समावेश करता येईल.

**व्यावसायिक फायद्यासाठीची तीव्र स्पर्धा** : इतर व्यवसायांप्रमाणेच संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान व्यवसायामध्ये स्पर्धा असणे अपरिहार्य असले, तरी सध्या या स्पर्धेची व्याप्ती आणि तीव्रता प्रकर्षाने वाढली आहे. सध्या अधिकाधिक नफा मिळविण्यावरच भर दिला जात असून, त्यासाठी प्रसंगी अतिरेकी व्यावसायिक नीतीपद्धतींचा वापर केला जात आहे.

**व्यावसायिक फेररचना** : बदलत्या व्यावसायिक गरजा, वाढती स्पर्धा व विविध स्वरूपांची आव्हाने या साऱ्यांना एकाचवेळी तोंड देण्यासाठी व्यवसाय-व्यवस्थापन आणि कंपनी-कर्मचारी या क्षेत्रांची पुनर्रचना करणे सध्या अपरिहार्य झाले आहे. यासाठी उपाययोजना म्हणून, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र अग्रक्रमाने पुढे येत आहे. त्याचा वापरही आवश्यकच नव्हे, तर अपरिहार्यपण ठरला आहे.

कर्मचाऱ्यांचे सोडून जाणे : कंपन्यांसाठी परिणामकारक स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे राजीनामे हे मोठे आव्हान असते. सद्य:स्थितीत व वाढत्या व्यावसायिक स्पर्धेला तोंड देताना, विशेषतः एरवीसुद्धा कामाच्या व कौशल्यप्राप्त कर्मचाऱ्यांना टिकवून ठेवणे हे संगणकशास्त्र उद्योगासाठी आवश्यक आहे. तरी सध्या हीच बाब बदलत्या परिस्थितीत या व्यवसाय क्षेत्रासाठी अत्यावश्यक ठरली आहे.

याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाकडे शस्त्र आणि शास्त्र उभय दृष्टिकोन आणि भूमिकांसह पाहणे गरजेचे आहे. कंपनी, तिचे कामकाज, कर्मचारी या साऱ्यांसाठीच नव्या बदलांचा अपरिहार्य हिस्सा म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यातूनच कर्मचाऱ्यांची व पर्यायाने कंपन्यांची उपयुक्तता निश्चितपणे व्यवसायपूरक ठरणार आहे.


(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

## गणेश मंडळांनी सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा जपावा

सध्या महाराष्ट्रात श्री गणेशाचे वास्तव्य अनंत चतुर्दशीपर्यंत प्रत्येक घरात आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. प्रत्येक वस्तीत श्रीगणेशाची स्थापना होऊ लागली. कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली. कार्यक्रमात सिनेमा दाखवणे, ऑर्केस्ट्रा, विविध कार्यक्रम होऊ लागले. वसाहतीतील नागरिकांचे विविध मनोरंजनांचे कार्यक्रम व त्यातून लोकांचे स्नेहमिलन होऊ लागले. आचारविचारांचे आदानप्रदान होऊ लागले. त्यातून स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली. काही गणेश मंडळे अतिशय सुंदर कार्यक्रम, जे लोकमान्य टिळकांना अपेक्षित होते, ते राबवताना दिसत आहेत. पीएमजी सोसायटी माधवनगर अंतर्गत असलेल्या चारही लेआऊटमध्ये सांस्कृतिक बरोबरच आध्यात्मिक कार्यक्रम होतात. आज लहान मुलांवर चांगले संस्कार व्हावे, नवीन पिढी संस्कारक्षम निर्माण व्हावी याकरिता माधवनगर गणेश मंडळाने होम हवन करून जवळपास ११ बटूंना आवर्तनासाठी बसवले. सर्व लहान मुले एका ठिकाणी बसून मंत्राच्या घोषात २-२ तास बसतात. तसेच रवींद्र नगर, नरेंद्र नगर व सावरकर नगर याही ठिकाणी गणेश यागाचे आयोजन करून समाजात धार्मिक विचार पेरण्याचे काम महिला व लहान मुले करीत आहेत. हिंदू संस्कृतीचा हा एक भाग आहे आणि आज समाज एकसंध आणि सकारात्मक विचारसरणीचा तयार करण्यासाठी असे कार्यक्रम फार महत्त्वाचे आहेत. कारण देशामध्ये विकृत विचारांनी थैमान घातले आहे ते नष्ट करण्यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांनी पुढे येऊन आपला सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा जपला जाईल त्याच पद्धतीचे कार्यक्रम करावे. समाजातील विकृतीला हद्दपार करण्याचे काम केले तरच लोकमान्य टिळकांना अपेक्षित गणेशोत्सव साजरा केल्याचे समाधान प्रत्येक मंडळाला मिळेल आणि समाजामध्ये एकोप्याचे वातावरण निर्माण होईल.



**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## वाचक पत्रे


## गणेशमूर्ती मिरवणुकीत आगीच्या ज्वाळांवर बंदी हवी

अनंत चतुर्दशीला रात्री श्री विसर्जन मिरवणुकीत काही हौशी मंडळी टेंभा किंवा छोटे गॅस सिलेंडर बाळगतात व तोंडात पेट्रोल किंवा डिझेल घेऊन ते हवेत सोडतात व त्यावर गॅस किंवा टेंभ्याच्या ज्वाळा सोडतात यामुळे हवेत मोठा भडका होतो. हे खूप घातक आहे. मिरवणुकीत खूप गर्दी असते. एखाद्या भक्ताच्या अंगावर हा भडका पडून मोठा अपघात घडू शकतो किंवा आगी लागण्याचा प्रकारही शक्य आहे. तसेच फटाके पेटवून ते हवेत फेकतात. हा प्रकारही घातक ठरू शकतो. या दोन्ही प्रकारांना प्रतिबंध घालावा व श्री विसर्जन मिरवणूक शांततेत व निर्विघ्न पार पडावी असे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## गुंड्याभाऊंची एक आठवण

काही वर्षांपूर्वी चिमणराव आणि गुंड्याभाऊ ही मालिका टीव्हीवर खूपच गाजली होती आणि या मालिकेमध्ये मातब्बर असे मोठे दोन अभिनेते होते. ते म्हणजे नुकतेच निधन झालेले बाळ कर्वे आणि दिलीप प्रभावळकर. या मालिकेतील मुख्य भूमिका करणारे गुंड्याभाऊ म्हणजेच बाळ कर्वे होते. त्यांना जणू टोपण नाव गुंड्याभाऊ पडले होते. त्यांनी अनेक मालिकांमध्ये काम केले होते आणि त्यांचे काम आजही लक्षात आहे. त्यांच्यामध्ये एक नोकरदार वर्गही होता. त्यांची एक आठवण सांगावीशी वाटते की, नाला दुरुस्ती याबाबत वृत्तपत्रामध्ये माझे एक पत्र प्रसिद्ध झाले होते. हे पत्र मुनिसिपल कॉर्पोरेशन संबंधित होते. बाळ कर्वे मुनिसिपल कॉर्पोरेशन मुंबई यांच्या पूर्व विभागामध्ये स्थापत्य अभियंता होते. माझ्या पत्राची दखल घेऊन ते जोगेश्वरी ईस्ट बांदेकर वाडी येथे मला घरी भेटण्याकरिता आले. माझ्या तक्रारीचे निवारण त्यांनी केले. बाळ कर्वे हे एक मोठे अभिनेते आहेत आणि ते चिमणराव मालिकेमध्ये गुंड्याभाऊ ही भूमिका करतात हे कळताच आजूबाजूच्या परिसरातील लोक त्यांना बघण्याकरिता तेथे जमा झाले आणि त्यांनी तेथे सर्वांशी संवाद साधला. म्हणजेच एक प्रसिद्ध अभिनेता आणि एक कर्तव्यदक्ष सरकारी अधिकारी अशी त्यांची दोन्ही रूपे त्यावेळी सर्वांना पाहायला मिळाली. बाळ कर्वे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नांदेड जिल्ह्यात 'तेलगी घोटाळा भाग २' चा धोका?

## १०० रुपयांच्या अवैध मुद्रांक विक्रीतून कोट्यवधींचा अपहार झाल्याचा दावा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २ सप्टेबर-**

अख्खा महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या 'तेलगी मुद्रांक घोटाळ्या'ची आठवण करून देणारा एक नवा आणि त्याहूनही मोठा मुद्रांक घोटाळा नांदेड जिल्ह्यात उघडकीस आल्याचा धक्कादायक आरोप एका सामाजिक कार्यकर्त्याने केला आहे. महाराष्ट्र शासनाने नवीन कायदा लागू करूनही, नांदेडमध्ये छ१०० च्या मुद्रांकांची अवैध विक्री सुरू असून, यातून राज्याच्या तिजोरीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. हा घोटाळा किरकोळ विक्रेत्यांपुरता मर्यादित नसून, त्यात जिल्हाधिकारी, उपनिबंधक आणि तहसीलदारांसारख्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप झाल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

माहूर येथील सामाजिक कार्यकर्ते केशव गणपतराव भगत यांनी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक आयुक्त आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. त्यांनी या तक्रारीत म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२४ नुसार, १ जानेवारी २०२५ पासून सर्व प्रकारच्या दस्तऐवजांसाठी किमान मुद्रांक शुल्क छ५०० अनिवार्य केले आहे. असे असूनही, नांदेड जिल्ह्यात अजूनही सर्रास छ१०० च्या मुद्रांकांची विक्री सुरू आहे.

या कायद्यानुसार, छ५०० पेक्षा कमी मूल्याचे मुद्रांक वापरलेले कोणतेही दस्तऐवज अवैध ठरते. मात्र, प्रशासनातील संबंधित अधिकारीच या नियमांकडे डोळेझाक करत आहेत. यामुळे प्रत्येक दस्तऐवजावर किमान छ४०० चा महसूल बुडत आहे. जिल्ह्यात दररोज हजारो दस्तऐवजांची नोंदणी होत असल्याने, हा अपहार कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचला असल्याचा दावा भगत यांनी केला आहे. त्यांनी या गंभीर गैरव्यवहाराला थेट अधिकाऱ्यांचे 'जाणीवपूर्वक संगनमत' असे म्हटले आहे.

**एसीबीच्या कारवाईनंतरही उच्च अधिकाऱ्यांवर कारवाई नाही**

भगत यांनी यापूर्वी २३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार दाखल केली होती. मात्र, त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. यानंतर त्यांनी एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने १२ ऑगस्ट २०२५ रोजी माहूर येथील एका मुद्रांक विक्रेत्याला सापळा रचून पकडले. सदरील मुद्रांक विक्रेता हा उपनिबंधक, माहूर यांच्या संगनमताने रु १०० च्या मुद्रांकासाठी अतिरिक्त पैसे घेत असल्याचे उघड झाले आणि त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

मात्र, भगत यांच्या मते, ही कारवाई फक्त एका किरकोळ विक्रेत्यापुरती मर्यादित ठेवण्यात आली. त्यांनी तक्रारीत म्हटले आहे की, विक्रेता हा केवळ एक लहान प्यादा आहे. या भ्रष्टाचाराचे खरे सूत्रधार उपनिबंधक, जिल्हा निबंधक आणि इतर वरिष्ठ अधिकारी आहेत. एसीबीने त्यांना मोकळे सोडले, यातूनच त्यांचे संगनमत उघड होत आहे.

**जनहित याचिकेचा इशारा आणि प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

केशव भगत यांनी तक्रारीत स्पष्टपणे इशारा दिला आहे की, जर या प्रकरणात तातडीने आणि कठोर कारवाई झाली नाही, तर ते मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करतील आणि सर्व दोषी अधिकाऱ्यांना आरोपी म्हणून समाविष्ट करतील.

हा केवळ आर्थिक घोटाळा नसून, लोकशाहीवरील विश्वासघात असल्याचे भगत यांनी म्हटले आहे. त्यांच्या मते, जेव्हा कायद्याची अंमलबजावणी करणारेच अधिकारी कायद्याची पायमल्ली करतात, तेव्हा सामान्य नागरिकांनी कोणावर विश्वास ठेवायचा? या भ्रष्टाचाराचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होत आहे. अवैध मुद्रांकांवर नोंदवलेले दस्तऐवज भविष्यात न्यायालयात अवैध ठरले, तर सामान्य नागरिकांच्या मालमत्ता हक्कांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

या आरोपांवर जिल्हाधिकारी कार्यालय किंवा एसीबीकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या प्रकरणातील आरोप इतके गंभीर आहेत की, ते आता केवळ नांदेड जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता राज्यस्तरीय चर्चेचा विषय बनण्याची शक्यता आहे. तेलगी घोटाळ्यानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्राला हादरवणाऱ्या या संभाव्य घोटाळ्याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### आगामी निवडणूकीत नगरसेवक पदासाठी कुणाल चौदंते यांची चर्चा

**मुदखेड**-मुदखेड भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर कुणाल देविदासराव चौदंते यांची आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी वर्णी लागणार का? सामाजिक बांधिलकी, सुशासन आणि पारदर्शक प्रशासन हेच मुख्य मुद्दे घेऊन त्यांनी निवडणूक रिंगणात उडी घेण्याचे ठरवले आहे. कुणाल चौदंते यांचे वडील देविदासराव चौदंते हे याआधी ५ वर्ष नगराध्यक्ष आणि १० वर्ष नगरसेवक म्हणून यशस्वीपणे कार्य पार पाडले आहेत. त्यांच्या वडिलांचा राजकीय अनुभव आणि मार्गदर्शन घेऊन नव्या जोमाने युवा नेतृत्व म्हणून कुणाल चौदंते लोकसेवेसाठी सज्ज झाले आहेत. त्यांना नागरिकांच्या प्रत्येक समस्यांची जाणीव असल्यामुळे जेष्ट नागरिक, महिला,व युवकांच्या कोणत्याही समस्या असो त्या सोडवण्याची जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पाडल्या आहेत. यामुळे प्रभागातील युवकांची पहिली पसंती म्हणुन कुणाल चौदंते यांचीच चर्चा होत आहे. भारतीय जनता पक्षाचे पक्षश्रेष्ठी पदाधिकाऱ्यांनी व माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी एकनिष्ठ पाठिंबा दर्शवून कुणाल देविदासराव चौदंते यांना पक्षाचा पाठिंबा मिळेल का याकडे प्रभागातील ज्येष्ठ नागरिक महिला व युवकांचे लक्ष लागले आहे.



### श्रीकांत जाधव भौतिकशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण

**बाऱ्हाळी-** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने १५ जून रोजी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणाऱ्या सेट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे त्यात महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी तथा मराठवाडा असोसिएशन फॉर स्टुडंट या विद्यार्थी संघटनेचे विभागीय अध्यक्ष श्रीकांत बालाजी जाधव(देशमुख) यांनी भौतिकशास्त्र विषयात सेट उत्तीर्ण केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे आई वडील गुरुजन वर्ग,आप्तेष्ट व मित्रपरिवारांच्या वतीने आनंद व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



### सुवर्णकार गणेश मंडळाचे वतीने सामान्य ज्ञान स्पर्धा; आकर्षक बक्षिसांची लुट

**माहूर**-शहरातील सराफा ओळीतील सुवर्णकार गणेश मंडळाचे वतीने सामाजिक जाणीवेतून शालेय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत गोडी निर्माण होण्यासाठी 'चालू घडामोडी' या विषयावर 'सामान्य ज्ञान स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता ८ ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभाग घ्यावा,असे आवाहन सुवर्णकार गणेश मंडळाचे अध्यक्ष गणेश गायकवाड यांनी केले आहे.माहुर शहरातील बालाजी मंगलमच्या सभागृहात दि.५ /९/२०२५ शुक्रवार रोजी दू. १२ ते २ यावेळेत ही स्पर्धा पार पडणार आहे.स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिवम सावळकर (९६२३४२४९१६),हर्ष शेवाळकर (८२६५०२४००५) व गणेश गायकवाड (८५५०९२६७२७) यांचेकडे मागील वर्षाची गुणपत्रिका,आधारकार्ड व आपला भ्रमणध्वनी क्रमांक आणि ५० रुपये एवढे शुल्क भरून प्रवेश घ्यावा, असे गणेश मंडळाचे वतीने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून कळविण्यात आले आहे. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास ५,५५५,द्वितीय येणाऱ्यास ३,३३३ व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांस २,२२२ अशी बक्षीसं दिले जाणार आहेत. दि.१४ सप्टें.रोजी सराफा ओळीत बक्षिसांचे वितरण होणार आहे.


### पद्माकर (संजय) हळदेकर प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड**-श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड येथील प्रयोगशाळा सहाय्यक पद्माकर (संजय) धोंडोपंत हळदेकर हे ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड येथे दिनांक ४ ऑगस्ट १९९० रोजी लिपिक या पदावर रुजू झाले होते. आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी नियतवयोमानाने ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर प्रयोगशाळा सहाय्यक या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. पुढील आयुष्य निरोगी व सुखी समाधानाचे जावो अशा शुभेच्छा संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी दिल्या.तसेच प्रबंधक डॉ .बि.आर. बोंबडे, (RD) डॉ ए.बी. गोंडे अधिष्ठाता, डॉ.ए.व्हि. नांदेडकर यांच्यासह संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या.



### अब्दुल रजाक कुरेशी कुंडलवाडीकर यांचं निधन

**नायगाव-** नरसी येथील रहिवासी आणि कुंडलवाडी मधील जेष्ठ नागरिक अब्दुल रजाक शे.अहेमदसाब कुरेशी कुंडलवाडीकर वय वर्षे ९० यांचे दि.१ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी कुंडलवाडी येथील मुस्लीम स्मशानभूमीत धार्मिक विधी नुसार अंत्यसंस्कार दफनविधी करण्यात आले. या वेळी परिसरातील अनेक ग्रामस्थ, नातेवाईक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. अब्दुल रजाक कुरेशी हे खाजाभाई कुरैशी यांचे वडील तर हाजी महम्मद उस्मान कुरेशी कुंडल वाडीकर यांचे मोठे बंधू होते. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



## गणेश उत्सव हा समाजहिताचे विविध संदेश देणारा उत्सव:फिरोज दोसानी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २ सप्टेबर-**

श्री गणेशोत्सव हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक उत्सव नसून,समाजहिताचे विविध संदेश देणारा उत्सव असल्याचा प्रत्यय वीर गणेश मंडळ, माहूर यांनी दिला असून 'श्रीगणेशा आरोग्य अभियान' या नावाने मंडळाने राबविलेला आरोग्य तपासणी शिबिर हा समाजजागृतीचा व स्तुत्य उपक्रम ठरला आहे. यासोबतच शहरातील अनेक गणेश मंडळांनी हा स्तुत्य उपक्रम राबवून धार्मिक सलोखा राखत सामाजिक बांधिलकी जोपासल्याचे, प्रतिपादन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक नांदेड डॉ.संजय पेरके आणि ग्रामीण रुग्णालय माहूर चे वैद्यकीय अधीक्षक डॉ.किरणकुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांसाठी आभा कार्ड नोंदणी, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी तसेच रक्त, बीपी व शुगर तपासणीची मोफत सुविधा देण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना नगराध्यक्ष दोसानी म्हणाले कि,आजच्या धावपळीच्या युगात नागरिक स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे विविध आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढते आहे. अशा वेळी धार्मिक-सांस्कृतिक मंडळांनी समाजासाठी आरोग्य तपासणीसारखे उपक्रम राबविणे ही खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी आहे.

या अभियानातून मिळालेला संदेश, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करताना समाजहिताची कामे करणे हाच खरा उत्सव साजरा करण्याचा मार्ग आहे. वीर गणेश मंडळाचा हा उपक्रम शहरासह तालुक्यातील मंडळांसाठीही प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा वीर गणेश मंडळाचे समन्वयक प्रमोद राठोड यांनी व्यक्त केली.

या उपक्रमासाठी डॉ. अभिजीत आंबेडकर, डॉ. वसीम, डॉ.वट्टमवार, डॉ. कुलसुम फतेमा, काउन्सलर किरण चिरडे, औषध निर्माण अधिकारी अश्विनी पातूरकर, श्रीमती येवले, शुभम कांबळे, प्रशांत कदम आणि नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. वीर गणेश मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष आदेश शिंदे, अनिल महल्ले, गणेश लोंढे, सचिन कामटकर, जानेश्वर पतंगे, गजानन रोवलवार,योगेश खुळखुळे,गजानन पवार,प्रेम जैस्वाल,मंगल पवार,गोविंद पवार आदी उपस्थित होते.

## तलावाच्या ओव्हरफ्लोने शेतकरी हवालदिल; नुकसान भरपाईची मागणी

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २ सप्टेबर-**



नरसी पासुन काही अंतरावर असलेला तळणी चा तलाव हा दि. २८ रोजी रोज गुरुवारी पहाटे पासुन झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे नायगांव तालुक्या सह ईतर ही बिलोली तालुक्यातील व नरसी पासून काही अंतरावर असलेल्या तळणी परिसरात प्रचंड नुकसान झालं असून, विशेषतः तळणी मध्यम प्रकल्पाच्या तलावातील पाण्याचा अचानक झाले ला विसर्ग हा शेतकऱ्यांच्या शेतपिकांच्या मोठ्या नुकसानीस कारणीभूत ठरला आहे.

ओव्हरफ्लोमुळे तलावातील पाणी मोठ्या प्रमाणा वर कॅनॉल आणि होळा शेजारील शेतांमध्ये शिरले. परिणामी सोयाबीन, मका, तूर यांसारख्या पिकांवर पाणी साचून शेंगा गळून जाणे, मुळे कुजणे व पीक वाया जाणे अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

दोन दिवस सलग पिकांसह शेती शिवार पाण्यात बुडाले

पावसाच्या धुवांधार तडाख्यानंतर दोन दिवस सलग शेतांमध्ये पाणी साचले होते. परिणामी अनेक शेतकऱ्यांची वर्षभराची मेहनत वाया गेली. या घटनेची माहिती शेतकऱ्यांनी तात्काळ तलाठी व स्थानिक अधिकाऱ्यांना दिली, मात्र सततचा पाऊस आणि वाहतुकीस अडथळा झाल्यामुळे घटनास्थळी येणे शक्य झाले नाही.

सर्वांसारखेच अनुदान आम्हाला अन्यायकारक शेतकऱ्यांचा आक्रोश

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, आमचं नुकसान इतर भागातील शेतकऱ्यांपेक्षा कैकपटीने अधिक आहे. मात्र प्रशासनाकडून सर्वसामान्य निकषांनुसारच अनुदान दिलं जात आहे. ही बाब अन्यायकारक असून आमच्या शेतातील नुकसानाचा स्वतंत्र पंचनामा व्हावा.

शेतकऱ्यांनी यासंदर्भात तहसीलदार, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधींना निवेदन दिलं असून, तातडीने चौकशी करून योग्य आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी केली आहे.

तात्काळ विशेष पंचनाम्याचे आदेश द्यावेत.प्रत्यक्ष पाहणी करून नुकसान ग्रस्तांना तात्काळ विशेष अनुदान मंजूर करावे.तलावातील पाणी विसर्ग नियोजनबद्ध पद्धतीने करावा.पूरप्रवण शेतकऱ्यांना स्वतंत्र सवलतीची तरतूद करावी.शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा अतिवृष्टीचे संकटपाऊस हे वरदान असले तरी नियोजनशून्य प्रशासन आणि विसर्ग व्यवस्थापनामुळे ते शाप ठरू लागले आहे. यापुढील काळात अशा घटना टाळण्यासाठी दीर्घ कालीन उपाययोजना करणंही तितकंच गरजेचं आहे, असा सूर स्थानिक पातळीवर उमटू लागला आहे.

## पूरपरिस्थितीत महसूल व पोलीस विभागाची उल्लेखनीय कामगिरी

**गोविंद नरसीकर**
**नरसी, दि. २ सप्टेबर-**

काल परवा झालेल्या पावसामुळे नायगाव तालुक्यात ओढावलेल्या अस्मानी संकटावेळी बिलोली उपविभागीय कार्यालय व नायगाव तालुका महसूल व पोलीस प्रशासनाने तब्बल दोन तिन दिवस २४ तास कर्तव्य पार पाडत अनेक ठिकाणी निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत कार्यतत्परता दाखवत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. काही ठिकाणी जीव धोक्यात घालून रेस्क्यू ऑपरेशन केले. पाण्यात उतरून नागरिकांची सेवा केली. यात रामतीर्थ पोलीसांनी तिन दिवस पूरस्थितीत नरसी देगलूर राज्य महामार्गावर नियोजन करून वाहतूक यंत्रणा संभाळून पुर्ण भागात गस्त घालत व्यस्त राहिले. संकट काळात जिव ओतून प्रामाणिकपणे सेवा बजावली. प्रत्येंकाच्या मदतीला धावून येत आपले दायित्व जोपासत जनसामान्यांच्या मनात आपुलकीचे स्थान निर्माण केल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांचे कौतुक होत असून ज्या पध्दतीने पुर परीस्थिती हाताळली तितक्याच वेगाने पंचनामे करून नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी अपेक्षाही शेतकरी व नागरिकांनी केली आहे.



एरवी कोणत्याही तालुक्याच्या कार्यालयात अधिकारी अथवा कर्मचारी वेळेवर सहसा उपलब्ध होत नाहीत. आप आपल्या कामासाठी गावातील नागरिकांना चकरा माराव्या लागतात. कधी अधिकारी येतो तर कधी येतच नाही कित्तेक चकरा मारल्या नंतर तेव्हा कुठे काम होते हा आजपर्यंतचा नागरीकांना आलेला चांगलाच अनुभव आहे. पण जेव्हा संकट येते तेव्हा मात्र अधिकारी जिवाची बाजी लावून आपली सर्व यंत्रणा राबविण्यासाठी कोणतीही कसर सोडत नाहीत असाही सुखद अनुभव बिलोली व नायगाव तालुक्यात अतिवृष्टी ग्रस्त नागरीकांना नुकताच आलेला आहे. मॅडम, साहेब पाऊस जास्त पडतो आहे किंवा पुर परीस्थिती निर्माण होत आहे या... असे म्हणण्याची वेळ परवा आलीच नसल्याचे अनेकांनी सांगितले. स्वतः उपविभागीय अधिकारी, तहसीलदार , पोलीस अधिकारी कर्मचारी, मंडळ अधिकारी,तलाठी गावात हजर झाले.

दोन तासात झालेल्या तुफानी पावसामुळे नरसी बिलोली रस्ता बंद झाला.नंतर नरसी देगलूर राज्य महामार्ग बंद झाला हा मार्ग तब्बल दोन दिवस बंदच होता पावसाचे वाढते प्रमाण आणी वरून मन्याड नदीचे पाणी आल्याने रस्ता बंद केल्याशिवाय पर्याय उरला नव्हता लगेच येथे दोन दिवसांपासून रामतिर्थ पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे, पोलिस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांनी चोख बंदोबस्त ठेवून वहातुक यंत्रणा अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने हाताळले. शिवाय अनेक गावांना भेटी देत नागरीकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी मोलाचं योगदान दिले.

रातोळी नदीवर पूलावरून पाणी वाहत असल्यामुळे नरसी- देगलूर , नरसी मुखेड, नरसी - बिलोली रस्ता बंद झाला होता. चौहिकडे पाणीच पाणी झाले होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या मार्गदर्शनाखाली बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी तालुक्यातील यंत्रणा अतिशय उत्तम परीने सांभाळली.

अति पावसाने नायगावातही हाहाःकार उडाला बैल बाजार पाण्यात बुडाला नदीलाही मोठा पुर आला. पंचवीस वर्षात एवढा मोठा पुर आला नव्हता. या पुरामुळे नायगाव शहरातील दत्त नगर व शंकर नगर भागातील घरात नागरिक अडकून पडले. स्थानिक बचाव पथकाच्या मदतीने दोन ते तीन कुटूंबातील नागरिकांना पुराच्या पाण्यातून बाहेर काढले. यानंतरही दोन कुटूंबे अडकली होती. या दोन कुटूंबातील नागरिकांना नांदेड येथील मनपाच्या अग्नीशामक बचाव पथकाने बोटीच्या सहाय्याने सुरक्षितस्थळी हलविले. तालुक्यातील कोलंबी येथे हळदा रोडवर स्कुलबस मध्ये १८ विद्यार्थी एक शिक्षक व ड्रायव्हरसह गाडी पुराच्या पाण्यात अडकली होती. नाल्यावरुन भरपूर पाणी वाहत असल्यामुळे गावातील नागरिक, महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तलाठी व कर्मचारी यांनी मानवी साखळी निर्माण करुन या सर्वाना सुरक्षित ठिकाणी हलविले.

मन्याड नदी धोक्याची पातळी ओलांडल्याने जुन्या कुंचेलीमधील ८० नागरिकांना रेस्कू मोहिम राबवित सीआरपीएफ च्या मदतीने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत केले. वझरगा येथील मारोती हनमंत कोकणे हे मन्याड नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात टाकळी खु. येथून वाहून गेला मात्र झाडाचा सहारा मिळाल्याने झाडाचा आश्रय घेवून जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांना मिळताच त्यांनी तातडीने बोट पाठवून पुराच्या पाण्यात झाडावर आश्रय घेतलेल्या नागरीकास सुखरूप बाहेर काढल्याने बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी**

सध्या पुर परिस्थिती ओसरली आहे. पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांची पंचनामे करण्यात येणार आहे. हवामान खात्याने अजून दोन तिन दिवसांत पाऊसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे नागरिकांनी व शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी असे आवाहन बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांनी आज दि.२ सप्टेंबर रोजी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## जरांगे यांच्या समर्थनात नायगाव कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २ सप्टेबर-**

मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावं म्हणून जरांगे पाटील हे मुंबई येथील आझाद मैदानावर गेल्या चार दिवसापासून उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या समर्थनात आज दि.२ सप्टेंबर रोजी नायगावात कडकडीत बंद पाळण्यात आला.

आज नायगाव शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने नायगाव शहर हे शंभर टक्के कडकडीत बंद करण्यात आले होते. जरांगे यांनी सुरू केलेल्या मुंबई येथील आरक्षणाच्या संदर्भातील आमरण उपोषणास नायगाव येथील सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांच्या वतीने नायगाव बंद करून शहरातील छत्रपती शिवाजी चौकात छोटेखानी सभा घेऊन पाठिंबा दर्शविण्यात आला.

बंद दरम्यान शहरातील सर्व छोटे-मोठे व्यापारी, भाजीपाला विक्रेते यांनीही स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने बंद ठेवून सहभाग नोंदवला होता. या बंदच्या दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नायगाव पोलीस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## निकृष्ट बंधारा बांधकामामुळे सायाळ शिवारातील शेतकऱ्यांचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २ सप्टेबर-**

तालुक्यातील सायाळ शिवारात बागलाच्या नदीवर निकृष्ट बंधारा बांधकामामुळे शेती गट नंबर १३१ मधील गोविंद दत्तात्रय गोत्राळ यांच्या पाच एकर शेतावरील बारा शेळ्या त्याचै आठ पिल,शेतातील कापूस, फळबाग टोमॅटो, कांदा यासह शेत खरडून अतोनात नुकसानाचा फटका शेतकऱ्याला बसला.२८ आगष्ट गुरुवारी रात्री ढगफुटी झाल्याने मौ.सायाळ जवळील बागल नदीला मोठा पूर आला . या नदीवर शासनाने पाणी साठवण बंधाऱ्याचे बांधकाम केले पण निकृष्ट बांधकाम केल्याने खालच्या भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शेती गट क्रमांक १३१ मधील शेतकरी गोविंद दत्तात्रय गोत्राळ यांच्या पाच एकर शेतीमध्ये बारा शेळ्या आठ पिलांसह कापसाचे , कांद्याचे पिक,अर्धा एकर टोमॅटो बाग, शेतातील माती सह पाईपालईन खरडून गेले

आ.प्रताप चिखलीकर यांना या बंधाऱ्याच्या बांधकामांवर माहिती दिली होती पण या अधिकाऱ्याने आदेशाला जुमानले नाही.यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले. पाटबंधारे विभागाने



बागल नदीच्या वळणावर बंधाऱ्यांची जागा निश्चित केली च कंत्राटदाराने निकष दर्जाचे बांधकाम केले.शेतकरी गोविंद गोत्राळ यांनी बंधारा बांधकामास अनेक वेळा विरोध केला व पाटबंधारे विभागाला अर्जही केले पण विभागाने कोणालाच जुमानले नाही करून विरोध केला पण या विभागाने जुमानले नाही. सायाळचे तलठी निळकंठ पांडागळे यांनी शेतावर येऊन पंचनामा केला .

**आत्मदहनाचा इशारा !**

माझे व माझ्या कुटुंबांचे पूर्ण पोट शेतीवरच आहे . हीच शेती व माझे पशुधन पाटबंधारे खात्यामुळे उद्ध्वस्त झाल्यामुळे माझ्या जगण्याला अर्थ नाही ; जर मला न्याय मिळाला नाही तर मी संपूर्ण कुटुंबासह पाटबंधारे कार्यालयात आत्मदहन करणार असल्याचा इशारा गोविंद गोत्राळ यांनी दिला.

**भोकर नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**
मुख्य प्रशासकीय इमारत
साईबाबा पेट्रोलपंप समोर, नांदेड रोड, भोकर ता. भोकर जि. नांदेड-४३१८०१

Email: - cobhokargmail.com    दुरध्वनी क्रमांक कार्यालय (०२४६७) २२२२९९-२२३३९९

जा.क्र. ४१७७    दिनांक : २८ ऑगस्ट २०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि. नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत भोकर शहरातील नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी माहीती, शिक्षण व संवाद अंतर्गत स्वच्छतेची जनजागृती करणे या कामाकरिता ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. ०३/०९/२०२५ ते दि. १२/०९/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

दिनांक २८/०८/२०२५

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद भोकर**
**जि. नांदेड**



## निसर्गभान



# उत्सव चैतन्याचे

● वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

श्रावण म्हणजे हर्षोल्हासाचा महिना! श्रावणातील सृष्टीसौंदर्य बघून कविवर्य बा. भ. बोरकर म्हणतात की, पाचवा महिना सुरू असताना गर्भवती सुंदर दिसते, तसे सृजनाचे अलंकार ल्यायलेली, बहरलेली वसुंधरा दिसते. तर हिरव्या रंगात नटलेला आसमंत बघून गुरू ठाकूर म्हणतात,

**झरे मेघ आभाळी तेव्हा**
**हळूच हिरव्या रानी जावे**
**ठायीठायीचे हिरवे यौवन**
**गात्रांमध्ये भरून घ्यावे.**

आपल्या आसमंताचा रंग, गंध, नाद आपल्या अंतरंगात पोहोचतात आणि निसर्गाच्या रंगात जीवन रंगते. रंगीबेरंगी रानफुलांचा साज लेवून नटलेला-सजलेला, शुभ्र फुलांच्या सुगंधाने दरवळणारा, हिरव्यागार पर्णसंभाराने समृद्ध झालेला श्रावणातला हा लावण्याने रसरसलेला निसर्ग आपल्या जीवनात रंग भरतो. श्रावणातल्या प्रत्येक सणात विविधरंगी फुलांसोबत हिरवीगार पत्रीही भगवंताला अर्पण करतात. यात दुर्वा, आघाडा, केना, रुई, जास्वंद, शमीपत्र, बेल वगैरे अनेक वनस्पतींची औषधी ओळख टिकवण्यासाठी ही परंपरा आहे. आम्ही लहानपणी परड्यांवर फुल-पानांची सुंदर नक्षी लेखून भराडी गौर सजवायचो. या महिन्यात साजरे होणारे सण मानवी आयुष्यात आनंदाची पेरणी करतात. भारत हा कृषीप्रधान देश आहे. नागपंचमी आणि पोळा हे शेतकऱ्यांच्या घरात उत्साहाने साजरे होणारे सण! पावसाने अंकुरलेल्या हिरव्यागार शेतातील उंदीर-घुशींचा त्रास कमी करणारे नाग-साप यांना आपल्या नांगरण्याने इजा होऊ नये म्हणून नागदेवतेची आराधना नागपंचमीला करतात. शेतकऱ्यांचा जिवाभावाचा मदतनीस बैल! नांगरणी करून थकलेल्या बैलांची खांदेमळणी करून, सजवून, गोडधोड खाऊ घालून पोळ्याला त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतात. नागपूरकर भोसले रघुजी राजे यांनी मुलांवर बैलांप्रती आस्थेचा संस्कार करण्यासाठी तान्हा पोळ्याची प्रथा सुरू केली. आईविषयी प्रेम व्यक्त करणारा मातृदिन, बहीण-भावंडांचं नातं समृद्ध करणारा रक्षाबंधन असे नात्यांना जपणारे, निसर्गाप्रती आणि प्राणीमात्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे सण निसर्गरम्य श्रावणात साजरे होतात. भरगच्च सणांनी नटलेला श्रावण नागपंचमीला सुरू होऊन पोळा साजरा करीत आपला निरोप घेतो. शांताबाई शेळके म्हणतात,

**चारा हिरवा हिरवा रे, वर उदकाचा शिरवा रे**
**मनातले सल रूजून त्याचा,**
**आता झाला मरवा रे!**

श्रावणात हिरवे चैतन्य सारा आसमंत व्यापते आणि मनाच्या कानाकोपऱ्यात दडलेली सारी किल्मिषे जाऊन मनात मरव्याचा सुगंध दरवळतो आणि अशा वातावरणात आपण भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणरायाचे उत्साहाने स्वागत करतो.

भारतात स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी साधारणपणे १३० वर्षांपूर्वी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत दहा दिवसांचा सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही वैचारिक देवाणघेवाण, समाजजागृती करणे आणि भारतातील सांस्कृतिक मूल्ये जपणे हा सार्वजनिक गणेशोत्सवाचा महत्त्वाचा भाग आहे.

गणेशोत्सव हा भारतीय संस्कृतीचा वारसा म्हणून जपताना आपल्याला निसर्गभान राखणे गरजेचे आहे. उत्साह वाढविणारा उत्सव! पण सध्या गणेशोत्सव म्हणजे गणपतीची अवाढव्य मूर्ती, मोठमोठे सजावटीचे देखावे, डोळे दिपवणारा प्रकाशोत्सव, ढोल-ताशे व भोंग्यांवर मोठ्या आवाजात भजने, गाणी आणि डीजेने निसर्गाचे जतन कसे होणार? प्लास्टर ऑफ पॅरिसच्या किंवा काही पक्केपणा आणणाऱ्या पदार्थांशिवाय गणपतीच्या मोठमोठ्या मूर्ती बनू शकत नाहीत. त्या मूर्तीला रंगवताना वापरलेले तैलरंग पाणी प्रदूषित करतात. एलइडी व लेझर लाईट्स डोळ्यातील रेटिनाला त्रासदायक असतात. मोठ्या आवाजात चालणारे भोंगे ध्वनिप्रदूषण करतात. सहज विघटन होऊन मातीत, पाण्यात वा आसमंतात न विरघळणारे हे घटक वसुंधरेला घातक आहेत. त्या सगळ्यांचा वापर शक्य तितका कमी करता येईल, अशा तऱ्हेने गणेशोत्सव साजरा करता येईल का? आपल्याला पृथ्वी पूर्वजांकडून वारसा म्हणून मिळाली असली, तरी आपण ती आपल्या मुलांकडून उधार घेतली आहे, असाही विचार व्हायला हवा. पुढच्या पिढीसाठी आपण निर्मळ नितळ पाण्याची जलाशये, स्वच्छ झुळझुळता वारा आणि प्रदूषणरहित वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करावा ना?

बाप्पा मोरया, निसर्गाप्रती जागरुकतेची जाणीव वाढून समाजात सहसंवेदना आणि बंधुभाव वसू दे, घराघरात स्वास्थ्य आणि समृद्धी राहू दे आणि प्रत्येकाला सुख आणि समाधान लाभू दे अशी प्रार्थना! ●●

## गावगाडा

# गावाकडची शाळा

● अखिल देशपांडे
९७६७१५१८३०

ग्रामीण भागात वास्तव्य असलेल्या साधारणतः ऐंशी-नव्वदच्या दशकातील आमच्या पिढीने जिल्हा परिषदेच्या शाळेतच प्राथमिक शिक्षण घेतले. त्यावेळी आमच्या गावास कॉन्व्हेंट संस्कृतीचा स्पर्शही झाला नव्हता. कौलारू, तट्ट्याच्या शाळेत प्राथमिक शिक्षणाचे धडे घेतलेली आमची पिढी आणि या पिढीला घडवणारे गुरुजी हे गुरू-शिष्याचे पवित्र नाते कधीही विसरता येणार नाही.

शाळेत सुविधांचा अभाव असला तरी शिक्षणाचा दर्जा खूप मोठा होता. नैतिक मूल्यांचे शिक्षण अगदी कृतीतून सहज घडून जायचे, त्यासाठी अभ्यासक्रमात कुठल्याही समावेशाची गरज नव्हती.

बसायला तरटपट्ट्या होत्य,ा त्या आम्ही स्वतः टाकायच्या आणि शाळा सुटली की त्या व्यवस्थित गुंडाळून लाकडी पेटीत ठेऊन द्यायच्या. वर्ग आणि शाळा परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच असायची, यात आम्हाला कुठलाही कमीपणा वाटत नव्हता. मूळात इथूनच चांगल्या सवयी आत्मसात करता आल्या. शिक्षकाने एखादे काम सांगितल्यास ते करतानाचा आनंद शब्दांत व्यक्त करण्यापलीकडचा होता.

हजेरी घेताना गैरहजर विद्यार्थ्यांकडे शिक्षकांचे बारीक लक्ष असायचे, मग त्याला शाळेत पकडून आणण्यासाठी दोन हात-दोन पाय धरता येतील अशी धष्टपुष्ट मुले त्याच्या घरी पाठवली जायची. गुरुजींचा आदेश हा अंतिम असायचा, त्याला कुठलाही पालक विरोध करायला सहसा धजावत नव्हता. गुरूंप्रती असलेली ती आदरयुक्त भीती आज मात्र कुठेतरी हरवल्यासारखी वाटते.

गावाचे शिक्षकांशी एक आदरयुक्त नाते असायचे. शिक्षकांचा शब्द मोडण्याचा प्रघात नव्हताच. रस्त्यात कुठेही गुरुजी दिसले की, आमची पळापळ सुरू व्हायची, या गल्लीतून त्या गल्लीत लपत-छपत गुरुजी जाईपर्यंत सुरक्षित स्थानी आश्रय घायचा. चुकून नजरानजर झाल्यास उद्या गुरुजी काय शाळा घेतील, या विचारात रात्रभर झोपच यायची नाही.

'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' ही म्हण अगदी कृतीतून त्यावेळचे गुरुजन सिद्ध करून दाखवायचे. शाळेत शिक्षा झाली हे घरच्यांना कळले की घरी त्यापेक्षा दुप्पट शिक्षा व्हायची. गुरुजनांप्रती पालकांमध्ये एवढा आदर आणि विश्वास होता की, शाळेत आपल्या पाल्यास झालेल्या शिक्षेस आक्षेप घेण्याचा विचारसुद्धा मनाला शिवत नव्हता.

मोजक्या पगारात संस्कारी आणि समृद्ध पिढी घडवणारे गुरूजन हेच समाजाचे आदर्श होते. शाळेची इमारत टोलेजंग नसली तरी एक आदर्श नागरिक घडवण्याची क्षमता त्या शाळेत होती. शाळेत साधे पंखेसुद्धा नसायचे पण खिडकीतून येणारी वाऱ्याची झुळूक मन प्रसन्न करायची. शाळा सुटताना लांब घंटा झाली की मग 'वंदन माझ्या आईला जगात आणिले जिने मला, अभिवादन गुरुदेवाला, प्रसंगी जो आधार मजला'... या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मुल्य रुजवणाऱ्या प्रार्थनेने सुट्टी व्हायची.

अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवणारे गुरूजी आजही स्मरणात आहेत. शाळा सुटल्यानंतरही अनेक वर्षे त्यांच्याबद्दलची आदरयुक्त भीती कायम होती. शाळेबाहेरच्या जगात एक आदर्श माणूस म्हणून जगता यावे यासाठी गुरूजींनी आमच्यासाठी घेतलेले परिश्रम यामुळेच आयुष्याच्या लढाईत संघर्ष करायचे बळ मिळाले.

आज शिक्षणाचे झालेले बाजारीकरण पाहून गावाकडची ती जिल्हा परिषदेची शाळा आठवते आणि मग हातातील लेखणीसुद्धा रमते त्या शाळेच्या रम्य आठवणीत.. ●●.

# इतिहासातील गमती जमती

## झुळूक

● मो. बा. देशपांडे
८३२९१९३५४२

इतिहासाचे अवलोकन करताना अनेकदा त्यात सुरस आणि चमत्कारिक गोष्टी आढळतात. त्यात १९६७ सालच्या अमृतमध्ये प्रकाशित हा एक किस्सा.

अबब! चक्क ताजमहालचा लिलाव झाला होता म्हणे! म्हणजे १९२८ साली ईस्ट इंडिया कंपनीची आर्थिक स्थिती फारच खालावली



होती. त्यामुळे त्या वेळेचा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिंक याने ताजमहाल लिलावात काढून कंपनीची आर्थिक स्थिती सावरायची असा निर्णय घेतला.

१९३१ च्या जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात लिलावाचा दिवस निश्चित ठरला आणि त्याप्रमाणे रीतसर घोषणाही करण्यात आली. साधारणपणे ताजमहालची किंमत अंदाजे दोन लाख रुपये येईल, अशी तत्कालीन तज्ज्ञांनी अटकळ बांधली होती. पण, प्रत्यक्ष लिलावात दीड लाखापेक्षा अधिक आकडा पुकारला गेला नाही, त्यामुळे कंपनीने लिलावच रद्द केला. जर दुर्दैवाने ताजमहालचा लिलाव झाला असता, तर तो कधीचा जमीनदोस्त झाला असता; कारण सारी चीज वस्तू लंडनला नेण्याची योजना तयार होती म्हणे! लॉर्ड कर्झनने आपल्या भाषणात म्हटले होते की, विल्यम बेंटिंक केवळ संगमरवरासाठी ताजमहालची विक्री करायला निघाला होता. पण, नियतीच्या मनात तसे काही व्हायचे नव्हते. म्हणून आजही ताजमहाल हा पर्यटकांना खुणावतोय!

दुसरा आणखी एक गमतीदार किस्सा ऐका! मुंबई म्हणजे तेव्हाची बॉम्बे ही इंग्रजांच्या ताब्यात कशी आली? याबद्दल आज अनेकांना कदाचित माहिती नसेल, पण ही गोष्ट खूपच रंजक आहे.

**मुंबई इंग्रजांना कशी मिळाली?**

मूळ मुंबईची सात बेटे पोर्तुगिजांच्या ताब्यात होती. त्यांनी तिथे आपले किल्ले व व्यापार केंद्रे उभी केली होती. इंग्लंड-पोर्तुगाल नातेवाईक संबंध बघता इ.स. १६६१ मध्ये इंग्लंडचा राजा चार्ल्स दुसरा याचा पोर्तुगालची राजकन्या कॅथरीन ऑफ ब्रागांझा हिच्याशी विवाह झाला.

या विवाहात पोर्तुगालने हुंड्यापोटी इंग्रजांना मुंबईची बेटे दिली. त्यामुळे मुंबई इंग्रजांच्या ताब्यात आली. चार्ल्स दुसऱ्याला मुंबई थेट सांभाळणे जड जात होते. म्हणून त्याने इ.स. १६६८ मध्ये ही बेटे ईस्ट इंडिया कंपनीला वार्षिक फक्त १० पौंड भाड्याने दिली. कंपनीने मुंबईत किल्लेबांधणी, व्यापार केंद्रे, गोदी व बंदरे उभी केली. आजचा मुंबईचा विस्तार आणि व्यावसायिक



उलाढाल बघता हीच मुंबई कुणी एकेकाळी लग्नात आंदण म्हणून दिली होती, असं कोणी सांगितलं तर चटकन विश्वास बसायचा नाही, आहे ना गंमत? ●●

## मन्याच्या काड्या

# 'फिटनेस' नको रे बाप्पा...

● मनोज वैद्य
९८२२९४९२६०



"अहो उठा...आलार्म वाजून दहा मिनिटे झाली आहे... लवकर उठा... आजपासून व्यायामाला जाणार होते नं तुम्ही...काय बाई माणूस हा..." असे म्हणून सौ.ने अंगावरचे मऊ पांघरुण सटकन ओढले. अचानक झालेल्या आक्रमणाने मी घाबरून उठून बसलो. डोळे चोळून बघतो तर काय! समोर कंबरेवर हात ठेवून सौ. उभ्या होत्या. "काय गं काय झालं... कशाला उठवलं इतक्यात, झोपू दे नं जरासं..." एक मोठी जांभयी देत मी बोललो. म्हणाली,' अहो वाढत्या वयाची तर काही ठेवा... पोट चाललयं फुग्यासारखं फुगत... बघा...बघा... बनियन छोटी झाली... पायाच्या होत आहे काड्या... डोक्याचं मैदान... अन पक्षातून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यासारखे ते दातं... बघा जरा आरशात एकदा... ए. के. हंगल झालाय." माझ्या व्यक्तिमत्वाचे उत्तम वर्णन हिने केले होते.

खरे तर रोज सकाळी उठून व्यायामाला जाईल, असे म्हणत म्हणत आजचा पाचवा दिवस होता. सौ.चे काहीच चुकले नव्हते किंबहुना तिचे काहीच चुकत नाही. माझ्या व्यक्तिमत्वाचे वर्णन किती खरे आहे, हे बघण्यासाठी मी उठलो व आरश्यात स्वतःला बघितलं. खरं होतं ते... काही प्रमाणात. तडक घड्याळ बघितली. जास्त उशीर झाला नव्हता. सकाळचे विधी आटोपले व फुलपॅन्ट शर्ट घालून तयार झालो. "हॅलो... आय ॲम रेडी... प्लीज गीव मी द टी..." असे लाडीकपणे इंग्लीशमध्ये बोललो. बोलत असतो कधी कधी इंग्लीशमध्ये. आतून एका कपात चहा घेवून सौ. आल्या. "अहो एवढे नटून थटून कुठे निघाला?" "कुठे म्हणजे काय! अगं मार्निंग वॉकला..." "बाप्पा अश्या कपड्यात... मला तर वाटलं लग्नाबिग्नाला निघालात... अहो, ती ट्रॅक सुट घाला नं...दिवाळीत सासऱ्यांनी दिलेली. नेहमी म्हणता नं की काहीच देत नाही म्हणून. मग मी ती शोधली व एकदाचा तयार झालो. घरातच उभ्या उभ्या दोन-तीनदा धावून बघितलं. सौ. ने मान अशी डोलावली की 'काय बाई ध्यान' असेच म्हटले असेल कदाचित. मी नेमका त्याचा अर्थ समजलो नाही. थंडीचे दिवस होते म्हणून कानाभोवती मफलर गुंडाळलं केजरीवालसारखं व निघालो एकदाचा. आमचे घर रहदारीच्या रस्त्यावर असल्याने मी तेथून धावणे टाळले व एका गल्लीमधून आपला मार्ग पकडला. धावायची सवय नव्हती, पायांवरील शरीर कदाचित जड जात असेल, त्यामुळे गती विशेष नव्हती. काही अंतर धावता धावता समोरच चार कुत्री गप्पा मारीत बसली होती. मी दिसताच त्यांनी कान टवकारले व सगळ्यांनी एकदम माझ्याकडे बघितलं. मी पण धावायचं थांबलो. आता समोर जावू की नको, याचा विचार करू लागलो. त्यातील दोन कुत्री शेपटी हलवायला लागली, तेव्हा असं वाटलं की, कदाचित आता त्यांना ओळख पटली असेल. मग मी धावत राहण्याचं ठरवलं व धावायला लागलो. त्यांच्या जवळून जस्स गेलो तसं इतर दोन कुत्रे उठले व माझ्या सोबत धावायला लागले. मला वाटलं यांना पण मॉर्निंग वॉक करायचा की काय? धावता धावता त्यातील एकाने माझा पायजामाच पकडला. आता मात्र मी घाबरलो. माझी अचानक धावण्याची स्पीड वाढली. आता त्यांचीही वाढली. माझ्या तोंडून "अवं आई वं..." एवढंच निघायचं बाकी होतं. जीवनात कधी नसेल एवढा जोरात धावलो. शेवटी मी जिंकलोच. धापा टाकीत घरी आलो. एवढं दमलेलं बघून सौ. म्हणाल्या, "एवढं कशाला पळायचं हो पहिल्याच दिवशी... थोडं थोडं धावायचं... आणि हे काय? पायजाम कसा फाटला... अहो पडले का कुठे तुम्ही?" दम लागल्यामुळे मी तिच्या एकाही प्रश्नाचं उत्तर पटकन देऊ शकलो नाही. थोडा दम कमी झाल्यावर श्वानपथक कसं मागे लागलं हे सांगितलं. पोट्टे पडद्यामागून हासत होते. "अहो असं करा... समोरच्या बगिच्यात जा. हरीभाऊ पत्राळे काका रोज फिरतात व योगासन पण करतात. ते तुम्ही करा." मलाही ते पटलं. धावण्यापासून सुटका झाली, याचा आनंद वाटला. दुसऱ्या दिवशी मीच सकाळी लवकर उठलो. नवरा सुधारला पाहून सौ.ला पण हायसे वाटले. पटकन तिने चहा दिला व मी बगिच्यात गेलो. पत्राळे काका दोन मित्रांसोबत फिरत होते. मला बघताच म्हणाले," या वैद्य साहेब, करताय न योगासन." मी होकार दिला व त्यांच्यासोबत थोडे फिरल्यावर योगासने करायला लागलो. त्यांना खुप सवय होती, मला यातील काहीच माहीत नव्हते. मीच तावडीत सापडलो की काय म्हणून पत्राळे काकांनी तासभर असे करा, तसे करा, इकडे वाका, तिकडे वाका, श्वास आत घ्या, बाहेर सोडा, असे म्हणत म्हणत किमान डझनभर तरी आसनं करून घेतली. योगासन करता करता कुठेतरी नस लागली असेल, पाय दुखायला लागला. घरी गेलो ते लंगडतच. "अहो आज काय झालं? पाय पकडला का श्वानांनी?" "अगं कुठेतरी लचक भरली दिसते... तो मलम आण बघू..." अर्धा तास मलम लावत बसलो. पोट्टे यावेळी पण पडद्यामागून हसत होते. दिवसभरात तसा अकडलोच. मग ठरवलं की घरीच जसा होईल तसा व्यायाम करायचा. माझ्या कर्तृत्वावर सौ. तशा खुश नव्हत्याच, पण उगाच काही होण्यापेक्षा हे घरात कां होईना पण व्यायाम करातहेत, याचेच समाधान तिला होते.

दुसऱ्या दिवशी मी घरातच उड्या मारल्या, छोटे मोठे व्यायाम केले व तब्बल विसेक सूर्यनमस्कार घातले. अंगात स्फुर्ती आल्यासारखे वाटले. सौ. समोरून गेली की उगाचच जास्त ताकदीने व्यायाम केला. नंतर सर्व सोपस्कार आटोपले. परंतु, दुपारी अचानक छातीत दुखायला लागले. प्रत्येक जण आपापल्या परीने हदयरोगतज्ज्ञ झाले. सौ. घाबरल्या. आम्ही पहिले साध्या दवाखान्यात गेलो. ते म्हणाले, बहुदा हार्टअटॅकची चिन्हे दिसतात. लगेल हृदयरोग तज्ज्ञाकडे गेलो. त्यांनी छाती दुखते म्हटल्यावर इतर टेस्ट करायला घेतल्या. सौ.च्या चेहऱ्यावर उदासिनता होती. उगीच यांना व्यायामाला पाठवले, असे तिला वाटत असावे. मी धीर देत होतो. आता वारंवार 'पॉलिसी नीट ठेवलीय नं...?" असा प्रश्न विचारत होतो. इकडे रिपोर्टची वाट होती. नाना तऱ्हेचे प्रश्न मनात येत होते. कुत्रे, पत्राळे काका सगळे आठवत होते. पॉलिसी काढून ठेवली आहे, असा धीर मी तिला दिला. जाम भडकली. पॉलिसी बिलीसी नको मला, तुम्ही हवे म्हणाली. तितक्यात डॉक्टरचे बोलावणे आले. इसीजी व इतर रिपोर्ट डॉक्टर असे काही नजरेने बघत होते की, मला वाटलं घेते का टेबलवर! "काही नाही, रिपोर्ट नॉर्मल आहे. कुठेतरी स्नायू दुखावले आहे. जास्त उचलदडप करू नका, अवास्तव व्यायाम करू नका, आराम करा वगैरे सल्ला त्यांनी दिला." आम्ही घरी परत आलो. सर्वांना खुप आनंद झाला. आईच्या पाच-सहा माळा जपून झाल्या होत्या. रात्री झोपायला गेलो. सहज हिला विचारले, "अगं उद्या किती वाजता उठू..." माझ्याकडे न बघता ही म्हणाली, "आरामात उठा घाई नाही उद्यापासून..." किती आनंदाचा क्षण होता तो माझ्यासाठी म्हणून सांगू. ●●

# बालपण गावाकडचे



कधी वाटतं किती लवकर बालपण सरल
त्या दिवसांना आठवताच मन गहिवरल
कुठे ते अल्लड दिवस खेळण्या बागडण्याचे
गावच्या अंगणी मनमुराद धमाकूळ घालण्याचे
लगोरी, विटीदांडू, हातावर भोवरे गरगरले
हे खेळ आज फक्त कागदावरच उरले
गावच्या मातीला भन्नाट उदासीनतेने घेरले
बालपाखरे भविष्य शोधण्या शहरी उडून गेले
वडाच्या पारंब्या प्रतिक्षेने म्हाताऱ्या झाल्या
पाखरांविना कितीक वर्षांपासून कोमेजल्या
चिंच, दूध गोळ्या खाऊ किती सुखद होता
छोट्या गोष्टींतला आनंद निराळाच होता
बालपण जगणारी आमची पिढी शेवटची
चिऊ, काऊ आता दृष्टीस नाही पडायची
गंमत नाही कळणार त्या दिवसांची
मोबाईल, गेमशिवाय
वेगळीच मजा बालपणाची
वास्तविकतेत डोकावताना स्वप्नवत भासत
डोळे उघडताच करिअर समोर उभ ठाकत
गावातल्या दिवसांची आठवण काहूर माजवते
शहरी धावपळ, गोंगाट साऱ्यांना मिटवू पाहते

● प्रतीक्षा जोशी/७५५९३१८९३० ●●

● संयोजक : संजय रामगिरवार- ९८८१७१७८३२ ●

## स्पंदन

# आपत्तीमुळे व मूर्ख माणसामुळे...

● आशिष देव
७७४१८१८४१८



आपत्तीमुळे व मूर्ख माणसामुळे निर्माण होणारे दुःख दूर करण्यासाठी विनोदाची कास धरावी... असे प्र. के. अत्रे म्हणून गेले. असा कोण असतो, ज्याच्या जीवनात आपत्ती व मूर्ख माणसे येत नाहीत? जगी आपत्तीमुक्त व मूर्ख भेटमुक्त मनुष्य कोण आहे? असे या पृष्ठभूमीवर विचारता येण्यासारखे आहे.

आपत्ती फक्त कुंतीने स्वतःहून मागितली. पण, सर्वसामान्य व्यक्ती आपत्तीच्या नावाने गांगरून जात असते. तिला आपत्तीमुक्त जीवन हवे असते, पण ते शक्य नसते. आयुष्यात कधी कोणी मूर्ख माणूस भेटला नाही, अशी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. प्रत्येकाची कधी न कधी मूर्ख माणसाशी गाठभेट झालेली असते व त्यायोगे मनस्ताप पण झालेला असतो.


तात्पर्य हेच की, आपत्ती आणि मूर्ख माणसे कायम वेदनादायी असतात. या दोहोंचा जीवनातील वावर दुःख देऊन जात असतो. आपत्ती आणि मूर्ख माणसे आयुष्यात येणे न येणे आपण ठरवू शकत नसतो. या दोन्ही गोष्टी कधी अंगावर आदळून जातील आणि हानी करून जातील, याचा नेम नसतो.

यांना टाळता पण येत नाही आणि त्यांच्यामुळे होणारे दुःख सहन पण करता येत नाही. अशा वेळी विनोदाची कास धरावी आणि वेदनेची धार बोथट करावी, असे अत्रे सुचवून जातात. अशा वेळी स्वतःवर हसावे, जगावर हसावे. अर्थात् उपहासाने किंवा खिल्ली म्हणून नव्हे तर निकोपपणे, निरागसतेने. आपत्तीना आपण येऊ नका, असे म्हणू शकत नाही, त्याचप्रमाणे मूर्ख माणसांना मूर्खपणा करू नये, असेही म्हणू शकत नाही. अशा वेळी विनोद मदतीला धावून येऊ शकतो, असे अत्रेना अभिप्रेत होते.

जगाला हसविणाऱ्या चार्ली चॅपलीनच्या जीवनात अनेक वेदना होत्या. पण, त्यांनी विनोदाची कास धरली आणि केवळ स्वतःच्या वेदनेवर मलम नाही लावले, तर जगातील लोकांच्या दुःखाला पण सौम्य केले. हास्य त्यांनी औषधासारखे वापरले. मी खूप हसतो; कारण इतक्या वर्षांच्या अनुभवाने जाणले की, रडण्याने आणि व्यथित होण्याने जगातील गोष्टीत काही सुधारणा होत नसते, असे विनोबा म्हणून गेलेत.

अत्रे असो की विनोबा दोघाच्याही सांगण्याचा रोख हाच आहे की. ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात नाहीत, त्याने दुःखी होण्यापेक्षा त्याकडे विनोद बुद्धीने पाहा आणि पुढे चला. आपत्ती हा जसा जीवनाचा अविभाज्य घटक असतो, त्याचप्रमाणे मूर्ख माणूस पण असतो. समोरून अंगावर येणाऱ्या सांडाला ज्ञान देण्यात काहीच अर्थ नसतो. त्याच्या मार्गातून बाजूला होणे हेच शहाणपण असते. हे सूत्र लक्षात ठेवून विनोदाची कास धरत आपत्ती आणि मूर्ख माणसांच्या वाटेतून दूर राहिले पाहिजे... ●●

# तुळस



तुळसी पत्र वाहते मी
तुजशी श्याम सुंदरा
श्याम सुंदरा मदनतात
मनोहरा ॥ धृ॥
तुळसी वृन्दावनी
एक तुळसी बीज पेरीले
स्नेह उदक घालुनिया
वाढविले तरुवरा । ।१ ॥
हिरवागार प्रेमरंग रंगवी मनास या
मधूर मधूर वास येई देई प्शांती
अंतरा । ।२ ॥
तुळसी मंजुरीचे तुरे टवटवीत लटकती
हेची आवड तुजशी
प्रभो प्रिय रुक्मिणी वरा ।३॥
तुळसी हार, तुळसी तुरे,
तुळसी वस्त्र गुंफीले
शुद्धभाव तबकी भरूनी
पातले मी या स्थळा ।४॥
पुजनाशी अधीर बहूत
जाहले मी श्रीधरा
पूर्ण करी हेची प्रभो॥ फ
शरण चरणी किंकरा ॥५॥ ●●

● मालती देशकर

# तुळशीची आरती

आरती करू तुळसी मातेची
आरती करू तुळसी मातेची
करुणाघन ही पर्यावरण सांभाळते
घराचे रक्षण करते
आरती करू तुळसी मातेची...
तिच्यामध्ये आहे
राम आणि कृष्णाचा वास
उद्धरते ही सर्वांना
जो धरेल तिचा ध्यास
आरती करू तुळसी मातेची...
अंगणी राहते ही माय
केवळ मायाच करते आम्हावर
आरती करू तुळसी मातेची...
सर्वही तीर्थांचे फळ मिळेल आम्हास
धरावी तिची आस
पिसारा हा तिचा
हिरवा-काळा भावतो मनास
भरभरून देते ती आशीर्वाद
आरती करू तुळसी मातेची आरती
करू तू तुळसी मातेची ●●

● डॉ. अचला तांबोळी
९८९०६१७५३९

# हाय शेक्युरीटी नंबर प्लेट




कोण कुठं शक्कल लढवल
कोणाचा उघडन पेटारा
पंधरा वर्ष वयाची गाडी
होईन म्हणते खटारा
दोन पैसे जमवू जमवू
जुनी घेतली गाडी
छोटी नोकरी माही राजा
मोठ्या हाय अडचणी
दिवसभर राबून राबून माहे
वाजून जाते बारा
पंधरा वर्ष वयाची गाडी
होईन म्हणते खटारा
मुलावानी गाडीची माह्या
घेतो मी लै कायजी
सर्व्हिसिंग ऑईल गिल
करतो वरच्या वरती
आवाज नाय खट खट
नाय धूर सोडत कारा
पंधरा वर्ष वयाची गाडी
होईन म्हणते खटारा
थंड हवेच्या झुळूक मँधी
नेते करत बसते नियम
हे करा न ते करा सांगते
पायते का आमचा संयम
मतदानाच्या इमारतीचा
अशान कोरा होईन सात बारा
इन मीन पंधरा वर्षात कशी
गाडी होईन खटारा
ग्रीन टॅक्स वर वरचेवर
वाढते चक्रवाढ व्याज
गजकर्ण लावलं कोणी नव
कोणची कोनाले खाज
वेठीस नका धरू जनता
करतील गार् म गारा
इन मीन पंधरा वर्षात गाडी
कशी होईन खटारा
नवीन नंबर प्लेट द्या
सर्व ग्रीन टॅक्स करून माफ
जनतेची करा कदर थोडी
मन ठेऊन साफ
वेठीस धराल जनतेला
समजू नका कमी
पाच वर्षात सरकार खटारा
आमची ताकत, आमची हमी ●

● मनोज वैद्य
९८२२९४९२६०

गुंतवणुकीची गोष्ट

## सामान्य गुंतवणूकदारांच्या सर्वांत सामान्य चुका आणि त्यावर उपाय

आजच्या सदरात आपण सामान्य गुंतवणूकदारांच्या सर्वांत सामान्य चुका आणि त्यावर उपाय बघणार आहोत.

भारतासारख्या प्रगत होत असलेल्या अर्थव्यवस्थेत रिटेल गुंतवणूकदारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेअर बाजार, म्युच्युअल फंड, बाँड्स, विमा, सोनं, स्थावर मालमत्ता अशा असंख्य गुंतवणूक साधनांचा वापर करून अनेक लोक आपला आर्थिक पाया मजबूत करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, योग्य मार्गदर्शनाअभावी व भावनेच्या भरात घेतलेले निर्णय यामुळे सामान्य गुंतवणूकदार वारंवार काही ठराविक चुका करतात. या चुका टाळल्या तरच दीर्घकालीन संपत्तीची निर्मिती शक्य होते.

**चला या सामान्य चुका व त्यावरचे उपाय समजून घेऊया**

**१) नियोजनाशिवाय गुंतवणूक करणे** : अनेक गुंतवणूकदार 'सर्व जण गुंतवणूक करीत आहेत म्हणून मीसुद्धा करतो' या पद्धतीने बाजारात पैसे घालतात.

कुठल्याही ठोस उद्दिष्टाशिवाय केलेली गुंतवणूक दीर्घकाळ टिकत नाही. 'ते सुनीलने गुंतवणूक केली म्हणून मी पण करेल,' असे म्हणून गुंतवणूक करतात, बरेचदा तर याच्या मित्राने, मग तो म्हणतो मित्रांच्या मित्राने सल्ला दिला, असे करत नेमके कुणी सुचविले, हे माहीत नसताना नियोजनाशिवाय गुंतवणूक केली जाते आणि तिथेच आपले चुकते.

**उपाय** : गुंतवणुकीआधी आपत्कालीन निधी, मुलांचे शिक्षण, घरखरेदी, निवृत्ती अशा उद्दिष्टांची यादी तयार करा आणि प्रत्येकासाठी योग्य साधन निवडा. जसे, अल्पकालीन गरजेसाठी बँक एफडी किंवा लिक्विड फंड, तर दीर्घकालीन निवृत्तीसाठी इक्विटी म्युच्युअल फंड.

**२) बाजाराच्या अफवा व टिप्सवर विश्वास ठेवणे** : 'हा शेअर दुप्पट होणार', 'हा म्युच्युअल फंड जबरदस्त आहे,' अशा टिप्सवर अनेकजण पैसे लावतात. यातून मोठं नुकसान होऊ शकते. अगदी सुशिक्षित लोक सुद्धा गुंतवणूक का करावी, याचे उत्तर ना शोधता कुणी तरी सांगते आणि टिप मिळाली म्हणून गुंतवणूक करतात. त्यासाठी ते पैसे मोजायला पण तयार असतात. पण पैसे मोजायचेच झाले तर टिप का घ्यावी?

**उपाय** : गुंतवणुकीचे निर्णय नेहमी अभ्यास व अधिकृत माहितीच्या आधारे घ्या किंवा प्रमाणित गुंतवणूक सल्लागार यांच्याकडून मार्गदर्शन घ्या.

**३) भावनेच्या भरात निर्णय घेणे** : बाजार खाली आला की भीतीमुळे गुंतवणूकदार आपले शेअर्स तोट्यात विकतात, तर बाजार वर जातो, तेव्हा लालसेपोटी जास्तीचे पैसे गुंतवतात, असे म्हणतात की अजून कुणाचा नफा बघून बरेचदा हुरूप येतो, पण त्यावेळी खरंच गुंतवणुकीची गरज आहे का? टायमिंगला पण महत्त्व असते.

**उपाय** : बाजारातील चढ-उतार तात्पुरते असतात. शिस्तबद्ध एसआयपी आणि दीर्घकालीन दृष्टिकोन यामुळेच संपत्ती तयार होते. भावनांपेक्षा योजनांना प्राधान्य द्या.

**४) पोर्टफोलिओत विविधता नसणे** : फक्त एका कंपनीत किंवा एका प्रकारच्या गुंतवणुकीत पैसे गुंतवल्यास जोखीम वाढते. इंग्रजीत म्हण आहे, 'यू शूड नॉट कीप ऑल एग्स इन सेम बास्केट' आणि आपण हेच विसरतो.

**उपाय** : इक्विटी, डेट, सोनं, म्युच्युअल फंड, बाँड्स अशा विविध साधनांचा समतोल वापर करा.




उदाहरणार्थ ६०% इक्विटी, ३०% डेट, १०% सोनं असे मिश्रण.

**५) एसआयपीमध्ये सातत्य न ठेवणे** : बाजार खाली आल्यावर अनेकजण एसआयपी बंद करतात किंवा मधेच पैसे काढून घेतात. त्यामुळे अपेक्षित परतावा मिळत नाही. कित्येकदा आपले एसआयपीचे हफ्ते चुकतात, नुकसान आपलेच असते. इंग्रजीत म्हणतात की, 'यू शूड बी ग्रीडी व्हेन अदर्स आर फिअरफुल, अँड यू शूड बी फिअरफुल व्हेन अदर्स आर ग्रीडी' आणि आपण नेमके याच्या उलटेच वागतो. भावनेच्या भरात आणि एसआयपीमध्ये सातत्य ठेवत नाही.

**उपाय** : एसआयपी ही दीर्घकालीन शिस्त आहे. बाजार कोसळला तरी एसआयपी चालू ठेवा. त्या काळात मिळालेल्या स्वस्त युनिट्समुळे दीर्घकालीन नफा अधिक होतो.

**६) कर सवलतीकडे दुर्लक्ष करणे** : फक्त परतावा पाहून गुंतवणूक केली तर करसवलतीचा फायदा मिळत नाही. पण बरेचदा कर सवलतीचा विचार करून गुंतवणुकीचे म्हत्त्वाचे निर्णय घेण्यापासून आपल्याला सिए सांगत असतात. त्यामुळे त्याचा सुद्धा विचारपूर्वक निर्णय घेतला गेला पाहिजे.

**उपाय** : ईएलएसएस फंड, पीपीएफ, एनपीएस अशा योजनांमध्ये गुंतवणूक करा. या योजना करसवलत तर देतातच, पण दीर्घकालीन निधी निर्माण करण्यास मदत करतात.

**७) लवकर श्रीमंत होण्याचा मोह** : 'काही महिन्यांत पैसे दुप्पट' अशा आश्वासनांना भुलून धोकादायक योजनांमध्ये पैसे अडकवले जातात. आपल्या आजूबाजूच्या कित्येक लोकांनी हाथ भाजले आहे, हे माहीत असताना सुद्धा आपला कित्येकदा अशा फसव्या योजनांपासून मोह आवरत नाही आणि नेमकी चूक होतेच. प्रयत्नांना कधीही आपण बायपास करू शकत नाही आणि त्या साठी मोजावा लागतो तो म्हणजे वेळ.

**उपाय** : कोणतीही गुंतवणूक म्हणजे शर्यत नसून, मॅराथॉन आहे. सातत्याने आणि संयमाने गुंतवणूक केल्यासच मोठं भांडवल तयार होते.

**८) विमा व गुंतवणूक यात गल्लत करणे** : अनेकदा लोक विमा घेताना त्याला गुंतवणुकीसारखे समजतात. परिणामी ना पुरेसा विमा मिळतो, ना योग्य गुंतवणूक होते. जुने मोबाईल आठवा, ज्यात फक्त फोनची सुविधा होती आणि एसएमएस सुद्धा कठीण वाटायचे. त्याचे चार्जिंग खूप दिवस पुरायचे आणि आज एकाच मोबाईलमध्ये पन्नास गोष्टी होतात, तर त्या मोबाईलला वारंवार चार्ज करावे लागते. एकाच प्रॉडक्टमध्ये विमा गुंतवणूक, कर सवलत सगळे घेतले तर चार्जिंग उतरेलच न लवकर.

**उपाय** : विमा म्हणजे संरक्षण आणि गुंतवणूक म्हणजे संपत्ती निर्मिती. त्यामुळे टर्म इन्शुरन्सद्वारे सुरक्षा घ्या आणि गुंतवणूक वेगळी ठेवा.

**९) पोर्टफोलिओचे नियमित पुनरावलोकन न करणे** : एकदा गुंतवणूक केली की, ती विसरून जाणे हीसुद्धा मोठी चूक आहे.

**उपाय** : दर ६-१२ महिन्यांनी पोर्टफोलिओचे पुनरावलोकन करा. गरज पडल्यास री-बॅलन्स करा, म्हणजे जोखीम योग्य पातळीवर राहते.

**१०) व्यावसायिक सल्ल्याकडे दुर्लक्ष** : 'मलाच सगळं समजते' या भावनेमुळे अनेक गुंतवणूकदार तज्ज्ञ सल्ला घेत नाहीत.

**उपाय** : प्रमाणित गुंतवणूक सल्लागार किंवा आर्थिक नियोजकांचा सल्ला घेतल्यास योग्य निर्णय घेता येतात.

**निष्कर्ष** : सामान्य गुंतवणूकदारांनी या चुका टाळल्या, तर आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे अवघड नाही. नियोजन, शिस्त, विविधता, संयम आणि पुनरावलोकन ही पाच मूलतत्त्वे लक्षात ठेवा. छोट्या रकमेपासून सुरुवात करून सातत्य ठेवल्यास मोठी संपत्ती उभारणे शक्य आहे. ●●

● **शिवाणी दाणी वखरे**
संचालिका, मनी बी इन्स्टिट्यूट प्रा. लि.
९८६०१-३३८६०

## आपत्कालीन निधी एक महत्त्वपूर्ण गरज

अर्थभान

इजिप्तच्या पिरामिडबद्दल माहिती असलेच. त्याचा आकार आणि भव्यता अनेक शतकांपासून जगाला मोहिनी घालत आलेला आहे. त्रिकोणमिती शिकत असताना आपल्याला कल्पना आहे की, आधार जितका मोठा असेल, तितकीच भव्य रचना उभारण्यास मदत होते. आपल्या सुरक्षित आर्थिक भविष्यासाठी सुद्धा आपला आधार मजबूत हवा, म्हणूनच योग्य जीवन आणि आरोग्य विमा आवश्यक आहे. सोबतच आपत्कालीन निधी. अचानक उद्भवणाऱ्या संकटाच्या वेळी किंवा उत्पन्नात खंड पडल्यास हा निधी तुमच्या कुटुंबाला सुरक्षित ठेवण्यासाठी मदत करतो. आयुष्यात काही संकट आल्यास तुम्हाला कर्जात बुडण्यापासून वाचवतो. कोणत्याही व्यक्तीने, कितीही उत्पन्न असता वा घराचा आकार काहीही असो, आपत्कालीन निधी ठेवणे आवश्यक आहे. आपत्कालीन निधी म्हणजे अशा तरतुदींची बचत, जी केवळ अनपेक्षित खर्चासाठी वापरली जाते. जसे की, आरोग्य विमा नसल्यास अचानक उद्भवलेला वैद्यकीय खर्च, नोकरी गेल्यास उत्पन्न बंद झाल्यास घर खर्च भागवणे, घर किंवा वाहन दुरुस्तीसाठी अपेक्षेपेक्षा जास्त खर्च येणे असे एक किंवा अनेक कारणे ही आपत्कालीन निधीकरिता कारणीभूत ठरतात.



**आपत्कालीन निधी किती असावा**

तज्ज्ञांच्या मते, किमान तीन ते सहा महिन्यांचा आवश्यक खर्च आपत्कालीन निधीत असावा. योग्य रक्कम मात्र प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक परिस्थिती आणि उत्पन्नावरून ठरवणे बरोबर राहील. ढोबळमानाने;

- नोकरी स्थिर असेल, घरातील दोन व्यक्ती कमावते असतील, तर किमान तीन ते सहा महिन्यांचा खर्च.
- फ्रीलान्स, कंत्राटी किंवा घरात एकच व्यक्ती कमावता असेल, तर किमान सहा ते नऊ महिने किंवा एक वर्षभराचा खर्च.
- उच्च उत्पन्न किंवा अजून मालमत्ता असल्यास, कमी रक्कम सुद्धा योग्य असू शकते, पण ती असावी, हे मात्र नक्की.

या व्यतरिक्त कुटुंबातील व्यक्तींचे आरोग्य आणि वैद्यकीय इतिहास कसा आहे? त्यांना वारंवार आरोग्याशी निगड़ित खर्च करावा लागतो का? इतर आर्थिक जबाबदाऱ्या आहेत का? मोठे कर्ज इत्यादी घटक सुद्धा निधी निर्धारणकरिता महत्त्वाचे ठरतात.

**निधीची रक्कम कशी ठरवावी?**

इथे घरातील बजेट माहिती असणे महत्त्वाचे ठरते. काही महिन्यांआधीच्या लेखामध्ये आपण बजट या विषयावर सविस्तर चर्चा केली होती. नुसता खर्चाचा अंदाज़ असणे आणि अचूक माहिती असणे यात मोठा फरक राहू शकतो. त्यामुळे बजंटवर थोडे परिश्रम घ्यावे लागतील. साधारणपणे प्रत्येक महिन्याचे आवश्यक खर्च, घरभाडे, विजेचे बिल, अन्नधान्य, इतर दैनंदिन खर्च, विमाचे हफ्ते, नेहमी लागणारी औषधे, कर्जाचे हफ्ते इत्यादी एकत्र करा आणि ती रक्कम तीन किंवा सहा पट करा. उदाहरणार्थ, महिन्याचा खर्च ४०,००० आहे, तर सहा महिन्यांसाठी २,४०,००० आपत्कालीन निधीत असावा. विनाकारण होणारा, चैनी, मौजमजेसाठी होणारा खर्च यात धरू नका, फक्त गरजेच्या गोष्टींचा विचार करा.

**आपत्कालीन निधी कुठे ठेवावा?**

वर सांगितल्याप्रमाणे या निधीवर आपण चांगला परतावा शोधत नाही, तर फक्त एक सुरक्षित ठेवायची जागा, जी गरज पडल्यास वापरता येईल, ती विचारात घेत आहोत.

१. शक्य असल्यास एक स्वतंत्र सेव्हींग बँक अकाऊंट याकरिता वापरा.
२. कमी कालावधीचे फिक्स्ड डिपॉजिट.
३. म्युच्युअल फंड्समधील लिक्विड किंवा मनी मार्केट फण्ड आणि रोख रक्कम.

**आपत्कालीन निधी कुठे ठेवू नये?**

१. मोठ्या कालावधीचे गुंतवणूक पर्याय जसे की, इक्विटी म्युच्युअल फंड, शेअर्स, वायदे बाजारातील गुंतवणूक इत्यादी. आपत्कालीन निधीचा मुख्य उद्देश सुरक्षित आणि सहज उपलब्ध असणे हा आहे. तुम्ही हे पैसे शेअर बाजारात गुंतवू नये, कारण त्याचे मूल्य चढ-उतार करू शकते आणि जेव्हा बाजार खाली असेल तेव्हा तुम्हाला त्याची गरज भासू शकते.
२. मोठी रक्कम, आपत्कालीन निधीत जमा झाल्यास ते इतर दुसरीकडे वापरायचा मोह टाळावा.
३. असा कुठलाही अकाऊंट जिथून पैसे काढायला दंड बसेल.

**आपत्कालीन निधी का महत्त्वाचा आहे आणि त्याचे फायदे**

आपत्कालीन निधी फक्त पैशांबद्दल नाही; तो आर्थिक स्वातंत्र्याबद्दल आहे. तुम्हाला मदत मिळते:

१. **जास्त व्याज कर्ज टाळण्यास** : अनपेक्षित खर्च भरण्यासाठी क्रेडिट कार्डचा वापर करण्याऐवजी, तुम्ही स्वतःचे पैसे वापरू शकता. यामुळे तुम्हाला जास्त व्याजदर देण्यापासून आणि मोठ्या आर्थिक संकटात सापडण्यापासून बचाव होतो.
२. **तणाव कमी करण्यास** : आर्थिक तणाव चिंतेचे एक मुख्य कारण आहे. तुमच्याकडे एक आधार आहे हे जाणून घेतल्याने अज्ञात गोष्टींची चिंता कमी होते.
३. **धोका घेण्यास** : जेव्हा तुमच्याकडे एक सुरक्षा जाळी असते, तेव्हा तुम्हाला नवीन करिअर, व्यवसाय सुरू करण्याचा किंवा नवीन संधी शोधण्याचा आत्मविश्वास मिळतो, कारण तुमच्याकडे एक योजना/बैकअप प्लान असते.
४. **तुमच्या गुंतवणुकीचे संरक्षण करण्यास** : आपत्कालीन निधीचा वापर करून तुम्ही तुमच्या दीर्घकालीन गुंतवणुकी (जसे की निवृत्ती खाती) बाजारात मंदी असताना कमी किमतीत विकणे टाळता.

**काही महत्त्वाचे मुद्दे**

१. आपत्कालीन निधीला आवश्यक खर्चासारखाच दर्जा द्या.
२. सुरुवात एका महिन्यापासून करा आणि हळूहळू आपल्या उद्दिष्टापर्यंत (३,६,९ महीने) मार्गक्रमण करा.
३. मधल्या काळातील आलेले बोनस, इत्यादी एकमुश्त रक्कम या निधीकरिता वापरा.


**उदाहरण :**

१. कोविड काळात अनेक लोकांच्या व्यवसायात आणि नोकरीत बरेच त्रास झाले. आपत्कालीन निधी असलेल्या लोकांना त्याची झळ बसली नाही किंवा कमी बसली.
२. व्हॅनगार्ड कंपनीच्या अभ्यासातून असे दिसून आले की, ज्या व्यक्तींची आपत्कालीन बचत किमान २,००० आहे, त्यांनी २१% जास्त आर्थिक कल्याण नोंदवले. त्यांना पैशांची कमी चिंता होती आणि आपत्कालीन निधी नसलेल्यांच्या तुलनेत ते अधिक आनंदी होते. यावरून असे दिसून येते की, अनिश्चित काळात एक सामान्य आपत्कालीन निधीदेखील मानसिक आणि भावनिक आरोग्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा करतो. ●●

● **पराग परांजपे**
गुंतवणूक तज्ज्ञ/ ९८२२७३८९०३
Think Financial Intermediary Services Pvt. Ltd.

## चढ-उतारासाठी तयारी करा...

डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेत सत्तेवर आले पण, संपूर्ण जगावर सत्ता गाजवत असल्यासारखे वागत आहेत. अमेरिकेने महासत्ता असल्याचा पुरेपूर फायदा उठवल्याचे सध्या चित्र आहे. ट्रम्प यांच्या मनमानी कारभाराने केवळ जगातील देशच नव्हे, तर स्वत: अमेरिकेतील अधिकारी आणि उद्योजकही त्रस्त आहेत. त्यातही ट्रम्प यांना नोबेल मिळविण्याचा असा काही फितूर चढलाय की, त्यासाठी ते वाट्टेल ते करीत सुटले आहेत. मीच जगात शांतता पसरवणार, असे भासवणारे ट्रम्प सर्वत्र कोलाहल माजवत आहेत. त्यांनी बहुतांश देशांच्या अर्थव्यवस्थांना अस्वस्थ करून सोडले आहे. त्यांच्या टॅरिफच्या निर्णयाने भारतासारखे अनेक देश पीडित ठरताहेत. अर्थात, या परिस्थितीवर भारतासारखा देश स्वदेशीचे हत्यार उगारेल, तर त्यापुढे अमेरिकेचाही तितकासा निभाव लागणार नाही. मात्र, तरीही ट्रम्पच्या टॅरिफने शेअर बाजार आणि एकूणच आर्थिक उलाढालींवर मर्यादा आल्या आहेत. टॅरिफच्या घोषणेपासूनच भारतीय बाजारांमध्ये अस्वस्थता पसरली. आता टॅरिफ प्रत्यक्षात लागू झाले आहे. त्यामुळे आगामी काही काळासाठी ही अस्वस्थता कायम राहणार, हे उघडच आहे.



भारतीय अर्थतज्ज्ञांनीही गुंतवणूकदारांना बाजारातील चढ-उतारांसाठी तयारीत राहण्यास सांगितले आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, व्यापार करार झाल्यास टॅरिफ काही प्रमाणात कमी होऊ शकतात. परंतु जागतिक पुरवठा साखळीतील अस्थिरता आणि बदल चालू राहू शकतात. जोपर्यंत गंभीरपणे पुन्हा वाटाघाटी सुरू होत नाहीत, तोपर्यंत टॅरिफचा मुद्दा कायमच राहील. तसेही भारतीय बाजारातील भावना सध्या कमकुवत आहे. त्यामुळे गुंतवणूकदार फार मोठी मजल मारण्याची हिंमत दाखवू शकणार नाहीत. फक्त या टॅरिफच्या लाटेत मोठी घसरण व्हायला नको, याची खबरदारी घेतली पाहिजे. मात्र, ते कोणाच्याही हातात नाही.

बहुतांश कारभार हा विदेशी गुंतवणूकदारांच्या पैशांवर चालतो. असे असताना अमेरिकेसोबतचा करार न होणे, टॅरिफचे वादळ, भारताची अद्याप स्पष्ट न झालेली नीती यामुळे विदेशी गुंतवणूकदार हवालदिल आहेत. त्यांना पुढील वाट सध्या तरी दिसत नाही. एवढे मात्र नक्की की, बाजारात मोठी उसळी येण्याची शक्यता नाही. सरता आठवडा हा ऑगस्ट महिन्यातील शेवटचा होता. आता सप्टेंबरच्या सुरुवातीपासूनच टॅरिफची अवकळा बाजारावर दिसत आहे. आठवड्याच्या शेवटच्या सत्रात बाजार घसरणीने बंद झाला. विशेष म्हणजे, टॅरिफच्या मुद्यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर जो काही लपंडाव भारत आणि अमेरिकेदरम्यान सुरू आहे, त्याचा शेवट नेमका काय होणार, हे कोणीच समजू शकत नाही. कारण, अमेरिकेच्या टॅरिफवर भारताने कोणतीही भेदक प्रतिक्रिया दिलेली नाही आणि त्याचवेळी ट्रम्पचे फोनही उचलले नाही. उलट, भारताला या मुद्यावर आता चीनची साथ मिळत आहे. त्यामुळे अमेरिकेचा आणखीच तळतळाट होत आहे. काहीही ठोस निर्णय होईपर्यंत बाजारासाठी फक्त 'जे जे होईल ते ते पाहावे' अशीच भूमिका योग्य ठरणार आहे. ●●

● **सोनाली ठेंगडी**-७७५५९३८८२२

| | २२ ऑगस्ट बंदभाव (रु.) | २९ ऑगस्ट बंदभाव (रु.) | उतार/ चढाव |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ८१,३०७ | ७९,८०९ | -१४९८ |
| निफ्टी | २४,८७० | २४,४२६ | -४४४ |
| सोने (१० ग्रॅम) | १,००,५३० | १,०३,३१० | +२,७८० |
| चांदी प्रति किलो | १,१८,००० | १,१९,९०० | +१,९०० |
| कच्चे तेल बॅरल | $ ६७.७३ | $ ६८.२४ | $ +०.५१ |

जीएसटीमधील चुका

## ज्या महागात पडू शकतात
### पत्ता व संपर्क तपशील



वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) व्यवस्थेत प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायाला जीएसटीआयएन. (गुड्स अॅण्ड सर्व्हिस टॅक्स आयडेंटिफिकेशन नंबर) द्वारे ओळखले जाते. हे जीएसटीआयएन व्यवसायाच्या काही महत्त्वाच्या तपशीलांशी जोडलेले असते, जसे की:

- प्रमुख व्यवसायाचा पत्ता (प्रिन्सिपल प्लेस ऑफ बिजनेस - पीपीओबी)
- अतिरिक्त व्यवसाय स्थळ (अॅडिशनल प्लेस ऑफ बिजनेस - एपीओबी)
- नोंदणीकृत मोबाईल नंबर व ई-मेल आयडी

हे तपशील फक्त औपचारिकता नसून, जीएसटी अनुपालनाची कणा आहेत. या तपशीलांची चुकीची किंवा अपूर्ण नोंद ठेवली गेल्यास दंड, जीएसटी नोंदणी रद्द होणे, इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) रोखले जाणे यासारखे गंभीर परिणाम उद्भवू शकतात.

**प्रमुख व्यवसाय पत्त्याचे (पीपीओबी) महत्त्व**

१. **अधिकार व कार्यक्षेत्र** : पीपीओबीवरून कोणत्या राज्याच्या कर अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात व्यवसाय येतो हे ठरते. उदा. नागपूर (महाराष्ट्र) येथील व्यवसायाने चुकीने भोपाळ (मध्यप्रदेश) पत्ता नोंदवला, तर चुकीच्या कार्यक्षेत्रात नोंद होऊन नोटिसा वादग्रस्त ठरू शकतात.

२. **नोटिसांची सेवा** : सीजीएसटी अधिनियम कलम १६९ नुसार, नोंदणीकृत व्यवसाय पत्त्यावर दिलेली नोटीस वैध मानली जाते. पत्ता जुना असल्यास नोटीस न मिळाल्यावर सुद्धा ती सेव्ह झाली असे गृहित धरले जाते.

३. **भौतिक पडताळणी** : सीजीएसटी नियम २५नुसार कर अधिकारी व्यवसाय स्थळाची प्रत्यक्ष पडताळणी करू शकतात. जर घोषित केलेल्या पत्त्यावर व्यवसाय अस्तित्वात नसेल, तर जीएसटीआयएन निलंबित किंवा रद्द होऊ शकते.

१. **अतिरिक्त व्यवसाय स्थळ (एपीओबी) नोंदविण्याचे महत्त्व**

- एकापेक्षा अधिक ठिकाणे घोषित करणे आवश्यक - गोदाम, शाखा कार्यालये, फॅक्टरी, मार्केटिंग ऑफिस अशी सर्व ठिकाणे एपीओबी म्हणून नोंदविणे आवश्यक आहे.
- वस्तूंची हालचाल व ई-वे बिल - सीजीएसटी नियम १३८ नुसार ई-वे बिलमध्ये योग्य डिस्पॅच पत्ता असणे आवश्यक आहे. अघोषित ठिकाणावरून वस्तू हलविल्यास त्या जप्त केल्या जाऊ शकतात.
- आयटीसी नाकारणे - अघोषित ठिकाणाशी संबंधित भाडे, वीज, सुरक्षा सेवा यावरचा आयटीसी नाकारला जाऊ शकतो.
- लेखापरीक्षण व तपासणी - ऑडिट दरम्यान अघोषित पत्त्यावर खरेदी दाखवल्यास ती संशयास्पद मानली जाऊन दंड व आयटीसी उलट मागणी होऊ शकते.

२. **योग्य संपर्क तपशीलांचे महत्त्व (मोबाईल व ई-मेल)**

- ओटीपी व लॉगिन सुरक्षितता जीएसटी पोर्टलवर लॉगिन करताना ओटीपी नोंदणीकृत मोबाईल व ई-मेलवर येतो. चुकीचे तपशील असल्यास लॉगिन करणे अवघड होते.
- नोटिसा व संवाद : कलम १६९ नुसार ई-मेलवर नोटिसा पाठवता येतात. ई-मेल बंद असल्यास नोटिसा मिळत नाहीत व दंड टाळता येत नाही.
- दैनंदिन अनुपालन : रिटर्न देय तारखा, विसंगती सूचना व इतर सर्व माहिती ई-मेल/मोबाईलवर येते. चुकीचे तपशील असल्यास अनुपालन धोक्यात येते.

३. **चुकीचे/न बदललेले तपशील याचे कायदेशीर परिणाम**

- नोंदणी निलंबन व रद्द करणे (कलम २९ सीजीएसटी अधिनियम)
- दंड व खटले (कलम १२२ सीजीएसटी अधिनियम) रुपये १०,००० किंवा कराच्या १०% इतका दंड.
- वस्तूंची जप्ती व जप्तीनंतर व्यवसायात व्यत्यय.
- आयटीसी नाकारले जाणे व व्याजासह मागणी.
- चुकीच्या संपर्क तपशीलामुळे एकतर्फी आदेश व लिटिगेशन खर्च.

४. **व्यावहारिक उदाहरणे**

- व्यापाऱ्याने दोन गोदामे ठेवली. एक घोषित केले, दुसरे नाही. अघोषित ठिकाणावरून वस्तू हलवल्यामुळे वस्तू जप्त झाल्या व दंड बसला.
- कंपनीने ऑफिस पत्ता बदलला, पण जीएसटीमध्ये बदल केला नाही. नोटिसा जुन्या पत्त्यावर गेल्या व एकतर्फी आदेश पारित झाला.
- अकाऊंटंट बदलला पण नोंदणीकृत ई-मेल जुन्या अकाऊंटंटचा होता. नोटिसा न वाचल्यामुळे जीएसटीआयएन निलंबित झाला.

५. **प्रतिबंधक उपाय** : जीएसटी आरइजी - १४ द्वारे पत्ता व संपर्क तपशील त्वरित अपडेट करा, जीएसटी पोर्टलवरील तपशील व इनव्हॉईस/ ई-वे बिलमध्ये एकरूपता ठेवा, सर्व गोदामे व शाखा कार्यालये एपीओबीमध्ये दाखल करा. मोबाईल व ई-मेल व्यवसायाच्या नियंत्रणात ठेवा, व्यक्तिगत कर्मचाऱ्यांच्या नावावर नाही.

**निष्कर्ष** : जीएसटी अनुपालनात अचूकता अनिवार्य आहे. चुकीचा पत्ता, अघोषित गोदाम किंवा जुनाट संपर्क तपशील यामुळे दंड, आयटीसी नाकारणे, जीएसीआयएन रद्द होणे व लांबणारे वाद उद्भवू शकतात. व्यवसायांनी हे तपशील नेहमी अचूक व अद्ययावत ठेवावे. ●●

● **अॅड. हितेश प्रवीण पारसे,** नागपूर. ९०९६३३२३५३
कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार

उद्योगाच्या उगमकथा

## 'तंदुरुस्ती की रक्षा करता है लाईफबॉय'

लाईफबॉय, मूळतः १८९४ मध्ये कॉलरा साथीच्या काळात लिव्हर ब्रदर्सने (नंतर युनिलिव्हर) लाँच केले होते. हा एक साबण ब्रँड आहे, जो जंतूंपासून संरक्षण करण्यासाठी आणि स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ओळखला जातो. हात धुण्यास प्रोत्साहन देऊन समुदायांना आजारांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी परवडणारा मार्ग प्रदान करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. लाईफबॉय एका साध्या अँटीबॅक्टेरियल साबणापासून जागतिक ब्रँडमध्ये विकसित झाला आहे, ज्यात एक मजबूत सामाजिक ध्येय आहे, स्वच्छता शिक्षण आणि मोहिमांमध्ये सक्रियपणे सहभागी आहे.

कॉलराच्या उद्रेकाला प्रतिसाद म्हणून लाँच करण्यात आलेले लाईफबॉय हे लोकांना आजारांपासून संरक्षण करण्यासाठी एक सुलभ आणि परवडणारा मार्ग म्हणून डिझाइन केले गेले होते. सुरुवातीपासूनच लाईफबॉय हे केवळ साबणापेक्षा जास्त राहिले आहे; ते सामाजिक बदलासाठी एक शक्ती बनले आहे, सार्वजनिक आरोग्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून हात स्वच्छतेला प्रोत्साहन देत आहे. कालांतराने, लाईफबॉयने आपली पोहोच आणि उत्पादन श्रेणी वाढवली, विविध बाजारपेठा आणि गरजांशी जुळवून घेत स्वच्छतेवर मुख्य भर कायम ठेवला आहे. लाईफबॉय आता जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त ब्रॅण्ड आहे, विशेषतः उदयोन्मुख




बाजारपेठांमध्ये, जिथे ते विविध उपक्रमांद्वारे स्वच्छतेला प्रोत्साहन देत आहे.

लाईफबॉय हात धुणे आणि स्वच्छता पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक मोहिमांमध्ये सक्रियपणे सहभागी आहे, विशेषतः ग्रामीण समुदायांमध्ये. याचे एक उदाहरण म्हणजे 'खुशीयों की डोली कार्यक्रम,' जो हात धुण्यास प्रोत्साहन देऊन अतिसारामुळे होणारे मृत्यू कमी करण्यावर लक्ष केंद्रित करतो. हातांची स्वच्छता दैनंदिन जीवनाचा एक साधा आणि अंगभूत भाग बनवण्यासाठी सतत प्रयत्न केले जात असताना, लाईफबॉयचे ध्येय आजही अत्यंत प्रासंगिक आहे.

लाईफबॉय हा युनिलिव्हरद्वारे बाजारात आणला जाणारा एक ब्रिटिश ब्रॅण्डचा साबण आहे. लाईफबॉय हा मूळतः आणि त्याच्या इतिहासातील बराच काळ, फिनॉल (कार्बोलिक आम्ल, कोळशाच्या डांबरापासून काढलेले एक संयुग) असलेले कार्बोलिक साबण होते. आज लाईफबॉय ब्रॅण्ड अंतर्गत उत्पादित होणाऱ्या साबणांमध्ये फिनॉल नसते. सध्या लाईफबॉयचे अनेक प्रकार आहेत. विल्यम हेस्केथ लीव्हर यांनी ब्रिटनमध्ये रॉयल जंतुनाशक साबण म्हणून लाईफबॉय सर्व प्रथम लाँच केले. लीव्हरने जंतूंशी लढू शकणारा आणि तरीही सर्वांना परवडणारा साबण तयार करण्यासाठी परिपूर्ण सूत्र शोधत कार्बोलिक अॅसिड शोधला. आरोग्य आणि स्वच्छता शिक्षणातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना लॉर्ड लीव्हरहुल्मे ही पदवी देण्यात आली.

समुदायांना आजारांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी हा साबण परवडणारा आणि सुलभ मार्ग म्हणून डिझाईन करण्यात आला होता आणि लाईफबॉयने हा संदेश दिला की, साबणाने हात धुणे जंतूंचा प्रसार रोखण्यास मदत करू शकते.

लाईफबॉय केवळ जगातील पहिल्या ग्राहक ब्रॅण्डपैकी एक बनले नाही, तर सामाजिक बदलाचे प्रतिनिधी देखील बनले. पहिल्या महायुद्धादरम्यान सैनिकांना लाईफबॉय साबण वितरित करण्यात आला आणि १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले, तेव्हा ब्रॅण्डने ब्रिटनच्या काही सर्वांत जास्त प्रभावित भागात साबण आणि गरम शॉवरने सुसज्ज व्हॅन पाठवल्या, जेणेकरून मूलभूत सुविधांपर्यंत पोहोचू न शकलेल्या रहिवाशांना मदत होईल.

त्यानंतरच्या दशकांमध्ये लाईफबॉयने जगभरातील बाजारपेठांपर्यंत विस्तार केला. परंतु, त्याचे ध्येय पूर्वीसारखेच प्रासंगिक राहिले. हातांची स्वच्छता दैनंदिन दिनचर्येचा एक साधा भाग बनविण्यात मदत करणे. लाईफबॉय आता जगातील चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक पसंतीचा एफएमसीजी ब्रॅण्ड आहे. हा जगातील सर्वाधिक विक्री होणारा जंतू संरक्षण साबण देखील आहे ब्रॅण्डचे हात स्वच्छतेचे अभियान देखील वाढले आहे. २०१० ते २०१९ दरम्यान शैक्षणिक मोहिमांद्वारे लाईफबॉय ३० देशांमध्ये १ अब्ज लोकांपर्यंत पोहोचले आहे. ●●

● **प्रा. दीपक कुळकर्णी,** नागपूर
९८२२५७५२५७

## टाटा इलेक्ट्रिक स्कूटर लाँच होणार

२०२५ पर्यंत बरेच लोक इलेक्ट्रिक वाहनांकडे वळले आहेत. अशा परिस्थितीत जर तुम्ही स्वत:साठी एक उत्तम इलेक्ट्रिक स्कूटर खरेदी करण्याचा विचार करीत असाल, तर अशी इलेक्ट्रिक स्कूटर बाजारात लाँच होणार आहे, ज्यात तुम्हाला २०० किमीची रेंज आणि ५५ किमी प्रति तासाचा वेग मिळेल. या इलेक्ट्रिक स्कूटरची किंमत देखील फक्त १७ हजार रुपयांच्या आसपास असण्याची शक्यता




वर्तविण्यात येत आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार 'टाटा बहुजन' आपली पहिली इलेक्ट्रिक स्कूटर 'टाटा इलेक्ट्रिक स्कूटर' बाजारात आणणार आहे. या इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये ३.५ किलोवॅट क्षमतेची मोठी लिथियम आयन बॅटरी राहणार आहे. ही बॅटरी पूर्णपणे चार्ज होण्यासाठी सुमारे ४ ते ६ तास लागू शकतात आणि एकदा पूर्णपणे चार्ज झाल्यावर तुम्ही ती १८० किमी ते २०० किमी आरामात चालवू शकाल. टाटाच्या या इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये डिजिटल डिस्प्ले, लो बॅटरी इंडिकेटर, एलईडी लाइटिंग सेटअप, ब्लूटूथ आणि अॅप्लिकेशन कनेक्टिव्हिटी, अँटी-थेफ्ट अलार्म सिस्टम, साईड स्टॅण्ड सेन्सर इत्यादी अनेक वैशिष्ट्ये आणि स्पेसिफिकेशन पाहायला मिळतील. ●●

● संयोजक - **अभिजित वर्तक**
९४२२९२३२०१

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## उदगिरातील आठ मटका बहाद्दर जिल्ह्यातून तडीपार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर , दि.२ ऑगस्ट -** जिल्ह्यातील अवैध धंद्याना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे सरसावले आहेत. अनेकवेळा गुन्हे दाखल करूनही मटका जुगार खेळविणाऱ्या आठ मटका किंगना जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. त्यात उदगीर तालुक्यातील वाढवणा येथील सहा तर हाळी येथील दोघांचा समावेश आहे. या कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

मटका घेणाऱ्यांवर तडीपारीची कार्यवाही करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी पोलीस अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर यांच्या मार्गदर्शनावरून उदगीर तालुक्यातील वाढवणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मटका जुगार चालविणाऱ्यांविरुध्द तडीपारीचा प्रस्ताव तयार करून उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यावर सुनावणी झाली. त्यावरून दोघांना तीन महिन्यांसाठी तर अन्य सहाजणांना दोन महिन्यांसाठी लातूर जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. त्यामध्ये अहमद सूरज शेख, क्रांतीकुमार शिवाजी जोंधळे, फिरोज चाँदसाब शेख, अजय अनिल कज्जेवाड, अलीम आयुबसाब डांगे, तुकाराम रामकिशन पुंड (सर्व रा. वाढवणा बु. ता. उदगीर), विक्रम विनोद शिंदे व सोहेल मुजम्मील शेख (दोघेही रा. हाळी ता. उदगीर) यांना लातूर जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई झाली.

### संक्षिप्त वृत्त...

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीला एक्सलंट मानांकन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागाने पुन्हा एकदा यशाचा नवा झेंडा फडकावला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई), मुंबई यांच्या शैक्षणिक मूल्यांकनात या महाविद्यालयाला एक्सलंट हे सर्वोच्च मानांकन प्राप्त झाले आहे.

एम.एस.बी.टी.ई., मुंबई मार्फत दरवर्षी अध्यापन पध्दती, शैक्षणिक उपक्रम, शैक्षणिक निकाल, औद्योगिक व हॉस्पिटल व्हिजिटस्, प्रयोगशाळा सुविधा, तज्ज्ञांची व्याख्याने तसेच व्यक्तिमत्व आणि उद्योजकता विकास कार्यक्रम या विविध निकषांवर संस्थांचे मूल्यमापन करण्यात येते. या सर्वांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागाने सलग दुसऱ्यांदा एक्सलंट श्रेणी मिळविली आहे. या यशाचे श्रेय प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते आणि विभागप्रमुख प्रा. प्रकाश शिवनेचारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या परिश्रमांना जाते. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहायक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून प्राचार्या डॉ. सातपुते, विभागप्रमुख प्रा. शिवनेचारी यांच्यासह अन्य प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## रक्तदान शिबिरात ५१ जणांचे रक्तदान :रक्तदात्याला विमा कवच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** येथील मांजरा महिला अर्बन को -ऑप क्रेडिट सोसायटीच्यावतीने आयोजित शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले. यावेळी रक्तदात्यांचा संस्थेमार्फत एक लाखाचा विमा मोफत उतरविला.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविंदपूरकर, विलास को-ऑप बँकेचे चेअरमन ॲड. किरण जाधव, एम. एल. जाधव, श्रीशैल्य कोरे, भागवत सांगवे, सुशील जोशी, सोनू डगवाले, युनूस मसूलदार, शोभा पाटील, श्वेता लोंढे, ॲड. वैशाली यादव, रागिणी यादव, ॲड. सुनील कांबळे, सविता कांबळे, सुजाता अजनीकर, प्रवीण सूर्यवंशी, ॲड. विलास कोळेकर, ॲड. मैत्री कोल्हे, प्रवीण सूर्यवंशी, एम. एल. माळी, शाहिद शेख, अप्पा पंढारी, पोपट करसबाडे, विनायक जंगले, मुबिना शेख, अश्विनी घोडके, प्रभुअप्पा पंचाक्षरी, विश्रांती स्वामी आदी उपस्थित होते.

## अहमदपुरात ७७ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ ऑगस्ट -** अहमदपूर शहरातील विद्यानगर येथील न्यू विद्यानगर गणेश मंडळातर्फे गणेशोत्सवानिमित्त रविवारी रक्तदान शिबिर व मधुमेह तपासणी शिबिर पार पडले. या शिबिरात सामाजिक बांधिलकी जोपासत ७७ जणांनी रक्तदान केले.

या शिबिराचे उद्घाटन माजी राज्यमंत्री तथा शरदचंद्र पवार पक्षाचे नेते विनायकराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तब्बल ७७ पिशव्यांचे रक्तसंकलन करण्यात आले. तर मधुमेह तपासणी शिबिरात सुमारे १५० नागरिकांची तपासणी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे प्रदेश सरचिटणीस साजिद सय्यद, सिराज सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष आशुतोष कारामुंगे यांच्यासह शंकर चोले, विष्णू कोतवाड, मोहन मजरे, बालाजी सोनवणे, विठ्ठल पवार, स्वप्निल सोनवणे, तुषार डांगे, तेजस डांगे, वीरभद्र देमगुंडे, शिवम केंद्रे, शिवा केंद्रे, किरण कासले, पंकज तेलंगे, शुभम केंद्रे, शरद सुरनर, सचिन खेडकर, प्रथमेश फड यांनी परिश्रम घेतले.

## विद्युत सहायकपदासाठी मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दि. ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेले उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात आली आहे. मात्र या तीनही दिवसांत राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे निवड झालेल्या ज्या उमेदवारांना उपस्थित राहता आले नाही, अशा काही गैरहजर उमेदवारांना मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवहार अडखळणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** कोकण व विदर्भ ग्रामीण बँकांचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेत विलीनीकरण झाले आहे. त्या बँकांची खाती महाराष्ट्र ग्रामीण बँकेत वळती करण्यात येणार आहेत. यासाठी दि.१३ ते दि. १६ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवहार धिम्या गतीने किंवा बंद पडण्याची शक्यता आहे. यासाठी ग्राहकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे, असे बँकेच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## विसर्जनाची पालिकेकडून तयारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** गणेशोत्सव जल्लोषात सुरू असतानाच महापालिका प्रशासनाने गणेश विसर्जनाची तयारी सुरू केली आहे. विसर्जन मिरवणुकांमध्ये कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी महापालिकेने तब्बल ६०० कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या विभागातील कामांचे वाटप करून दिले आहे.

त्यानुसार शहरात १५ ठिकाणी गणेशमूर्ती संकलन केंद्र असणार आहेत. त्या ठिकाणी चार फुटांपर्यंतच्या गणेश मूर्ती स्वीकारल्या जाणार आहेत. पाच फुटांपुढील मूर्तींचे मंडळांनी स्वतः जाऊन बारा नंबर पाटी येथील खाणीत गणरायाचे विसर्जन करावयाचे आहे. संकलन केंद्रांवर सुमारे ३० हजार गणेशमूर्तींचे संकलन होण्याची शक्यता आहे.

### ईद मिलाद कार्यक्रम होणार दुसऱ्या दिवशी

गणपती विसर्जन आणि ईद ए मिलादुन्नबीचे कार्यक्रम एकाच दिवशी आले आहेत. त्यामुळे येथील मुस्लीम समाज बांधवांनी ईद ए मिलादुन्नबीचा कार्यक्रम एक दिवस पुढे घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या विनंतीला मान देत सामाजिक सलोख्याची परंपरा कायम राखत गणेश विसर्जनानंतर ७ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता काझी मोहल्ला येथील सोफिया मस्जिद येथून ईद ए मिलादुन्नबीनिमित्त दुचाकी रॅली निघणार आहे. तर ८ सप्टेंबर रोजी जुलूस काढण्यात येणार आहे.

लातूर शहरात सुमारे ३५० पेक्षा अधिक सार्वजनिक मंडळांनी महापालिकेची परवानगी घेऊन गणरायाची स्थापना केली आहे. तसेच छोट्या-छोट्या गल्लीतील बाल गणेश मंडळेही परवानगीशिवाय गणेशोत्सव साजरा करीत आहेत. प्रत्येक घरामध्ये गणरायाची स्थापना करण्यात आली आहे. शहरात लाडक्या गणरायाला गणेश चतुर्दशीदिनी निरोप देण्यात येतो. या गणेश विसर्जनासाठी महापालिका प्रशासन सज्ज झाले आहे. यासाठी शहरात दरवर्षीप्रमाणे १५ ठिकाणी संकलन केंद्र उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक केंद्रांवर कर्मचारी तैनात असणार आहेत. त्या संकलन केंद्रांवर चार फूट उंचीपर्यंतच्या मूर्ती स्वीकारल्या जाणार आहेत. पाच फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्त्यांची विसर्जन स्थळापर्यंत मिरवणूक काढल्यानंतर त्या मूर्त्या बारा नंबर पाटी येथील खाणीत नेऊन विसर्जित करावयाच्या आहेत. विसर्जनासाठी महापालिकेने वाहतूक मार्गातही बदल करण्याचे ठरविले आहे. दुपारनंतर विसर्जन मार्गांवर वाहतुकीला बंदी करण्यात येणार आहे. मिरवणुका शांततेत, लातूरच्या सुसंस्कृत परंपरेला साजेशा होण्यासाठी महापालिकेसह पोलिसांचेही विशेष लक्ष राहणार आहे. त्याचबरोबर मिरवणुकांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचीही नजर राहणार आहे. मिरवणूक मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. डॉल्बीमुक्त वातावरणात पारंपरिक वाद्यांच्या गजरात सर्व विसर्जन मिरवणुका निघणार आहेत.



## न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांचा लातुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमूर्ती म्हणून लातूरचे सुपुत्र व बँकेचे मार्गदर्शक शिवकुमार डिगे यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे.

या नियुक्तीनंतर ते प्रथमच लातूर दौऱ्यावर अर्थात गावी आले असता यशवंत नागरी सहकारी बँकेच्या वतीने चेअरमन सुहास पाचपुते यांच्या हस्ते त्यांचा. सत्कार करण्यात आला.

यावेळी व्हा. चेअरमन सूर्यभान पाटील, संचालक विष्णुपंत साठे, सुरेश राठोड, धर्मराज तांदुळजेकर, आदिमाया गवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी शाम कापसे आदींसह अधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

## मराठवाड्याच्या विकासासाठी निघणार स्वाभिमान जागर यात्रा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** मराठवाड्यात सिंचन, उद्योग-रोजगार, दळणवळण आदींचा अनुशेष दिवसेंदिवस वाढत आहे. याकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष होत आहे. होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त तुळजापूर ते छत्रपती संभाजीनगर 'मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रा' काढण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक नामदेव पाटील तळेगावकर यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मराठवाड्याचा निधी इतरत्र पळविल्याने येथील पायाभूत सुविधा, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सिंचन आदी क्षेत्रांत मराठवाडा पिछाडीवर पडला. शेतीला पाणी नाही, तरुणांच्या हाताला काम नाही, प्रक्रिया उद्योग नसल्याने कष्टाचे योग्य दाम मिळत नाही, यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

उद्योग आणि रोजगार नसल्याने तरुणांना स्थलांतर करावे लागत आहे. सरकार कोट्यवधींच्या योजना जाहीर करते. मात्र, त्यावर ठोस काम केले जात नाही. मराठवाड्यातील उद्योग, सिंचन आणि दळणवळणाचा हजारो कोटींचा अनुशेष दिवसेंदिवस वाढत आहे. २०२३ मध्ये सिंचनासाठी मंजूर १३ हजार ७०० कोटींपैकी आतापर्यंत केवळ १ हजार ८० कोटींचा निधी मिळाला.

मराठवाड्यातील लोकांना स्वतःचा हक्क मिळविण्यासाठी आणि नागपूर कराराप्रमाणे अनुशेष मिळण्यासाठी रस्त्यावर उतरुन लढा उभारण्याची गरज आहे. या भूमिकेतून मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रेचे येत्या ११ सप्टेंबरपासून आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजक नामदेव पाटील यांनी दिली.

## अज्ञानामुळेच जीवनात दुःखाचा प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** अज्ञान हेच मानवाच्या दुःखाचे मूळ कारण आहे. अज्ञानामुळेच मानवाच्या जीवनात दुःखाचा प्रवेश होतो. दुःखाला दूर करण्यासाठी बुध्दांनी आर्य अष्टांगिक मार्ग सांगितला आहे. त्याचे आचरण करून दुःखाला दूर करा. अज्ञान म्हणजे केवळ माहितीचा अभाव नाही, तर आपल्या जीवनातील गोष्टी आणि वास्तवाकडे दुर्लक्ष करणे होय, असे प्रतिपादन भंते डॉ. यश कश्यपायन महास्थवीर यांनी केले.

शहरातील बौध्दनगरातील वैशाली बुध्द विहार येथे बुध्द धम्म वर्षावास पुनीत पर्वानिमित्त आयोजित धम्मदेशनेत ते बोलत होते. प्रारंभी भगवान बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून त्रिशरण, पंचशील ग्रहण करून बुध्द वंदना घेण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विनोद खटके, सुनील कांबळे हे उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा बुध्द पुस्तिका, स्मृतीचिन्ह व पुष्प देऊन गौरव करण्यात आला. टी. एस. कवठेकर यांनी भोजनदान दिले. यावेळी भरत कांबळे, सूर्यभान लातूरकर, किशोर कांबळे, कुमार सोनकांबळे, जी. जी. कांबळे, आबा गायकवाड, दामू कोरडे, अशोक सातपुते, वसंत वाघमारे, उत्तम गायकवाड, राजू कांबळे, असित कांबळे, शकुंतला नेत्रगावकर, शीला वाघमारे, मीना सुरवसे, अनुराधा कांबळे, लता गायकवाड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक केशव कांबळे यांनी केले.

## लातुरात ओबीसी समाजाचे बेमुदत धरणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** भटके विमुक्त, ओबीसींच्या आरक्षणाला कुठलाही धक्का न लावता इतर समाजाच्या नव्या आरक्षणाचा शासनाने निर्णय घ्यावा, या प्रमुख मागणीसाठी लातुरातील महात्मा गांधी चौकात विमुक्त भटके आणि आदिवासी महासंघाच्यावतीने बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. महासंघाच्यावतीने राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.



निवेदनात म्हटले आहे, सध्या देशासह राज्यात ओबीसी म्हणून आरक्षण द्यावे, यासाठी शासन, प्रशासनाकडे मागणी करीत आहेत. यामुळे भारतीय संविधान आणि लोकशाहीचे अवमूल्यन होत आहे. ओबीसी, भटके विमुक्त बांधवांनी अद्याप सत्तेची फळे चाखली नाहीत. आता कुठे संविधानाच्या माध्यमातून ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य आणि शासकीय सेवेत दाखल होत आहेत. अशा स्थितीमध्ये काहींनी आम्हालाही ओबीसींमधूनच आरक्षण द्यावे, अशी मागणी रेटून धरली आहे. ओबीसी प्रवर्गामधून आरक्षण मागणाऱ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे, यासाठी आमची काहीही हरकत नाही. मात्र, ओबीसींमधून आरक्षण देऊ नये, अन्यथा सर्व ओबीसी, भटके विमुक्त व आदिवासी समाज रस्त्यावर उतरून संघर्ष आणि आंदोलन करेल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर भटके विमुक्त आदिवासी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष हरीभाऊ गायकवाड, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भारत काळे, भारतीय राष्ट्रीय आदिवासी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष रामराजे आत्राम, बाळासाहेब फासे, गंगाधर जाधव गुरुजी, अजित निंबाळकर, दगडू पडीले, गणपतराव तेलंगे, रंगनाथ घोडके, भाऊसाहेब शेंद्रे, सखाराम कानडे, ॲड. मंगलदास जवादे, ॲड. सुनील फड, ॲड. सुधाकर अरसुडे, कृष्णा पांचाळ, अनिल जाधव आदींची नावे आहेत.

## अजित पाटील कव्हेकरांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचा वाढदिवस धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यामध्ये रक्तदान शिबिर, शैक्षणिक साहित्य वाटप, रुग्णांना फळे वाटप, अन्नदान, गोशाळेस चारा वाटप यासह विविध देवस्थानांमध्ये अभिषेक व महाआरती करण्यात आली.

अजित पाटील कव्हेकर यांना शुभेच्छा देण्यासाठी कैलास निवासस्थानी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह राजकीय क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी गर्दी केली होती.

भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सिध्देश्वर मंडलाच्या वतीने ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास अभिषेक करून महाआरती करण्यात आली. तसेच सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या सुरत शहावली दर्गास चादर अर्पण करून अजित पाटील कव्हेकर यांच्या निरोगी व दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. त्याचबरोबर विविध भागामध्ये वृक्षारोपणही करण्यात आले. महात्मा बस्वेश्वर मंडलाच्या वतीने गोलाई येथील श्री जगदंबा देवीची महाआरती करून प्रार्थना करण्यात आली. अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते बाजार समितीत असलेल्या गौरीशंकर मंदीरात अभिषेक करून महाआरती करण्यात आली. कव्हा येथे शेखमियाँ साहेब दर्गास चादर अर्पण करण्यात आली. रणजित पाटील कव्हेकर व रागिनी यादव यांच्या उपस्थितीत रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. तसेच मातोश्री वृध्दाश्रमासह शासकीय रुग्णालयात अन्नदान करण्यात आले.





## लातूरातील बप्पा गणेश मंडळाच्या गणपतीची कव्हेकरांच्या हस्ते आरती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** शहरातील जुनी कापड लाईन भागातील बप्पा गणेश मंडळाच्या गणपतीची आरती माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते रविवारी सायंकाळी करण्यात आली.

यावेळी भाजपा युवा नेते तथा भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी नगरसेवक सुभाषअप्पा सुलगुडले, महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे संचालक सूर्यकांतराव शेळके, भाजपाचे शहरचे मधुसुधन पारीख, रविशंकर लवटे यांच्यासह लातूर शहरातील अनेक मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ज्येष्ठा गौरींचे मनोभावे पूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** शहरासह जिल्ह्यातील हिंदू धर्मियांच्या घराघरांत ज्येष्ठा गौरींचे रविवारी उत्साहपूर्ण वातारणात स्वागत करण्यात आले. सोमवारी त्यांची मनोभावे पूजा करून पंचपक्कान्नाचे जेवण भरवून त्यांचे मन प्रसन्न करण्याचा प्रयत्न झाला. वर्षभर घरात लक्ष्मीचा मुक्त संचार होऊ दे, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.



ज्येष्ठा गौरींच्या आगमनापासून निरोपापर्यंत तीन दिवस उत्साहपूर्ण वातावरणात गौरींचा पाहुणचार केला जातो. पहिल्या दिवशी सायंकाळच्या सुमारास झालेल्या त्यांच्या आवाहनानंतर दुसऱ्या दिवशी पूजन केले जाते. प्रत्येक घरात सुवासिनी महिलांच्यावतीने गौरींना सजविण्यात येते. त्यांच्यासमोर विविध खेळणी, खाण्याचे पूरण - पोळीसह विविध पंचपक्कान्न ठेवून नैवेद्य दाखविण्यात येतो. शेतातील गहू, ज्वारी, हरभरा, मूग, मटकी, मका, जवस, तीळ, बाजरी असे धान्याचे ढीग त्यांच्यासमोर ठेवले जातात. केळी, सफरचंद, पेरू, चिकू, डाळिंब, मोसंबी, संत्री, सीताफळ, किवी, ड्रॅगन फ्रूट, भोपळा अशी फळे ठेवण्यात येतात. विविध ड्रायफ्रूटसही ठेवण्यात आले होते. विद्युत रोषणाईने आकर्षक सजावट करण्यात आल्याचे दिसून आले. अनेक घरांमध्ये तर गौरींच्या गळ्यात चलनी नोटांच्या माळा घातल्या जातात. सुवासिनींच्या अंगावरील सर्व दागिने गौरींना घातले जातात. अशा या प्रसन्न वातावरणात गौरींना खूष करण्याचा प्रयत्न होतो. गौरी खूष होऊन वर्षभर आपल्या घरातही धन, संपत्ती देतात, असा समज आहे.

यामुळे त्यांची वेगळीच बडदास्त ठेवण्यात सुवासिनींचे तीन दिवस कसे जातात, हेही महिलांना समजत नाही. अशा या गौरींची पूजा सोमवारी घरोघरी करण्यात आली. उद्या (मंगळवारी) सायंकाळच्या सुमारास त्यांना निरोप देण्यात येणार आहे. यासाठी दिवसभर महिला एकमेकींच्या घरी जाऊन दोरे घेतात. यामुळे गौरींची केलेली सजावटही पाहण्यात येते.